म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. ११९५३

इ.सं. १९६८

दा.क्र. ११९५३

# शाळा कशी चालवावी

IRBK-0111953

IRBK-0111953

# शाळा कशी चालवावी

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
क्र. नं.

: लेखक :

बापूराव गणपतराव जगताप,
बी. ए., बी. टी.

IRBK-0111953

किंमत सव्वा रुपया

जगताप पब्लिशिंग हाउस, पुणें २.

११९५३

# शाळा कशी चालवावी

विशेषतः

## प्राथमिक शाळांकरितां

★

११९५३
आ.क्र.

: लेखक :

बाबूराव गणपतराव जगताप,

बी. ए., बी. टी.

किंमत सव्वा रुपया

जगताप पब्लिशिंग हाऊस, पुणे २.

प्रकाशक :

जयवन्त बाबूराव जगताप,
बी. ए., बी. टी.
संचालक, जगताप पब्लिशिंग हाऊस
१२४८ शुक्रवार पेठ, पुणें २.

मुद्रक :

प्र. भा. काळे,
प्रतिभा प्रेस, ३३५ शनवार, पुणें २.

◆ ◆ ◆ ◆

आवृत्ति तिसरी

## प्रास्ताविक :

कांहीं वर्षांपूर्वी कोल्हापूर येथील प्राथमिक शाळांतील शिक्षकांकरितां 'रिफ्रेशर कोर्स' चालविण्यांत आला होता. त्यावेळीं School Management किंवा 'शाळा कशी चालवावी' या विषयावर माहिती देण्याची कामगिरी मजकडे सोपविण्यांत आली होती. या विषयावर जीं टिपणें मीं गोळा केलीं त्या आधारें शिक्षक मासिकाचा १९३८ चा एप्रील-मेचा जोड अंक म्हणून '**शाळा कशी चालवावी**' हें पुस्तक मी तयार केलें. **मराठी स्कूल बुक कमिटीनें** हें पुस्तक प्राथमिक शाळेंतील शिक्षकांच्या व ट्रेनिंग संस्थांतील विद्यार्थ्यांच्या लायब्ररयांसाठीं मंजूर केलें आहे.

प्रथम आवृत्ति डेमी आकारांत छापली होती. दुसऱ्या आवृत्तीचा आकार क्राऊन धरला होता. मजकुरांत फारसा फरक केलेला नव्हता.

ही आवृत्ति संपून बराच काल लोटला होता. पण तिसऱ्या आवृत्तीचा सुयोग कागदाच्या टंचाईमुळें व महर्गतेमुळें आला नव्हता. तो सुयोग आज आला असल्यानें सदर पुस्तकाचें पुनर्मुद्रण करण्यांत आलें आहे. शाळाधिकारी, शिक्षक व अभ्यासक यांचेकडून पूर्वीप्रमाणें याही आवृत्तीचें स्वागत होईल, अशी आशा करतों.

प्रतिभा प्रेसचे मालक मेसर्स जोशी व लोखंडे यांनीं या आवृत्तीचें छपाईकाम थोड्या वेळांत उत्तम केल्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

—वा. ग. जगताप.

# अनुक्रमणिका

—:०:—


प्रकरण १ लें—शाळा

हेडमास्तर यांची लायकी. शाळेचें-ध्येय. शाळागृह हें बालक-मंदीर आहे. शिक्षक, पालक व बालक यांचे सहकार्यावर चालविलेलें कार्य म्हणजे शाळा होय. पृष्ठें १–१०

प्रकरण २ रें—शिक्षक

शिक्षकाची लायकी. शिक्षकास विषयाचें ज्ञान. अध्यापनशास्त्राची आवश्यकता, मुलांबद्दल प्रेम व मुलांविषयीं वैयक्तिक माहिती. विषयांची वांटणी कशी करावी. विषयवार मंडळें. पृष्ठें १०–२०

प्रकरण ३ रें—शिस्त

शिस्त म्हणजे काय. शिक्षा कोणती व किती करावी, शिक्षा करतांना शिक्षकानें कोणती गोष्ट लक्षांत ठेवावी. शिक्षेचे तीन प्रकार. बक्षिसें व चढाओढ. मुलांना स्वातंत्र्य कां द्यावें. शाळेंत स्वराज्य कसें निर्माण करतां येईल. पृष्ठें २०–३७

प्रकरण ४ थें—अभ्यासक्रम

अभ्यासक्रम म्हणजे सर्व शिक्षण नव्हे. वार्षिक, मासिक अंदाजपत्रक. शिक्षकाची डायरी व विषयवार वह्या. वेगवेगळीं वेळापत्रकें. गृहपाठ. पृष्ठें ३७–४६

प्रकरण ५ वें—परीक्षा

परीक्षेची जरूरी. प्रश्न कशा प्रकारचे असावेत. परीक्षा केव्हां घेण्यात याव्यात. परीक्षांच्या प्रश्नांची वही. परीक्षेचे हेतू. पृष्ठें ४६–५६

प्रकरण ६ वें—आरोग्य

शाळेशीं आरोग्याचा संबंध. मुलांचें व शाळेचें आरोग्य. समाजांतील घाण संवयी, मुलांची वैद्यकीय तपासणी. वर्गांतील उजेड, बसण्याची व्यवस्था. पृष्ठें५७–६४

प्रकरण ७ वें—वाचनालय

पुस्तकालयाचें महत्त्व. पुस्तकें कशीं जमवावींत. वर्तमानपत्रें कशीं मिळवावींत. वाचनालयांचा गांवकऱ्यांशीं संबंध, मुलांकरितां वाङ्मय, खेड्याकरितां वाङ्मय व वर्तमानपत्र. पृष्ठें ६५—७१

प्रकरण ८ वें—खेळ व व्यायाम

व्यायामाची जरूरी. स्नायू व फुप्फुसें यांसाठीं व्यायाम. व्यायाम सर्वांसाठीं. व्यायामाचा आसनाशीं संबंध. खेळ व त्यासाठीं जागा. सक्तीचें शारीरिक शिक्षण. स्वदेश रक्षणाची जबाबदारी. पृष्ठें ७२—७८

प्रकरण ९ वें—धार्मिक शिक्षण

धार्मिक शिक्षणाचा नीति शिक्षणाशीं संबंध. हें शिक्षण कसें द्यावें. जातीजातींमध्यें सहानुभूति कशी वाढवावी. रोजची प्रार्थना व ती घेते-वेळीं कोणती काळजी घ्यावी. पृष्ठें ७८—८८

प्रकरण १० वें—इतर पोषक चळवळी

**सहकारी संघ.** मुलांना लागणाऱ्या सामानाचें दुकान. पालक व विद्यार्थी यांचे सहकार्य कसें संपादावें. **बालवीर चळवळ.** केवळ पोषाखी बालवीर नसावा. स्वावलंबन व वनविहाराची आवश्यकता. बालवीर शिक्षक पाहिजेत. **वाङ्मय मंडळ.** क्रमिक पुस्तकाबाहेर विखुरलेल्या वाङ्मयाशीं या मंडळामार्फत संबंध आणावयाचा. गाणीं, संवाद भाषणें यांची निवड करणें. वादविवाद. संमेलनाची संधि. हस्तलिखित नियतकालिक. पृष्ठें ८९—९७

प्रकरण ११ वें—शाळेचें दप्तर

नियम-संग्रह वाचावा. माहिती पुरविणें. नं. १ चें रजिष्टर व नांवाचें आणि जन्मदिवसाचें महत्त्व. रजिष्टरांत खाडाखोड करूं नये. हजेरी व सामानपत्रक भरणें. शिक्षकास इतर कोणतें काम व तें किती करतां येतें. शिक्षक पक्षातीत असावा. विद्यार्थ्यांकडून काम करवून घेतां येईल कीं नाहीं. पृष्ठें ९८—१०४

उपसंहार पृष्ठें १०४—१०५

बा. ग. जगताप यांच्या संपादकत्वाखालीं
निघणारें
मध्यप्रांत व वऱ्हाड शाळाखात्यानें
मंजूर केलेलें

# " शिक्षक "

## मासिक

★

वर्ष जूनपासून सुरू होतें.

एप्रील-मेचा जोड-अंक
उपयुक्त पुस्तकरूपानें
प्रसिद्ध होतो.

वार्षिक वर्गणी दोन रुपये

आजच
वर्गणीदार
व्हा.

जगताप पब्लिशिंग हाऊस, पुणें

# शाळा कशी चालवावी ?

## प्रकरण पहिलें

## शाळा

मुलांना कसें शिकवावें हें जसें शास्त्र, त्याचप्रमाणें शाळा कशी चालवावी हेंही शास्त्र आहे. शास्त्र म्हणण्याऐवजीं कला म्हणा पाहिजे तर. ही कला सर्वांना साधत नाहीं. शिक्षक उत्तम शिकवीत असेल, परंतु त्याचेकडून शाळा उत्तम चालविली जाईलच, असा कांहीं नियम नाहीं. नाटक कंपनींत नट चांगले असतील पण तेवढयावरून नाटक यशस्वी होईलच, असा अनुभव कोठें येतो ? नाटक कंपनी चालविणें, दुकान चालविणें, शाळा चालविणें याला कसब लागत असतें व तें कसब सर्वांच्या ठिकाणीं पहावयास सांपडत नाहीं, म्हणून पुष्कळ वेळां संस्था मोडतात. याच कारणामुळें सर्वच शिक्षक हेडमास्तराचे जागेसाठीं लायक ठरत नाहींत.

संस्था चालविण्यासाठीं दूरवर व सर्व बाजूला लक्ष देऊन काम करणारीं माणसें लागत असतात. अनेक कामें करावयाचीं आहेत, परंतु त्यांत कोणतें महत्त्वाचें आहे, कोणतें अगोदर करावयास हवें, हें जाणून धीरानें एक एक काम उरकणाऱ्या माणसांना आपण कार्यक्षम म्हणतों. अनेक कामें उरकण्यासाठीं अनेकांची मदत घ्यावी लागतें. स्वतः कोणतें काम करावयाचें व इतरांना कोणतीं कामें सांगावयाचीं, हें त्यास समजलें पाहिजे. नोकर चाकर पुष्कळ असतील, परंतु कोणता कोणतें काम चांगलें करूं शकेल, हेंही समजावयास पाहिजे. काम होत असतांना त्याकडे मधून लक्ष द्यावें लागतें. आपल्या अटकळीप्रमाणें जर काम झालें नाहीं,

तर नोकरांची अदलाबदल करावी लागते. यासाठीं नेत्या माणसाला हुकूम देतां आला पाहिजे. हुकूम देणें हें सोपें काम आहे, असें पुष्कळांना वाटत असेल, परंतु तें तसें नाहीं. कांहीं कार्यतत्पर माणसें हुकूम देण्याचें ऐवजीं स्वतःच काम करूं लागतात. पण स्वतः काम कितीं होणार ! शेवटीं दुसऱ्याची मदत त्यांना घ्यावी लागतेच.

ज्यांच्या सहकार्यावर आपल्या शाळेचें कार्य चाललेलें आहे त्यांना पूर्णपणें ओळखून, तारतम्य लढवून, जो शिक्षक शिक्षण–संस्था चालवूं शकतो, तोच हेडमास्तराचे जागेसाठीं लायक ठरतो. त्यालाच शाळा चालवितां येते असें आपण म्हणतों. शाळा चालविण्यास किती लोकांचें सहाय्य लागतें ? शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्या सहकार्यानें शाळा चालते. किंवा नवीन काळास अनुलक्षून हाच कारभार तीहातीं न राहतां पांचहातीं येऊं शकतो. शिक्षक, संस्थेचे चालक, पालक, विद्यार्थी व मालक म्हणजे सरकार, अशीं हीं पांच अंगें होत. ज्या संस्थेमध्यें हीं पांच अंगें सहकार्यानें कामें करतात तेथें यश हें ठेवलेलेंच. संस्था मोठी नसेल तर तेथें शिक्षक व चालक एकच असूं शकतील. लोकल बोर्डाचें शाळेचें सरकार स्कूलबोर्ड होईल व खाजगी संस्थेचें सरकार त्या संस्थेचें व्यवस्थापक मंडळ होईल. थोडया बहुत फरकानें हीं पांचही अंगें शिक्षणसंस्थेमध्यें कार्य करीत असतांना आपणांस दिसतील. ‘ शाळा कशी चालवावी ’ या लहानशा पुस्तकामध्यें शिक्षक पालक संबंध कोणत्या प्रकारचे असावेत; हेडमास्तर व असिस्टंट शिक्षक यांनीं एकमेकांशीं कसें वागावें, काय शिकवावें, वेळापत्रकें कशीं असावींत, शाळेसाठीं रजिस्टरें किती व कोणतीं असावींत, गृहपाठ कसे असावेत, मुलांना शिक्षा करावी किंवा नाहीं, करावी असें ठरल्यास कोणती व किती करावी, परीक्षेचें स्वरूप काय असावें, वर्गांतील अभ्यासाशिवाय ध्येयास पोषक अशा कोणत्या गोष्टी आहेत व त्या कशा

साध्य करतां येतील, शाळेचें आरोग्य कसें राखावें वगैरे मुद्यांचा विचार एथें करावयाचा आहे.

## शाळेचें ध्येय

/शाळा एक विशिष्ट हेतूनें चालविली जाते. हें ध्येय चालक, पालक, मालक, शिक्षक व विद्यार्थी यांना समजलें पाहिजे./ विद्यार्थी जोपर्यंत लहान असतात तोंपर्यंत त्यांना तें समजणार नाहीं; परंतु ते प्रौढ झाले म्हणजे शिक्षकांनीं त्यांना देखील आपणांस कोठें जावयाचें आहे, आपलें ध्येय काय आहे, हें सांगितलें पाहिजे. चारचौघे मिळून आपण अगोदर कोठें जावयाचें हें ठरवितों व नंतर मार्ग आक्रमण्यास सुरवात करतो; त्याचप्रमाणें शाळा चालविण्याचें बाबतींतही व्हावयास पाहिजे. पाठ घेतांना देखील शिक्षकाला नवीन धडा घेण्यापूर्वी आपल्या पाठाचा उद्देश काय आहे, हें अगोदर सांगावें लागतें. विद्यार्थी, पालक हें ध्येय समजावून घेण्यास तयार नसतील किंवा पात्र नसतील, तर बाकीच्या तिघांनीं तरी ध्येयाकडे पाहिलें पाहिजे.

तात्त्विकदृष्ट्या शाळेचें ध्येय जरी ठरलेलें असलें, तरी देशकालपरत्वें हीं ध्येयें ज्या त्या सरकाराकडून शाळाखात्यामार्फत शाळांकडे व शिक्षकांकडे आलेलीं असतात. आपण सर्व परमेश्वराचीं मुलें आहोंत असें शिकवावयाचें कीं, परमेश्वरानें आपल्याच देशावर वरदहस्त ठेविला आहे असें शिकवावयाचें, हा आजकाल वादाचा विषय आहे./ विश्वकुटुंबाची कल्पना मुलांना येण्यापूर्वी राष्ट्रकुटुंबाची कल्पना येऊं द्या. सर्वांच्या ठिकाणीं सारखेंच विश्वकुटुंबत्व जोंपर्यंत जन्मास आलें नाहीं, तोंपर्यंत विश्वकुटुंबत्वाच्या गप्पा मारणें म्हणजे स्वत्वाचा व स्वदेशाचा नाश करण्यासारखें आहे; असें आज प्रबळ राष्ट्रें म्हणूं लागलीं आहेत.

व आपल्या घरांत दुसऱ्याचे मदतीशिवाय कसें जगतां येईल यासाठीं त्यांचे प्रयत्न चालू आहेत.

आत्यंतिक ध्येय काय असावें हें जरी सर्व राष्ट्रांनीं एकमतानें ठरविलें नसलें, वेगवेगळ्या देशांचीं वेगवेगळीं ध्येयें असलीं तरी त्या ध्येयांकडे जाण्यासाठीं जीं लहान लहान ध्येयें शिक्षकांना आपल्या डोळ्यापुढें ठेवावीं लागतात, तीं जवळ जवळ सारखींच असतात. मुलांची शारीरिक, बौद्धिक व मानसिक वाढ करून त्यांना राष्ट्रामध्यें कर्तृत्ववान घटक बनविणें, हेंच कोठेंही शिक्षणाचें ध्येय राहणार. " ज्या देशामध्यें आपण जन्मास आलों, ज्या देशाचे संपत्तीचे आपण वारस झालों, त्या देशाची संपत्ति आपल्या हातून वाढली पाहिजे, ही जाणीव प्रत्येकाचे ठिकाणीं उत्पन्न झाली पाहिजे. आपल्या भूमातेच्या संपत्तीचा आपण केवळ उपभोगच घेत राहिलों, ती वाढविण्याचा कोणताही प्रयत्न केला नाहीं तर आपण भूभार होऊन राहणार आहोंत, म्हणजे आपलें जिणें व्यर्थ होणार आहे. राष्ट्राची संपत्ति आपल्या कर्तबगारीनें वाढणार आहे. " ही कर्तव्यांची जाणीव लहानपणापासून विद्यार्थ्यांमध्यें शिक्षकानें उत्पन्न करावयास पाहिजे.

'विद्यार्थ्यांमध्यें हें ध्येय' उत्पन्न करणारा शिक्षक अगोदर ध्येयवादी असला पाहिजे. त्याच्यापुढें कांहीं ध्येय नसेल तर त्याला तें विद्यार्थ्यांमध्यें उतरवितां येणार नाहीं. शिक्षण देणें ही मोठी जोखीम आपणावर आहे, हें राष्ट्राचें महत्त्वाचें काम आपणावर येऊन पडलें आहे, राष्ट्राचे भावी आधार आपण तयार करणार आहोंत, ही जर शिक्षकांनाच जाणीव नसेल व आपलें पोट चालावें एवढेंच पायापुरतें ध्येय त्यांनीं स्वीकारलें, तर त्याला स्वतःचें ध्येय साध्य करतां येणार नाहीं व राष्ट्राचेंही ध्येय साध्य करतां येणार नाहीं. 'मी माझें काम आज चांगलें केलें' हा कामापासून मिळणारा आनंद त्याला मिळत नाहीं

व पैशापासून मिळणारें सुख तर त्याला कधींच लाभत नाहीं; कारण त्याला पोटापुरताही पगार मिळत नाहीं. यामुळें " इदं च नास्ति परं च न लभ्यते " अशी त्याची स्थिति होऊन जाते.

शिक्षकानें आपलें ध्येय आपल्या डोळ्यापुढें ठेविलें व शिक्षक मुलांना शिकवूं लागला. मुलांची सर्वांगीण वाढ त्याला करावयाची आहे. ही वाढ करण्यासाठीं मुलांना स्वतंत्रता देणें जरूर आहे. स्वतंत्रतेशिवाय वाढ नाहीं. शिक्षक जरी शिकवीत असले तरी खरें पाहातां मुलें शिकत असतात. शिक्षक शिकवीत असतां मुलें शिकत असतीलच, असें निश्चयानें सांगतां येत नाहीं. शिकवीत नसतांही मुलें शिकत असतात. मुलांनीं शिकावें असें जर थोरांना वाटत असेल, तर त्यांनीं मुलांच्या कलाप्रमाणें वागावयास पाहिजे. मुलांच्या आवडी नावडी काय आहेत, त्यांच्या अडचणी काय आहेत, हें समजावून घेतलें पाहिजे. फळ्यावर वाटेल त्यानें यावें व खडूनें लिहावें, तसें वाटेल त्यानें यावें व मुलें हातीं घेऊन लागेल तो पदार्थ त्यांचा करून दाखवावा, असा निःसत्व पदार्थ मूल नाहीं.

प्रत्येकाला स्वतंत्रता द्यावयाची मग सर्वांना एका वर्गांत एका नियमाखालीं कसें आणावयाचें ? असा प्रश्न कोणीही शिक्षक -बंधु करतील व तो त्यांचा प्रश्न योग्य आहे. प्रत्येक व्यक्तीचें स्वत्व ओळखून प्रत्येकाची वाढ वेगवेगळ्या प्रकारानें करावयाची, हें कार्य एका शिक्षकाला शक्य नाहीं शाळा म्हटली म्हणजे त्यांचें एक धोरण, एक शिस्त हीं असणारच व या शिस्तींत सर्वांना आणावयाचें असतें. परंतु ही शिस्त निर्माण करतांना मुलांचे स्वभाव, ते ज्या परिस्थितींतून आले आहेत ती परिस्थिति दृष्टिआड करून भागत नाहीं, एवढाच याचा अर्थ आहे. स्वतंत्रता द्यावयाची परंतु या स्वतंत्रतेमुळें शाळेच्या व्यवस्थेला अडचण येतां कामा नये. शाळेची व्यवस्थाही अशी असावयास पाहिजे कीं, तीयोगें मुलांच्या

वाढीस अडथळा येतां कामा नये. **शाळा म्हणजे मुलें** हें नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. जेथें मुलें वाढत नाहींत ती शाळाच होऊं शकत नाहीं. याच कारणासाठीं शाळा हें **शाळागृह** नसून **बालक-मंदिर** आहे. आज शाळा म्हटल्याबरोबर शिक्षकाचें चित्र डोळ्यांपुढें उभें राहातें. शाळा म्हटल्याबरोबर मुलें आनंदानें एकत्र येऊन कांहीं तरी व्यवसायांत गढून गेलीं आहेत, कांहीं तरी शिकत आहेत, असें चित्र डोळयापुढें उभें व्हावयास पाहिजे.

मुलांची वाढ करावयाची हें ध्येय निश्चित झालें; परंतु तें ध्येय शिक्षक व पालक या दोघापुढें असावयास पाहिजे. शाळेंत मूल पांच सहा तास असतें, बाकीचा वेळ त्याचे पालकाबरोबर जातो. या वेळांत पालकांनीं ध्येयानुसार वर्तन न केलें तर शाळेच्या शिक्षणावर पाणी पडतें. आज मुलांच्या शिक्षणाचे कामीं योग्य शिक्षक न मिळाल्यामुळें अडचण उत्पन्न होतें, पण त्याहीपेक्षां मोठी अडचण पालकांचीं असतें. शिक्षकांस शिक्षण देऊन नीटनेटका करतां येईल, परंतु पालकांना कोणी शिकवा-वयाचे हा मोठा बिकट प्रश्न आहे. खेड्यापाड्यांतून शिक्षकांना मुला-बरोबर पालकांनाही शिकवावयाची पाळी येते; कारण त्यांना शिकविल्या-शिवाय त्यांचें सहकार्य लाभत नाहीं. हें सहकार्य लाभावें, शिक्षकांच्या अडचणी पालकांना कळाव्यात, यासाठीं पालक शाळेंत येतील असे प्रसंग मुद्दाम घडवून आणिलें पाहिजेत. बाल-दिन आतां सर्वत्र सुरू झाला आहे. त्या दिवशीं मुलांना आनंदानें खेळूं द्यावयाचें असतें. या दिनास जोडून मुलांच्या हस्तव्यवसायाचें प्रदर्शन कांहीं शाळांतून उघडलें जातें. मुलांचे खेळ पाहाण्यासाठीं व आपल्या मुलांनीं हस्तकौशल्याची कामें केलीं आहेत हें पाहून कौतुक करण्यासाठीं पालकांना अवश्य बोलावण्यांत यावें. हा बालदिन असला तरी तो **पालक-दिनहि** होऊं शकेल. या दिवशीं मुलांशीं थोरांनीं कसें वर्तन करावें, मुलांचें आरोग्य

कसें राखावें, इतर सुधारलेल्या देशांत मुलांना कसें वागविलें जातें, वगैरे बाबीवर अधिकारी माणसांनीं पालकांना दोन उपदेशाच्या गोष्टी सांगाव्यात.

बाल-दिनाप्रमाणें शाळेचा वार्षिक-दिन-म्हणून एक दिवस साजरा करण्यांत यावा. इतर सणांचे निमित्तानें पालकांना शाळेंत बोलवावें. त्यांचें सर्वसाधारण ज्ञान वाढून जगांत काय चाललें आहे याची थोडीशी कल्पना द्यावी. प्रौढ शिक्षणाची सोय सरकारकडून होईपर्यंत अशा रीतीनें पालकांना शिक्षण देण्याची व्यवस्था शाळेकडूनच व्हावयास पाहिजे.

वार्षिक दिनाचे दिवशीं किंवा इतर समारंभाचे वेळीं मुलांमुलींकडून संवाद करवून घ्यावेत. संवादाचे योगें भाषा मुलांच्या तोंडीं बसते. मुलांची करमणूक होते व मुलांना आणि पालकांनाही उपदेश मिळतो. आरोग्याविषयीं संवाद झाला तर पालकांनाही आपल्या होत असलेल्या चुका कळून येतात. अशा समारंभाचा विशेष असा आहे कीं, यावेळीं स्त्री- पुरुष समाज जमूं शकतो. पालक म्हणजे केवळ पुरुष वर्गच नव्हे आमच्या माताही शिक्षित झाल्या पाहिजेत. त्यांना तरी नाटक, सिनेमा पाहण्याची कधीं संधी मिळते? मुलांचे संवाद किंवा लहानसे नाट्य-प्रयोग मातांना फार आवडतात, कारण असें करमणुकीचे प्रयोग त्यांचें पुढें कधीं होतच नाहींत.

सध्यां खेडगांवांतून गांवचा असा वार्षिक--दिन असतो. त्या दिवशीं गांवांतून वर्गणी गोळा करण्यांत येते. या वर्गणींतून कुस्त्यांमध्यें विजयी झालेल्या पहिलवानांना बक्षिसें देण्यांत येतात. गांवांचें जेवणही होतें, तमाशा होतो. या उत्सवामध्यें शाळा अगदींच विसरली जाते. ज्या पुरातनकाळीं शिक्षणाकडे लोकांचें फारसे लक्ष नव्हतें त्यावेळचे हे समारंभ असल्यामुळें त्यांत शाळेला स्थान नाहीं. परंतु गांवच्या पुढाऱ्यांनीं आजच्या परिस्थितीस अनुलक्षून या समारंभांत जर योग्य सुधारणा

घडवून आणिली तर ती शोभण्यासारखी आहे. रात्रीं करमणूक होते त्यावेळीं शाळेच्या वतीनें गाणीं, संवाद यांचा कार्यक्रम करविला, तर गांवकऱ्यांना तो आवडेल व शाळा गांवकऱ्यांच्या स्मरणांतुन जाणार नाहीं.

ज्या ठिकाणीं शिक्षक, पालक व मुलें एकत्र येतील अशी जागा शाळेजवळ असणें जरूर झालें आहे. शहरांतील ज्या श्रीमंत शाळा आहेत, त्यांनीं हजारों रुपये खर्च करून थिएटरवजा भव्य मंदिरें बांधलीं आहेत. खेड्यांतून अशा इमारती बांधल्या जाणें शक्य नाहीं. जमिनीचें बस्कर व आकाशाचा छत हा शेतकऱ्यांचा मंडपच आहे. कोठेंही बसून प्रेक्षकाचें काम आमचा शेतकरी करीत असतो. नाटक किंवा संवाद करणाऱ्या मुलांसाठीं एक ओटा किंवा स्टेज शाळेजवळ तयार केलें म्हणजे कार्यभाग होण्यासारखा आहे. गांवांत दगडमातीस तोटा नाहीं. हे दगड एकत्र करून तीन किंवा साडेतीन फूट उंच व वीस फूट लांब व पंधरा फूट रुंद असा ओटा मुलांच्या सहाय्यानें रचतां येईल. कोरडी रचई चालते. त्याला चिखल करण्याचें कारण पडत नाहीं. संध्याकाळीं ज्या ठिकाणीं सावली मिळूं शकेल अशी जागा त्यांतल्या त्यांत निवडण्याचा प्रयत्न करावा.

या व अन्य उपायांनीं शिक्षक व पालक एकत्र येतील असे प्रयत्न शिक्षकांनीं करावयास हवेत. या योगें मुलांसंबंधीं आपलें ध्येय काय आहे यांची त्यांना आठवण राहील. पालकांना ज्याप्रमाणें आपल्या कर्तव्याची नेहमीं जागृति करून द्यावयाची असते, त्याप्रमाणें शिक्षकांनाहि आपल्या ध्येयाची विस्मृति न होईल हें पाहिले पाहिजे. शिक्षक झाला तरी तो मनुष्य आहे. चुका या त्याच्या हातून घडणारच. सर्व जग स्वार्थासाठीं धडपडत आहे. त्यालाही स्वार्थ राहणारच. त्यालाही प्रपंच करावा लागतोच. प्रपंचामध्यें ध्येयाची विस्मृति होण्याचा संभव असतो व म्हणून शिक्षक-संमेलनासारखे प्रसंग वरचेवर घडवून आणिले पाहिजेत.

शिक्षक ही स्वतंत्र जात आहे. आपल्या इलाख्यांत, आपल्या हिंदुस्थानांत शिक्षक कसें काम करीत आहेत, इतकेंच नव्हे तर परदेशांतही शिक्षकांचें कार्य कसें चाललें आहे, हें शिक्षकांना कळणें जरूर आहे. जिल्ह्याजिल्ह्यांमधून देखील शिक्षकांचें चाललेले प्रयत्न एकमेकांच्या प्रत्ययास आले पाहिजेत. या योगें चढाओढ उत्पन्न होऊन शिक्षक आपली कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न करतील. जिल्हा स्कूलबोर्डाच्या ताब्यांत जिल्ह्याचा कारभार गेल्यामुळें जर कोणती वाईट गोष्ट झाली असेल तर ती ही कीं एका जिल्ह्यांत काय चाललें आहे तें दुसऱ्या जिल्ह्यास कळत नाहीं. सर्व जिल्ह्यांच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरांच्या एकत्र बैठकी होऊन त्यांत प्रत्येकानें काय नवीन प्रयोग चालविले आहेत किंवा प्रत्येकास नवीन काय अनुभव येत आहेत, हें सांगण्याची संधि कोणासच मिळत नाहीं. यामुळें एकसूत्री कारभारामध्यें एके ठिकाणीं चांगली ठरलेली गोष्ट दुसऱ्या ठिकाणीं जशी पसरवितां येत असे तशी जिल्ह्याचे वेगवेगळे तुकडे पडल्यामुळें सध्याच्या योजनेनें पसरवितां येत नाहीं. यासाठीं जिल्ह्यांतील शिक्षक संमेलनाची जरूर आहे, इतकेंच नव्हे तर जिल्ह्याजिल्ह्यांतील शिक्षक-संमेलनाचीही जरूरी आहे. आज शिक्षक-संमेलनें ही गोष्ट करमणुकीचा प्रकार सदराखालीं कांहीं अधिकारी लोक घालतात; परंतु ही त्यांची चूक आहे. अमूक एक गोष्ट शिक्षक संमेलनानें सिद्ध झाली असें जरी दाखवितां आलें नाहीं तरी उघड न दिसून येणारे असें पुष्कळ लाभ या संमेलनापासून घडतात, हें या संमेलनाचा ज्यांनीं अभ्यास केला आहे त्यांना सहज कळून येणार आहे. या संमेलनासाठीं स्कूलबोर्डानें कांहीं खर्च करावयास पाहिजे, कारण त्याचा फायदा शिक्षणासच होणारा आहे. स्वतःच खर्च शिक्षकांनीं करावयाचा म्हटल्यास गरीब शिक्षकांना ते जड जातें व त्यामुळें एकदां उत्साहानें संमेलन घडवून आणणारे शिक्षक पुन्हा या फंदांत पडत नाहींत. शिक्षक, अधिकारी व बोर्डाचे सभासद यांचाही

सलोखा व दिलजमाई अशा प्रसंगीं अनायासें घडून येते, हा काय लहान फायदा आहे ?

शाळा कशी चालवावी याचा विचार करतांना शाळा हें बालकमंदिर आहे. बालकांना पहिलें स्थान दिलें पाहिजे. त्यानंतर पालक व शिक्षक यांचा शाळेशीं संबंध येतो. शाळा चांगल्या तऱ्हेनें चालण्यासाठीं शिक्षक पालक—बालक यांचें सहकार्य असावें लागतें. हें सहकार्य कसे उत्पन्न करतां येईल हें आपण या प्रकरणांत पाहिलें. **शाळा हें सहकारी तत्त्वावर चाललेलें कार्य आहे**, हें पूर्ण लक्षांत ठेवून आपण दुसऱ्या प्रकरणांत जाऊं या.

---

## प्रकरण दुसरें

# शिक्षक

शिक्षक कसा असावा ? पहिल्या प्रकरणांत म्हटल्याप्रमाणें तो ध्येयनिष्ठ असावा. शिक्षकाकडून विषयाचें ज्ञान मिळतें, परंतु मुख्यत: त्याचेपासून स्फूर्ति मिळते. शिक्षकापासून सर्व मिळालें पण स्फूर्ति मिळाली नाहीं तर तें शिक्षण काय कामाचें ? निरलस शिक्षकाकडे पाहिल्याबरोबर आपणही निरलस व्हावें; पडेल तें कार्य करण्यास तत्पर असलेल्या शिक्षकास पाहिलें म्हणजे आपणही तसेंच व्हावें असें मुलांना वाटतें. आपल्या शीलाची छाप दुसऱ्यावर चटकन् बसविणें ही गोष्ट स्फूर्तिकारक शिक्षकच करूं शकतील. एक दिवा दुसऱ्या दिव्यावर आपण पेटवितों. आपला दिवा पेटलेलाच नसेल तर आपण दुसऱ्या दिव्याला कसें पेटवूं शकणार ! म्हणून आपण अगोदर तेवत राहिलें पाहिजे. जी सुधारणा मुलांमध्यें घडवून आणावयाची आहे, ती अगोदर

आपणामध्यें झाली पाहिजे. ख्रिस्त, तुकाराम या संतांचे मार्गे हजारों लोक आहेत. याचें कारण त्यांनीं धर्म केवळ सांगितला नाहीं तर आचरून दाखविला. शत्रूशीं देखील मित्रत्वाचे दृष्टीनें पाहावयाचें हें ख्रिस्तानें आचरून दाखविलें, म्हणून ते श्रेष्ठ ठरले. शाळा साफ करावयाची आहे. मुलांनीं ती साफ करावी असें आपण इच्छितों, परंतु शिक्षकानें अगोदर केरसुणी हातीं घेतली पाहिजे. शेतांत मुलांनीं कामें करावींत, परंतु मी मात्र चिखलांत हात घालणार नाहीं, असें शिक्षकानें म्हणून कसें भागेल!

दुसरी गोष्ट जे विषय मुलांना शिकवावयाचे त्यांची पूर्ण जाणीव शिक्षकांस असावयास पाहिजे. जीं क्रमिक पुस्तकें मुलें वाचतात, तींच पुस्तकें तेवढीं शिक्षक वाचतील तर त्यांना आपला विषय आकर्षक करून शिकवितां येणार नाहीं. इतिहास शिकवावयाचा असेल तर इतिहासाचीं इतर पुस्तकें वाचून जास्त ज्ञान मिळविलें पाहिजे. सध्याचे ट्रेनिंग कॉलेजांतून पद्धतीचें शिक्षण दिलें जातें, परंतु विषयाची माहिती चांगली मिळाली नसेल तर पद्धत लंगडी पडते. प्याला भरला म्हणजे तो जसा वहावयास लागतो, त्याचप्रमाणें विषयाचें ज्ञान पूर्ण झालें म्हणजे त्यांतून पद्धति आपोआप जन्मास येते, असें कांहींचें म्हणणें आहे. यासाठीं आपल्या विषयांचें ज्ञान शिक्षकानें मिळविण्याचा प्रयत्न करावा. शाळेमध्यें शिक्षकांस लागणारें स्वतंत्र ग्रंथालय असावें. त्यांतून एकादा उतारा मुलांना उतरून द्यावा, या योगें मुलांनाही वाटेल कीं इतिहास म्हणजे पाठ्य—पुस्तकांत जेवढा आहे तेवढाच नसून त्याबाहेर कितीतरी पुस्तकें इतिहासाचें ज्ञान देणारीं आहेत. स्कूल बोर्डाकडून कांहीं पुस्तकें दिलीं जातात, परंतु या कामीं शिक्षकानेंही आणखी कांहीं मागणी केल्यास बोर्ड ती पुरविल्याशिवाय राहणार नाहीं. बोर्डाकडून अशीं पुस्तकें मिळत नसतील तर शिक्षक—संमेलनामध्यें ठराव करून खटपट

करावी. बोर्डाचे सभासदांना संमेलनास बोलवावें व त्यांना आपल्या अडचणी कळवाव्यात. आडांत नसेल तर पोहऱ्यांत कोठून येणार, हें त्यांना पटवून द्यावें. शिक्षकाचें ज्ञान तटपुंजें असेल तर शिक्षक तरी मुलांना काय व किती देऊं शकणार ? शिक्षकांची लायब्ररी प्रत्येक शाळेंत असावयास पाहिजे व शिक्षकांनीं तिचा उपयोग करावयास पाहिजे.

कांहीं ठिकाणीं पुस्तकालयें आहेत, परंतु त्यांचा उपयोग शिक्षक मंडळी करीत नाहीं, अशी तक्रार सुपरवायझिंग ऑफीसरांकडून ऐकूं येते. शाळेच्या उपयोगाकरितां उपयुक्त मासिकें घेण्यांत येतात, परंतु तीं उघडूनही पाहाण्यांत येत नाहींत. ही अनास्था शिक्षकानें टाकून द्यावयास पाहिजे.

ध्येय ठरविलें, विषयाचा अभ्यास केला; नंतर तो विषय मुलांपुढें कसा मांडावयाचा याविषयीं विचार व्हावयास पाहिजे. हा विचार ट्रेन्ड शिक्षकानेंच करावयाचा, बाकीच्यांनीं तो करावयाचा नाहीं किंवा त्याला तो करतां यावयाचा नाहीं, असें नाहीं. ट्रेन्ड शिक्षकांच्या सान्निध्यानें पाठ देण्याची कला अन्ट्रेन्ड शिक्षकाला थोडी थोडी अवगत झाल्याशिवाय राहणार नाहीं. विषय कोणताही घ्या. त्या विषयांत मुलांचें ज्ञान कितपत आहे हें प्रथम पाहिलें पाहिजे. हे पाहिल्यानंतर नवीन ज्ञान अवगत असणाऱ्या ज्ञानाशीं पारखून मिळवावयाचें असतें. पुष्कळ वेळ शिक्षकांचा पाठ निरस होतो, याचें कारण शिक्षकांना मुलांच्या ज्ञान–पातळींत स्वत:ला आणतां येत नाहीं, हेंच होय. शिक्षक पुष्कळ माहिती देतात, मोठ्यानें ओरडून सांगतात, परंतु ती माहिती मुलांचे डोक्यांत शिरत नाहीं. मुलांचे अनुभव काय आहेत हें शिक्षकांनीं पाहिलें पाहिजे व त्या अनुभवाशीं किंवा पूर्व ज्ञानाशीं नवीन ज्ञानाचा संबंध लावून दिला पाहिजे. असें होईल तरच मुलांची समज पटेल. नाहीं तर ती पटणार नाहीं. निरनिराळे विषय कसे शिकवावें याविषयीं लहान मोठीं

पुस्तकें छापून प्रसिद्ध झालीं आहेत. तीं शिक्षकानें—विशेषतः अन्ट्रेन्ड शिक्षकानें—अवश्य वाचावीत.

शिक्षकाचें काम यशस्वी होण्यासाठीं आणखी कांहीं गोष्टी शिक्षकानें करावयास हव्यात. मुलांविषयीं त्याचे ठिकाणीं प्रेम वसलें पाहिजे. मुलांच्या हातून पुष्कळ वेळां चुका होतात, परंतु त्या कशा घडतात, त्या चुकांच्या मागें कोणती परिस्थिति कारणीभूत आहे हें समजावून घेतलें पाहिजे. 'तुला शाळेला उशीर झाला, कर हात पुढें, घे दोन छड्या' असें म्हटलें म्हणजे आपण शिस्तीचें पालन करणारे आहोंत, असें होत नाहीं. त्या मुलाच्या घरीं कोण माणसें आहेत, त्याची आई आजारी आहे कीं काय; कीं त्यालाच स्वतः स्वयंपाक करावा लागतो. घरीं कुटुंबांत भांडणें आहेत काय व त्याचा परिणाम मुलांवर होतो काय हेंही पाहिलें पाहिजे. हें पाहाण्यासाठीं त्याच्या घरींही जावयास पाहिजे. खेड्यांतील शाळांमधून ही गोष्ट फारशी अवघड नाहीं. शिक्षक मधून मधून मुलांच्या घरीं जातील तर पालकांना शिक्षकाबद्दल व पर्यायानें शाळेबद्दल आपुलकी वाटेल.

येथपर्यंत शिक्षकांविषयीं आपण विचार केला. शिक्षकास ध्येय पाहिजे, त्याला जे विषय शिकवावयाचे त्यांचें ज्ञान पाहिजे. तें कोणत्या पद्धतीनें शिकवावयाचे याची कल्पना पाहिजे व शेवटीं विद्यार्थ्यांबद्दल त्याला आपुलकी वाटली पाहिजे. यानंतर आपण हेडमास्तर यांचे कर्तव्याकडे वळूं.

एक शिक्षकी शाळेंत शिक्षक हा शिक्षक व हेडमास्तर असतो. हेडमास्तरचे ठिकाणीं अवश्य लागणारे गुण त्याचे ठिकाणीं असावे लागतात. तसें नसेल तर तो एक-शिक्षकी शाळेवर काम करण्यास लायक ठरत नाहीं. कित्येक शिक्षक असिस्टंट मास्तर म्हणून चांगलें काम

करतात. परंतु चांगले असिस्टंट, चांगले एक-शिक्षकी शाळेचे मास्तर किंवा स्कूल—मास्तर होतील, असा नियम नाहीं.

ज्या गोष्टी शिक्षकास आवश्यक त्याही हेडमास्तरास आवश्यक असतात. शिक्षकापेक्षां त्याचे ठिकाणीं जादा गुण असावे लागतात. या विषयीची कल्पना पहिल्या प्रकरणांत दिलेली आहे. शिक्षक स्वत: काम करील, परंतु त्याला दुसऱ्याकडून काम करवून घेतां आलें तर तो हेडमास्तर होईल. शिक्षक जसा मुलांकडून प्रेमानें काम करवून घेतो, तद्वत् हेडमास्तरनें असिस्टंट शिक्षकांकडून काम करवून घेतलें पाहिजे. काम कसें करावें हें हेडमास्तरला दाखवितां आलें पाहिजे. ज्याला स्वत: उत्तम पाठ घेतां येत नाहीं त्या हेडमास्तराला आपल्या असिस्टंट शिक्षकानें चांगला पाठ घ्यावा, अशी अपेक्षा करतां येणार नाहीं.

पांच पांडवांमध्यें काय करावयाचें व काय न करावयाचें हें जसें धर्मानें सांगावयाचे व सांगितलेलें भीमानें, अर्जुनानें व इतरांनीं आचरावयाचें; त्याचप्रमाणें शाळेच्या कारभारामध्यें सर्वच धर्म होऊं शकत नाहींत. हेडमास्तरनें मार्ग दाखवावयाचा व बाकीच्या शिक्षकांनीं त्याच्या आज्ञेचें पालन करावयाचें. यानें शिस्त राहाते. भीमाला जसें धर्म होतां येत नाहीं, तसें वाटेल त्याला मार्गदर्शक होतां येणार नाहीं. त्याला तपश्चर्या लागते. उपजतच सर्व गुण कोणी घेऊन येत नाहीं. कांहीं या जन्मींहि पैदा करावे लागतात. हेडमास्तरचे गुण अंगीं आणण्याचा प्रयत्न केल्यास ते गुण मिळवितां अशक्य आहे असें आमचें म्हणणें नाहीं; तें कष्टानें साध्य होणारे आहेत, एवढाच अर्थ.

शिक्षकाला आपल्या वर्गांतील मुलांची माहिती असावी लागते; हेडमास्तरला शाळेंतील सर्व मुलांची माहिती असावी लागते. विशिष्ट पालकांची शाळेकडून काय अपेक्षा आहे हें त्यानें समजावून घेतलें

पाहिजे. हेडमास्तर ज्या वर्गांना शिकवितात, त्या मुलांची त्यांस माहिती असते. बाकीच्या वर्गांतील मुलांची फारशी चौकशी तो करीत नाहीं. शाळा फार मोठी असेल तर सर्वांची त्याला माहिती रहात नाहीं व असें होऊं नये यासाठीं शाळेंतील मुलांची संख्या ३०० चे वर असूं नये, असें कांहीं तज्ज्ञांचें मत आहे. ज्या वर्गाशीं आपला संबंध येत नाहीं अशा वर्गावर मधून अधून गेल्यास किंवा मुलांची माहिती व्हावी यासाठीं या वर्गांतील सर्व मुलांना आळीपाळीनें आपल्याकडे बोलावल्यास ही माहिती मिळणें कठीण होणार नाहीं. मुलास पाहिल्याबरोबर त्याचें नांव, त्याच्या वडिलाचा धंदा व त्याच्या कुटुंबांतील विशेष परिस्थिति त्याचे लक्षांत आली पाहिजे.

हेडमास्तरानें शिस्तीचा अवलंब केला पाहिजे, त्याचे विषयीं एक प्रकारचा दरारा किंवा भीति वाटली पाहिजे, परंतु त्याविषयीं प्रेमही वाटलें पाहिजे. आपल्या कांहीं अडचणी असतील तर त्या घेऊन मुलें हेडमास्तरकडे न भितां गेली पाहिजेत. दरारा ज्यांचे हातून चुका होतात त्यांना वाटतो. ज्यांचे कांहीं चुकत नाहीं त्यांना हेडमास्तरबद्दल भय बाळगण्याचें कारण नाहीं. आपण पाप केलें तर देव आपणांस दंड करील ही भीति परमेश्वराबद्दल जशी आपल्या अंतःकरणांत वास करते, तशी भीति हेडमास्तरबद्दलही राहिली पाहिजे. परंतु निष्पाप मनुष्यास देवाची भीति वाटण्याचें कारण नाहीं.

शाळेचें काम वाटतांना हेडमास्तरानें कोणत्या शिक्षकाकडे कोणता वर्ग व कोणता विषय द्यावयाचा हें ठरविलें पाहिजे. प्राथमिक शाळेंत शिक्षकांची वांटणी विषयवार न होतां वर्गवार होते. पाश्चिमात्य देशांमध्यें प्राथमिक शाळेंत देखील विषयवार वांटणी केली जाते. आपल्याकडे हाय-स्कूलमध्यें व तेथेंही विशेषतः वरचे वर्गांत, विषयवार वांटणी होते.

कांहीं मोठ्या प्राथमिक शाळांमधून विषयवार वांटणी करण्यांत येते. व्हर्न्याक्युलर फायनल क्लासांतील सर्वच अभ्यास एकाच शिक्षकाकडे सहसा देण्यांत येत नाहीं.

वर्गवार वांटणी करावयाची झाल्यास ज्या शिक्षकांना लहान मुलांमध्यें काम करणें आवडतें, अशा प्रेमळ शिक्षकांना खालचे वर्ग द्यावेत. विशेषत: ट्रेन्ड शिक्षक बालवर्गावर पाठवावा. बालवर्ग व पहिली या इयत्तांवार स्त्री-शिक्षकिणींची योजना कांहीं ठिकाणीं होऊं लागली आहे. ट्रेनिंग कॉलेजांतील प्रॅक्टिसिंग स्कूलमधून कांहीं शिक्षकिणी घेण्यांत येत आहेत. पाश्चिमात्य देशांतील लोक जेव्हां हिंदुस्तानांत येतात, तेव्हां प्राथमिक शाळेंत पुरुष शिक्षक पाहून त्यांना नवल वाटतें. प्राथमिक शाळेंतील सर्व शिक्षक स्त्री वर्गाचे असावेत असें त्यांचें म्हणणें असतें, त्यांच्या शिक्षकांकरितां लिहिलेल्या पुस्तकांमध्यें शिक्षकांचा स्त्रीलिंगी म्हणून उल्लेख केलेला असतो. आपल्याकडेही शिक्षकांमध्यें स्त्री-शिक्षकांचें प्रमाण हळू हळू वाढत जाण्याचा रंग दिसत आहे. तरी पण प्राथमिक शाळेंत सर्वच स्त्री-शिक्षकिणी होण्यास बराच काळ लागेल असें वाटतें.

शिक्षकाचा स्वभाव पाहून त्यास वर्ग द्यावा व विषयाचें ज्ञान पाहून त्याचेकडे देण्यांत येणाऱ्या विषयांची निवड करण्यांत यावी. निवड झाल्यावर वर्ग किंवा विषय नेहमीं नेहमीं बदलूं नयेत. ज्या शाळांतून ट्रेन्ड शिक्षकांचें प्रमाण समाधानकारक आहे, तेथें शिक्षक वर्गवार न देतां मुद्दावार दिला जातो. म्हणजे जो शिक्षक आज बालवर्ग घेतो, तो पुढच्या वर्षीं पहिली घेतो; नंतर दुसरी घेतो व शेवटीं चौथीपर्यंत जातो. ह्या योजनेनें एका विशिष्ट मुलांची जबाबदारी शेवटपर्यंत एकाच शिक्षकावर राहते. ही विद्यार्थ्यांची तुकडी कच्ची राहिली तर त्याचा सर्व

शिक्षकाकडे येतों. ' मग मी काय करूं, खालच्या वर्गांतून मुलें कच्चीं आलीं ' अशी सबब त्याला सांगतां येत नाहीं. बालवर्गापासून चौथें इयत्तेपर्यंत सर्व विषय आपण शिकवूं अशी धमक प्रत्येक शिक्षकामध्यें असावयास पाहिजे; या शिक्षकांच्या बदल्या सहज होतां कामा नयेत. होतां होईतों मुलांची भरती बालवर्गांतच झाली पाहिजे; तरच ही योजना सफळ ठरते. कांहीं ठिकाणीं शिक्षकांचे दोन भाग पाडले जातात. एका गटानें बालवर्ग, पहिली व दुसरी घ्यावयाची व दुसऱ्या गटानें तिसरी व चौथी घ्यावयाची. प्रत्येक वर्षी नवीन मुलें शिकविण्याची पाळी आली म्हणजे त्यांचे स्वभाव समजावून येण्यास कांहीं दिवस-नव्हे कांहीं महिने-शिक्षकांचे जातात. तींच मुलें एका शिक्षकाचे हाताखालीं एकापेक्षां अधिक वर्षें ठेविल्यास ही आपत्ति टळते. ही योजना बोर्डाच्या किंवा म्युनिसिपालिटीच्या शाळांपेक्षां खाजगी शाळांमध्यें—जेथें ट्रेन्ड शिक्षकांचें प्रमाण जास्त आहे तेथें—जास्त फलदायी होते, असा अनुभव आहे.

आपल्याकडे हेडमास्तर हा नेहमीं वरचा वर्ग शिकवितो. पाश्चिमात्य देशांमध्यें त्यांचेकडे बालवर्ग बहुधा दिला जातो. बालवर्ग कोणीही शिकवावा अशी आपली कल्पना झालेली असते. बालवर्गाचें काम दिसतें तितकें सोपें नाहीं. शाळेचें यश बालवर्गाचे यशावर अवलंबून आहे. कोणत्याही कार्याचा प्रारंभ नीट व्हावा लागतो. सुरवात चांगली झाली म्हणजे अर्धे काम झालें म्हणून समजावें. बालवर्गांत मुलें दोन दोन वर्षें राहूं लागली म्हणजे शाळा यथातथाच आहे म्हणून समजण्यास हरकत नाहीं.

हेडमास्तरांनीं विषयांची व शिक्षकांची वांटणी केली. त्याप्रमाणें काम चोख होतें कीं नाहीं हें वरचेवर पहावयास पाहिजे. ज्यावेळीं त्यास वेळ

असेल त्यावेळीं एकादे शिक्षकाचे तासाला मुलांमध्यें बसावें व पाठ पहावा. त्या पाठासंबंधीं ज्या सूचना द्यावयाच्या त्या वर्गांत मुलांसमक्ष न देतां शिक्षकाला आपल्या ऑफिसांत बोलावून देत जाव्यात. वर्गांमध्यें मुलांसमक्ष शिक्षकाच्या चुका दाखविल्यास शिक्षकाचा दरारा त्या वर्गावर रहाणार नाहीं. शिक्षकाचे ठिकाणीं विद्यार्थ्यांचा जो भाव असावयाचा तो या योगें ढिलावेल. या बाबतींत मोठमोठया शाळाधिकाऱ्यांच्याही चुका होतात. शाळा तपासण्याकरीतां जेव्हां ते जातात त्यावेळीं शिक्षकांच्या चुका वर्गांमध्यें मुलांसमक्ष दाखविण्यास ते कमी करीत नाहींत. अधिकारी बोलत असल्यामुळें आपलें म्हणणें काय आहे, हेंही बिचाऱ्या शिक्षकास पुढें मांडतां येत नाहीं, व यामुळें तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी त्याची केविलवाणी स्थिति होते.

मोठया शाळेमध्यें सर्वच विषयाची जबाबदारी हेडमास्तरनें न घेतां विषयवार मंडळें करावींत व मंडळांतील अनुभविक शिक्षकाकडे त्या मंडळाच्या अध्यक्षाचें काम सोंपवावें. या मंडळाची सभा महिन्यांतून निदान एक तरी भरवावी व सभेंत कोणकोणतीं कामें झालीं हें एका पुस्तकांत—प्रोसिडिंग बुकांत—नोंदण्यांत यावें. विषय कोणत्या रीतीनें शिकविण्यांत यावा यांविषयीं सभेंत खल व्हावा. मंडळांतील अनुभविक शिक्षकानें पाठ घ्यावा. अशा रीतीनें त्या विषयांतील सर्वसाधारण पद्धत कळल्यानें नवख्या शिक्षकांचा पुष्कळ फायदा होण्यासारखा आहे. प्रत्येक वर्षाचें वर्गवार अंदाजपत्रक या मंडळानेंच तयार करावें, व वर्षाखेर ते अभ्यास झाले कीं नाहीं हें पाहावें. कधीं कधीं एकाद्या वर्षी एकाद्या विषयाची बरीच हेळसांड होते व ही गोष्ट मुलें वरच्या वर्गांत येईतोंपर्यंत हेडमास्तरांच्या लक्षांत येत नाहीं. वरील प्रकारचीं मंडळें स्थापन केल्यास ही आपत्ति टळण्यासारखी आहे.

विषयावर मंडळें स्थापन केलीं तरी सर्व शिक्षकांची सभा महिन्यांतून एकदां तरी भरविण्यांत यावी. या सभेचें अध्यक्षस्थान हेडमास्तर स्वीकारतील, परंतु शाळेच्या कामाच्या व्यतिरिक्त कांहीं विशिष्ट प्रश्नाचा विचार करावयाचा असल्यास कधीं कधीं असिस्टंट मास्तरासही अध्यक्ष-स्थान दिल्यास शिक्षक व हेडमास्तर यांच्यामध्यें विशेष सलोखा राह-ण्याचा संभव असतो. ज्या विषयांची चर्चा व्हावयाची असेल त्याविषयीं सूचना निदान आठ दिवस अगोदर सर्व शिक्षकांना देण्यांत यावी. असिस्टंट शिक्षकांपैकीं एकास या शिक्षक—सभेचे चिटणीस नेमावे. सभेंत झालेल्या कामांचें टांचण त्यानें घ्यावयाचें आहे. शाळा चालवितांना असे पुष्कळ प्रश्न हेडमास्तरांपुढें येतात व ते कसे सोडवावेत हें त्यांना कळत नाहीं. या सर्व प्रसंगीं जर शाळेच्या सर्व शिक्षकांचा सल्ला घेतला तर ते प्रश्न चांगल्या तऱ्हेनें सुटतात, इतकेंच नव्हे तर शाळा चालविण्याची जबाबदारी आपणां सर्वांवर आहे ही जाणीव सर्व शिक्षकांमध्यें उत्पन्न होते.

शाळेंतील अभ्यास व एकंदर शिस्त हें हेडमास्तरनें पाहावयाचें असतें. याशिवाय ज्या ज्या गोष्टींचा शाळेवर बरावाईट परिणाम होण्या-सारखा असेल त्यांकडेही त्यांस पहावें लागतें. केवळ शालागृह स्वच्छ ठेवून भागत नाहीं, तर शाळेचें आवारही स्वच्छ ठेवावें लागतें. लोकल-बोर्डाच्या कांहीं शाळांना मोठीं आवारें आहेत, परंतु तीं बंदिस्त नसल्यामुळें गांवकऱ्यांपासून किंवा जनावरांपासून उपसर्ग पोहोंचतो. शाळा बांधून झालेली असते, परंतु पैसे खर्च करून कंपौंड बांधण्याची ऐपत बोर्डास नसते किंवा पैसे असून त्याचा उपयोग कंपौंडचे कामीं खर्च करण्याची तयारी बोर्ड दाखवीत नाहीं, अशा वेळीं गांवकऱ्यांच्या सहानभूतीनें शाळेची अडचण दूर करण्याचा प्रयत्न करावा. प्रमुख गांवकऱ्यांना बोलावून

आणून शाळेशेजारीं गांवकऱ्यांकडून होत असलेली घाण त्यांचे नजरेस आणावी. गांवकऱ्यांना स्वच्छतेची फारशी कल्पना नसते व यामुळें सतत खटपट न केल्यास यश लाभत नाहीं. केवळ एकदां लोकांना सांगून भागत नाहीं ' एथें तुमचींच मुलें बसावयाचीं आहेत ' अशी कल्पना त्यांना द्यावी, / म्हणजे त्यांचे डोक्यांत थोडा प्रकाश पडण्याचा संभव आहे.

शाळेच्या गरजा सरकारकडून किंवा बोर्डाकडून पुऱ्या पाडल्या जात नाहींत, यासाठीं गांवकऱ्यांना नेहमीं भेटून शाळेच्या गरजा त्यांचे पुढें मांडाव्यात. ' बोर्डाची शाळा, आम्हांला काय करावयाचें आहे खर्च करून ' असें ते म्हणण्याचा संभव आहे; परंतु बोर्डाचीही परिस्थिती त्यांना समजावून सांगून ' दसकी लकडी एकका बोजा ' या न्यायानें वेगवेगळ्या गृहस्थांकडून वेगवेगळीं कामें करवून घ्यावीत.

/ हेडमास्तरांचें काम फार कठीण आहे. हेडमास्तरांचीं सर्व कामें उत्तम तऱ्हेनें होणें कधींच शक्य नाहीं, असें एकानें म्हटलें आहे, तें खरें आहे. प्रत्येकानें शक्य तितकें जास्त काम करून नमुनेदार हेडमास्तर बनण्याचा प्रयत्न करावा./

---

## प्रकरण तिसरें

# शिस्त

शाळेमध्यें शिस्त असावयास पाहिजे, परंतु ही शिस्त सहजासहजीं प्राप्त होत नाहीं. त्यासाठीं फार प्रयास पडतात. एकादें काम बिनबोभाट नियमानुसार होऊं लागलें म्हणजे तें शिस्तीनें होत आहे, असें आपण म्हणतों. 'शिस्तीनें चाललेल्या कामामध्यें एक प्रकारची व्यवस्था,

नीटनेटकेपणा आपणास दिसून येतो. शिक्षक नियम पाळतात, मुलेंही नियम पाळतात. सर्व नियमानें काम करणारे आहेत हें एकमेक ओळखतात व त्यायोगें शिस्तीचें पालन होतें. केवळ धाकदपटशानें शिस्त रहात नाहीं. शिस्त म्हणजे स्तब्धता नव्हे. मुलें देवासारखीं हात जोडून किती वेळ बसतील ? देवासारखें स्वस्थ बसणें हें त्यांना शक्य नाहीं, तो त्यांचा धर्म नाहीं.

एका कामाचे अनेक वेगवेगळे भाग पडतात. प्रत्येक भाग चांगला तयार होण्यासाठीं सारखा प्रयत्न व्हावा लागतो. हा प्रयत्न होईल तर संवय जडेल व संवयीनें शिस्तीचें पालन आपोआप होतें. शिपाई हुकुमाप्रमाणें सर्व हालचाली बरोबर करितो, परंतु किती तरी दिवस त्याला हें शिक्षण द्यावें लागतें. तीच गोष्ट मुलांची आहे. प्रश्न विचारला असतां उभें कसें रहावें, पुस्तक कसें धरावें वगैरे गोष्टी अनेक वेळां सांगाव्या लागतात. कुबड काढून बसूं नये. पाठीचा कणा ताठ ठेवावा. पाठीचा कणा ताठ राहिल्यानें आरोग्य वाढतें, हेंही मुलांना सांगावें. नुसता हुकूम करून मुलांना ऐकावयाला लावण्यापेक्षां हुकूम करण्याचें कारण कां पडलें, हेंही मुलांना समजूं द्या म्हणजे शाळेच्या शिस्तीला मुलांचें पाठबळ मिळेल. शिक्षक आहेत तोंपर्यंत वर्ग शांत असतात. आपणांस वाटतें कीं शाळेची शिस्त फार चांगली आहे. शिक्षक वर्गांतून गेला तरी जर शांतता कायम राहील, तर मुलांमध्यें शिस्त आहे असें म्हणतां येईल.

शिस्त रहावी यासाठीं आपण नियम करतों. मुलांच्या माहितीसाठीं ते फलकावर लावितों. आपणाला वाटतें कीं, उद्यांपासून आतां शाळेच्या शिस्तीमध्यें एकदम फरक पडेल. परंतु जादूची कांडी फिरल्याप्रमाणें हा फरक पडत नाहीं. एकच नियम करावा व त्याचें पालन मुलांकडून होतें कीं नाहीं तें पाहावें. मुलें कागद फाडून कोठेंहि टाकितात. कागद

फाडून टाकूं नये, असें आपण कळविलें तरी अज्ञानपणें मुलें कागद फाडून टाकीतच असतात. वर्गांत फाडून टाकलेले कागदाचे तुकडे उचलून बाहेर टाकावेत. हें एकदांच टाकून भागणार नाहीं. रोज वर्ग सुरू होण्यापूर्वीं शिक्षक जर पाहतील तर १५ दिवसांचे आंत शिक्षकांना कागदाचा एक तुकडाही दिसावयाचा नाहीं.

मुलांनीं नियमाचें पालन तावडतोब करावें असें आपण इच्छितों. परंतु तें त्यांची इच्छा असली तरी शक्य होत नाहीं. आपण आपल्या घरोघर नांवाचा फलक लावितो, त्या फलकावर 'आहेत' व 'नाहींत' अशीं अक्षरें असतात. आपण ज्यावेळीं बाहेर जातो त्यावेळीं फलकावर 'आहेत' हा शब्द झांकून 'नाहींत' हा शब्द उघडा ठेवीत असतो. परंतु ज्यांनीं या बाबतींत अनुभव घेतला आहे त्यांना कळून चुकलें असेल कीं, आपली इच्छा असली तरी बाहेर जातांना फलकावरील अक्षरें बदलण्याचें राहून जातें व आपण बाहेर गेलों असतांही घरांत आहोंत हेंच पाटी सांगत असतें. ही जर थोरांची गोष्ट तर लहान मुलांची काय स्थिति ? नियमानें एक एक चांगली संवय लावण्याचा शिक्षकांनीं प्रयत्न केला तर मुलांच्या चांगल्या संवयी वाढूं लागतात, व कोणीही परका मनुष्य शाळेंत आला तर त्याला शाळेंत कांहीं तरी विशेष आहे असें आढळून येतें.

शिस्त म्हणजे नियमाचें पालन व हें पालन केवळ जबरदस्ती म्हणून नव्हे तर नियम म्हणून ते पाळावयाचे ही अवघड गोष्ट आहे. यास फार वेळ लागतो. शिस्तपालन मुलांकडून लवकर व्हावें यासाठीं वडिलांकडून भीति, धाक दाखविला जातो. कधीं कधीं मारहि दिला जातो. 'मला अमुक एक गोष्ट आवडते म्हणून ती तूं कर, तुला ती आवडो किंवा नावडो' असा जबरदस्तीचा तो कायदा होऊन बसतो.

शिस्त राखण्यासाठीं मुलांना शिक्षा करावी किंवा नाहीं; असा प्रश्न आतां उपस्थित झाला. शारीरिक शिक्षा करावयास कांहीं हरकत नाहीं परंतु ती फारच थोड्या वेळां करण्यांत यावी. शिक्षा करतांना मुलांना हें कळणें जरूर आहे कीं, ही शिक्षा आपणाला आपण मोडलेल्या नियमामुळें होत आहे. शिक्षकानें शिक्षा करतांना शिक्षा करणें हें माझ्या जिवावर आलें आहे, माझा नाइलाज म्हणून ही शिक्षा करावी लागत आहे, असें आपल्या वर्तनानें दाखविलें पाहिजे; नाहीं तर ही शिक्षा आपल्या चुकांचा परिणाम नसून शिक्षकाच्या रागीट स्वभावाचा हा परिणाम आहे, असा विद्यार्थ्यांचा समज व्हावयाचा. शिक्षेचा हेतु मुलांनीं वाईट वर्तन टाळावें हा असतो, परंतु शिक्षकानें रागानें शिक्षा केल्यास त्याचा परिणाम वर्तन सुधारण्यांत न होता शिक्षकाविषयीं द्वेष निर्माण होण्यांत होतो. शिक्षा दिल्यानंतर शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्यें पूर्वींचा सलोखा राहिला पाहिजे. शिक्षा केल्यानंतर शिक्षक विद्यार्थ्याकडे, ज्या ज्या वेळीं तो त्यास भेटेल तेव्हां, जर डोळे वटारून किंवा कपाळाला आंठ्या घालून पाहील, किंवा विद्यार्थीही शिक्षकाला टाळण्याचा प्रयत्न करील, तर शिक्षेचा दुरुपयोगच झाला असें म्हणावें लागेल.

शिक्षा करण्यापूर्वीं शिक्षकामध्यें जी मनाची शांतता दिसते ती शिक्षा करतांना रहात नाहीं, असा सर्वसाधारण अनुभव आहे. आनंदानें वीष खाणें जसें कठीण, त्याचप्रमाणें हंसत हंसत शिक्षा करणें कठीण. गुन्ह्याबद्दल दोन छड्या माराव्याच्या, असा शिक्षकाचा अगोदर संकल्प झालेला असतो; परंतु विद्यार्थ्यानें छडी चुकविण्याचा किंवा छडी मारण्यापूर्वींच मोठ्यानें ओरडण्याचा प्रयत्न केला, तर शिक्षक रागावतो व दोन छड्या मारण्याचा संकल्प ढासळून बिचाऱ्या विद्यार्थ्याला पुष्कळच छड्या खाव्या लागतात. शिक्षा ज्या गुन्ह्याबद्दल करावयाची तो गुन्हा बाजूला राहून, शिक्षकानें हात पुढें कर असें सांगितलें असतां, मुलानें हात पुढें

केला नाहीं, यांत मुलानें शिक्षकाचा उपमर्द केला, या नवीन गुन्ह्याबद्दल नवीन व मोठी शिक्षा करण्यास शिक्षक पुढें सरसावतो. ही शिक्षा करतांना शिक्षकाचा विचाराचा तोल झुकतो. माझा अपमान केला म्हणून शिक्षा व याचा परिणाम शिक्षक व विद्यार्थी यांच्या वैमनस्यांत होतो.

ही परिस्थिति टाळण्यासाठीं कित्येक शिक्षक स्वतः हातांत छडी घेत नाहींत; दुसऱ्या मुलाकडून शिक्षा करवितात किंवा गुन्हेगारालाच स्वतःला शिक्षा ध्यावयास सांगतात. टेबलावर तूं आपला हात उलटा करून मार, आंगठे धर, खुर्ची घे, तोंडांत मारून घे, वगैरे शिक्षेचे प्रकार सर्वांच्या परिचयाचे आहेत. या शिक्षेच्या योगानें शिक्षकाबद्दल विद्यार्थ्यांच्या मनांत तेढ उत्पन्न होत नाहीं. कित्येक ठिकाणीं ही मार देण्याची जबाबदारी हेडमास्तरावर सोंपविली जाते. शिक्षकाचे दृष्टीनें विद्यार्थी गुन्हेगार असतो; परंतु तो खरोखरीच गुन्हेगार आहे किंवा नाहीं, हें तिसऱ्यानें ठरवायाचें हें न्यायदानाचे दृष्टीनें जास्त श्रेयकर. पोलिस व आरोपी यांची चौकशी ज्याप्रमाणें मामलेदारापुढें होते, त्यासारखाच जवळ जवळ हा प्रकार आहे.

शारीरिक शिक्षा करतांना जी गोष्ट शिक्षकानें लक्षांत ठेवावयाची तीच हेडमास्तरानेंही लक्षांत ठेवावयास पाहिजे. शिक्षकापेक्षां हे जास्त समजूतदार, म्हणून शिक्षा करण्याची बाब हेडमास्तराकडे सोंपविली आहे. शिक्षकाचे दृष्टीनें एकाद्या गुन्ह्यास शिक्षा मिळणें जरूर आहे असें वाटलें, तरी हेडमास्तरानें गुन्ह्याची चौकशी करून, गुन्हा शिक्षा करण्याच्या लायकीचा आहे किंवा कसें, हें पाहावें. शिक्षकांकडून, गुन्हा समजावून घेतल्यानंतर विद्यार्थ्याला तो गुन्हा करावयास काय कारण झालें, याची बारकाईनें परंतु प्रेमळपणानें चौकशी करावी. शिक्षकानें ही बाब आपल्याकडे पाठविली आहे, तेव्हां यांत मुलाचीच चूक आहे, असें अगोदर समजून रागानें प्रश्न विचारावयास जर सुर-

वात केली तर बिचारा विद्यार्थी काय उत्तर देणार? गुन्ह्याचें कारण जें खोल दडलेलें असतें, तें हेडमास्तरांचे लक्षांत येणार नाहीं.

मूल चुकतें पण तें कां चुकतें, त्यांत त्याचा किती वांटा आहे व परिस्थितीचा वांटा किती आहे हें पाहिलें पाहिजे. परिस्थितीवर मोठ्यांना ताबा चालवितां येत नाहीं, मग बिचाऱ्या अज्ञान मुलांना तो कसा चालवितां येईल, असा पोक्त विचार करून निर्णय द्यावयास पाहिजे. मुलाला शाळेंत येण्यास उशीर झाला, नव्हे त्याला नेहमीं उशीर होतो, म्हणून त्याला जबर शिक्षा न देतां, नेहमीं उशीर होण्यास खरोखर जबर असें कारण आहे काय, हें शिक्षकानें किंवा हेडमास्तरानें पाहावयास नको काय? घरीं आई आजारी आहे, तिच्याशिवाय स्वयंपाक करावयास दुसरें कोणी नाहीं. बाप नोकरीवर जातो, त्याची भाकरी पोहोंचवावी लागते व ती पोहोंचविल्याशिवाय आई जेवणच देत नाहीं. घरांत आई व आजी यांचीं भांडणें आहेत किंवा आई व आत्या यांचीं भांडणें आहेत व स्वयंपाक करण्याचें कोणीच पत्करीत नाहींत. हीं व अशाप्रकारचीं अनेक कारणें असूं शकतील. घरांतील भांडणांचा मुलाचे मनावर परिणाम होणारच. कां उशीरा आलास, असें तुम्हीं दरडावून विचारल्यास बिचारा मुलगा काय उत्तर देणार? त्याचा घरचा सर्व ग्रंथ तो तुमच्यापुढें कसा वाचून दाखविणार? तुम्ही त्याचे पोटांत शिरून, त्याच्या कुटुंबांतील माणसांपैकीं तुम्ही एक, अशी त्याची भावना करून जर त्याला प्रश्न विचाराल तर सर्व गोष्टी उघडकीस आल्याशिवाय रहाणार नाहींत. चुकीचें कारण नाहींसें व्हावें असें जर शिक्षकाला वाटत असेल, तर त्यानें खोलांत शिरलें पाहिजे, परंतु एवढा दम असतो कोठें?

जेथें मुलाकडून कामांत चुकारपणा होतो तेथें तें काम किंवा तेंच जादा काम करवून घेण्याची शिक्षा द्यावी. शुद्धलेखन लिहून आणलें

नाहीं, तर तें शाळा सुटल्यावर त्या मुलाला एकट्याला बसवून त्याचे-कडून लिहून घ्यावें. अभ्यास चुकविणाऱ्या अशा मुलांचा एक जादा वर्गच कांहीं शाळांमधून भरविला जातो व त्यावर देखरेख करण्यासाठीं आळीपाळीनें कांहीं शिक्षकांची नेमणूक होते. ही शिक्षा फर्मावितांना विद्यार्थ्यांचे मनांत एखाद्या विषयासंबंधीं तिटकारा उत्पन्न होणार नाहीं याबद्दल काळजी घेणें जरूर आहे. शिक्षा म्हणून एकादें काम सदैव करावयास दिल्यास शिक्षा म्हणजे तें काम असें समीकरण तो विद्यार्थी आपल्या मनांत मांडीत असतो. शिक्षा म्हणून शुद्धलेखन मुलांना लिहा-वयास सांगा, परंतु प्रमाणाबाहेर हें काम जाऊं लागलें म्हणजेही तिटकारा उत्पन्न होतो. चुकलेले शब्द १० वेळां लिहा, हें सांगणें ठीक होईल; परंतु ते १००० वेळां लिहा असें सांगणें म्हणजे शिक्षकाचा विचार मला त्रास द्यावयाचा हा आहे, माझी सुधारणा व्हावी हा नाहीं, हें विद्यार्थी ओळखतो व शिक्षा करण्याचा जो हेतु तो सफळ होत नाहीं. कोणत्या गुन्ह्यास कोणती शिक्षा करावयाची हें ठरविणें सोपें नाहीं. वाटेल त्या गुन्ह्याला वाटेल ती शिक्षा देऊन भागत नाहीं.

**दंड**:—मुलांनीं अभ्यासांत दुर्लक्ष केलें किंवा वर्तनांत चूक केली तर दंड करण्याची कांहीं ठिकाणीं पद्धत आहे. अर्थात् खेड्यांतील शाळांतून असा दंड सहसा करण्यांत येत नाहीं, कारण दंड देण्यास कोणीच पालक तयार होणार नाहीं. हा दंड करण्यानें मुलाच्या चुकी-बद्दल पालकाला शिक्षा होते. पैसे मिळविण्याकरितां काय श्रम करावे लागतात याची कल्पना मुलाला नसते व यामुळें चार आणे दंड झाला काय व आठ आणे दंड झाला काय, त्यास सारखेंच, कित्येक वेळेस मुलांच्या चुकीस पालक कारण असतात. जेवावयास जावयाचें म्हणून सर्व दिवस घरीं ठेवून घेणें किंवा सबळ कारणाशिवाय मुलाला एकाद्या

घरच्या कामांत गुंतविणें, ह्या चुका पालक करीत असतात, व पालकांना आपल्या वर्तनाबद्दल अद्दल घडावी यासाठीं दंडाची शिक्षा केल्यास पालकांचे डोळे उघडण्याचा संभव आहे. परंतु होता होईतो दंडाची शिक्षा टाळणें हें बरें. पालकांचा व शिक्षकांचा सलोखा ज्या कारणानें मोडण्यासारखा आहे तें कारण उत्पन्नच न करणें बरें.

एकाद्या विद्यार्थ्याच्या सामानाचें किंवा शाळेच्या सामानाचें नुकसान केलें गेलें असेल, तर शाळेचें काम शिक्षा म्हणून करवून घेण्यास हरकत नाहीं. यायोगें झालेलें सर्व नुकसान भरून येईल असें नाहीं. शाळेच्या बागेमध्यें माळ्याबरोबर काम करावयास लावावें. मजुराकडून गवत काढण्याचें जें काम करावयाचें तें या मुलांकडून घेतां येईल. शाळेमध्यें कागद टाकून घाण केली तर शाळेच्या आवारांतील सर्व कागदांचे तुकडे उचलण्याची शिक्षा करावयास हरकत नाहीं. एकादें मुलांचें पुस्तक फेकून दिल्यामुळें फाटलें तर तें नीट शिवून देण्यास व त्यास पुठ्ठा घालण्यास सांगावें.

**नैतिक शिक्षा**:—शारीरिक शिक्षा करण्याचे ऐवजीं नैतिक शिक्षा करण्यापासूनही इष्ट कार्य साध्य होतें नैतिक शिक्षा ही शरीराला केलेली शिक्षा नसून ती मनाला केलेली असते. शारीरिक शिक्षा करण्याचा हेतूही ती मनाला व्हावी हा असतो. शारीरिक शिक्षा करतांना जर दक्षता ठेवावी लागते, तर मानसिक करतांना ती जास्त प्रमाणांत ठेवावयास पाहिजे. एकाद्याला चार छड्या मारून जो परिणाम होणार नाहीं तो दुसऱ्याला एक छडी मारून होतो. त्याचप्रमाणें एकाद्याला १० शब्द आपण रागानें बोललों तर जो परिणाम होणार नाहीं तो दुसऱ्याला एका शब्दानें होईल. कोणाला किती मार सोसवेल हें जसें पाहावयाचें, त्याचप्रमाणें कोणाला किती बोलणें सोसवेल हेंही शिक्षकानें पाहिलें पाहिजे. वर्गासमोर स्वतःच्या तोंडांत मारून घेऊन ‘मी पुन्हां असें

कधीं करणार नाहीं ' असें वदवून घेणें; एकादी मानाची जागा असेल तर ती त्यास सोडावयास लावणें; कोणीही मुलानें कांहीं दिवस त्या मुलाशीं कसलाच संबंध ठेवावयाचा नाहीं, त्याच्याशीं बोलावयाचें नाहीं व त्यास खेळावयासही घ्यावयाचें नाहीं; वगैरे प्रकारच्या शिक्षा कित्येक वेळेस फारच परिणामकारक होतात. कित्येक वेळेला मुलाचा अपमान होईल अशी शिक्षा वर्गांत दिली जाते. उदाहरणार्थ, लहान मुलांकडून तोंडांत मारविणें. अशा प्रकारची शिक्षा मुलास अपमानकारक होते, इतकेंच नव्हे तर त्या मुलाचे आईबापासही ती अपमानकारक वाटते शिक्षकानें निर्हेतुकपणानें जरी शिक्षा केली असली तरी या शिक्षेच्या योगानें लहानशा खेडगांवांत दोन कुटुंबांत भांडण लावण्याचें पाप शिक्षकाच्या पदरीं येतें. ही शिक्षा दिसण्यास सोपी दिसली तरी तिचा परिणाम मोठा होण्याचा संभव आहे.

ठोकळमानानें शिक्षेचे तीन प्रकार लक्षांत ठेवावें. ( १ ) शाळेला उशीर करून येणाऱ्या मुलास शाळा सुटल्यानंतर थोडा वेळ बसून ठेवावें. जितका वेळ त्यानें शाळा चुकविली तितका वेळ त्याचा भरून घेण्यासारखें यानें होणार आहे. ( २ ) गृहपाठ तयार केला नसेल तर तो शाळा सुटल्यानंतर त्याचेकडून करवून घ्यावा. ( ३ ) शाळेच्या किंवा इतर विद्यार्थ्यांच्या मालाची कोणी नुकसान केल्यास त्या नुकसानीची भरपाई पूर्णांशानें किंवा अल्पांशानें करण्यासाठीं मुलांकडून काम करवून घ्यावें. एका प्रकारच्या चुकीस दुसऱ्या प्रकारची शिक्षा करूं नये. शिक्षा कोणास कधीं व काय दिली याचे रजिष्टर ठेवावें.

शिक्षा करावयाची झाल्यास ती कोणी व कशी करावी याचा आपण विचार केला. नियमांचें उल्लंघन करणारास शिक्षा करावयाची व त्यायोगें नियम मोडणारांची संख्या शक्य तितकी कमी करावयाची हा आपला हेतु असतो. नियमाप्रमाणें वागणाराकडे आपण विशेष लक्ष देत नाहीं.

आतां दुसरी अशी पद्धत आहे कीं, ज्यायोगें वाईट वर्तन करणाराकडे कानाडोळा करून चांगलें वर्तन ठेवणाराकडे विशेष लक्ष द्यावयाचें. उशीरा येणाऱ्याला शिक्षा करण्याचे ऐवजीं वेळेवर येणाऱ्याला शाबासकी द्यावयाची, गुण द्यावयाचे. हेतु हा कीं उशीरा येणाऱ्यानेंही हे गुण मिळविण्याचा प्रयत्न करावा. या पद्धतीनें पुष्कळ कार्य होतें. घंटेचे गुण बुडतील म्हणून लवकर जेवण आटोपून मुलें शाळेला येतात. उदाहरणाचे गुण बुडूं नयेत म्हणून उदाहरणें न चुकतां मुलें करून आणतात. विशेषत: लहान मुलांमध्यें या पद्धतीचा चांगला फायदा दिसून येतो. बहुतेक प्रत्येक शाळेमध्यें कमी अधिक प्रमाणामध्यें या पद्धतीचा अवलंब केला जातो. वर्षांतून एकदां समारंभ करून अभ्यासांत किंवा खेळांत चांगली प्रगति दाखविणाऱ्या मुलांना कोणा तरी सद्गृहस्थांच्या हस्तें बक्षिसें वांटण्याची चाल आहे.

या पद्धतीमध्यें असा दोष दाखविण्यांत येतो कीं मुलें अभ्यासासाठीं धडपड न करतां गुणासाठीं धडपड करतात. गुण नसतील तर अभ्यासही नाहीं अशी स्थिती होते. हा जो दोष दाखविला आहे तो कांहीं अंशानें खरा आहे. अभ्यासाकडे लक्ष नाहीं किंवा अभ्यासाविषयीं प्रेम उत्पन्न झालें नाहीं, म्हणून गुण आहेत; परंतु कोणत्या का निमित्तानें होईना कार्य होऊं लागलें म्हणजे हळू हळू त्या कार्याबद्दल प्रेम वाटूं लागतें असा अनुभव आहे. लहान मुलांना अगोदर कांहीं दिवस आई खडी-साखरेचा खडा देत असते. कांहीं मुलांना रोज, कांहींना एक दिवसा-आड शाळेंत जाण्यासाठीं म्हणून खाऊकरीतां पैसा द्यावा लागतो. परंतु पुढें पुढें मुलांना शाळा आवडूं लागते. शाळेच्या मुलांमध्यें खेळावेसें वाटतें व यासाठीं शाळा सुरू होण्यापूर्वीं बरेच अगोदर मुलें शाळेस जातात. आज ज्या संवयी होऊन बसल्या आहेत त्यांचीं सुरवात कशी झाली हें पाहिलें तरी आपणांस तोच अनुभव येतो. विडी ओढणारा

आज प्रेमानें तिचा स्वीकार करतो, परंतु पहिली शिडी ओढतांना त्याला भोंवळ आलेली असते. हीच गत तंबाकू खाणाराची किंवा दारू पिणाराची.

मुलांमध्यें चढाओढ तर उत्पन्न व्हावी व व्यक्तीला देण्यांत येणाऱ्या बक्षिसामुळें उत्पन्न होणारे दोष टाळावेत यासाठीं व्यक्तीला बक्षीस न देतां संघाला तें देण्यांत यावें, अशी कांहींची सूचना आहे. वर्गामध्यें दोन संघ निर्माण करावयाचे. त्या दोन संघांतील मुलांना व्यक्तिशः गुण मिळतील परंतु सर्वांचे गुणांची बेरीज करून ज्या संघाचे जास्त गुण होतील तो विजयी समजावयाचा. या पद्धतीनें कांहीं वर्गांमधून अभ्यासांत मागें पडणाऱ्या मुलांना त्या संघांतील हुषार मुलांकडून मदत मिळूं लागते व अशा रीतीनें संघाची सुधारणा होते. माझा संघ चांगला ठरावा यासाठीं संघांतील कांहीं मुलें, स्वतः कष्ट घेऊन, आपल्या संघांतील दुसऱ्या मुलांना शिकविण्याचें पत्करतात. ही जी प्रवृत्ति मुलांमध्यें निर्माण होते ती पुढें त्यांना फार उपयोगी पडते. कुटुंबामध्यें किंवा समाजामध्यें नागरिक म्हणून वावरतांना या प्रवृत्तीचा फार उपयोग होतो. मी माझ्याकरितां अमुक गोष्ट करीन, याऐवजीं, मी माझ्या संघासाठीं अमुक करीन, असा विचार विद्यार्थी करूं लागतो. खेळाचे सामने करण्यामध्यें देखील ह्याच हेतु असतो. सर्व मुलांबरोबर मिळून मिसळून काम करण्याची प्रवृत्ति निर्माण होते. स्वार्थी विचार बाजूला सरतो.

प्रत्यक्ष बक्षिसें देण्याऐवजीं केवळ प्रशंसापत्रें किंवा सर्टिफिकिटें देण्यानेंही कार्य भागतें. प्रत्येक विषयामध्यें शेंकडा ६० किंवा ७० चे वर गुण मिळविणारास हीं पत्रकें द्यावींत. सर्टिफिकिटांचा तसा फारसा खर्च येत नाहीं. एकदां तीं बरीचशीं छापून घेतलीं म्हणजे बरेच दिवस चालूं शकतात. विषय, इयत्ता, मुलाचें नांव, वर्ष वगैरे

सर्टिफिकिटांतील भाग कोरा ठेवून सर्टिफिकिटें छापलीं म्हणजे तीं दरवर्षी वेगळीं छापण्याचें कारण रहाणार नाहीं.

शिस्त राखण्याकरितां शिक्षा करणें किंवा बक्षिस देणें, हे दोन मार्ग जरी सुचविण्यांत आले असले, तरी ते खरे मार्ग नव्हेत. शाळें-तील शिक्षकांनीं नियम करावेत व विद्यार्थ्यांनीं ते पाळावेत. एका वर्गानें शिक्षा करावी व दुसऱ्या वर्गानें ती निमुटपणें सोसावी. एक मालक व दुसरा गुलाम ही परिस्थिति ज्या शाळेस आपण एक कुटुंब समजतों तेथें असणें बरें नव्हे. शाळेच्या कारभारामध्यें सर्वांचा हात असला पाहिजे. शाळा म्हणजे शिक्षक अशी विद्यार्थ्यांची भावना न होतां शाळा ही शिक्षकांची व विद्यार्थ्यांची अशी त्यांची भावना व्हावयास पाहिजे. ही भावना होण्यासाठीं नियम करण्यामध्यें देखील विद्यार्थ्यांचें अंग असावयास पाहिजे. शाळेची व्यवस्था ठेवण्यासाठीं विद्यार्थ्यांचें सहाय्य घेतलें पाहिजे. शिक्षक जे नियम करतात ते सर्व आपल्या विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठीं आहेत अशी विद्यार्थ्यांची कल्पना झाल्यावर नियमांचें पालन होण्यास अडचण पडत नाहीं. सर्व सुधारलेल्या देशां-मध्यें आज प्रजासत्ताक राज्यें आहेत. कांहीं ठिकाणीं राजे असले तरी ते लोकांच्या मतानें काम करणारे आहेत. लोकांच्या मतांना झुगारून आपल्या मनाप्रमाणें राज्याचा गाडा चालविणें आज शक्य नाहीं व शहाणपणाचेंही नाहीं. कायदे लोकांना करूं द्या म्हणजे लोकांकडून कायद्यांचें पालन झाल्याशिवाय रहाणार नाहीं. राज्य चालविण्याचे बाबतींत जें धोरण स्वीकारले जातें तेंच शाळेच्या बाबतींत आपणांस स्वीकारावयास पाहिजे.

या तत्त्वांस अनुसरून शाळांमधून स्वराज्य संस्था प्रस्थापित होत आहेत. शाळा ही आपणा सर्वांची आहे, असें प्रत्येकाला जेणेंकरून वाटेल असे प्रयत्न होत आहेत. खरी वाढ स्वातंत्र्याशिवाय होत नाहीं

यासाठीं शाळांतून विचारास, भावनेस व आचारास स्वातंत्र्य दिलें गेलें पाहिजे. शिक्षकाला जें बरोबर वाटतें तेंच सर्व मुलांना वाटलें पाहिजे, ज्या योगानें शिक्षकाच्या भावना स्फुरण पावतात त्याच योगानें विद्यार्थ्यांच्याही भावना स्फुरण पावल्या पाहिजेत; किंवा जे शिक्षकास करावयास आवडतें तेंच विद्यार्थ्यांसही आवडलें पाहिजे, अशी सक्ती बरी नाहीं. मुलांना स्वतः विचार करूं द्या. पालकांच्या किंवा शिक्षकांच्या विचारांवर अवलंबून रहाण्यास त्यांना शिकवूं नका. प्रथमपासूनच दुसऱ्याचे विचारावर अवलंबून रहाण्याची त्यांना संवय लागली म्हणजे त्यांचे स्वतःचे विचार पंगु होतील. आपल्याला काय वाटतें, किंवा काय करणें आवडतें हें मुलांना ठरवूं द्या व त्यांचे विचारास, भावनेस व आचारास खाद्य देऊन त्यांचें पोषण करा म्हणजे मुलांची खरी, नैसर्गिक वाढ आपणाला पाहावयास सांपडेल. आज आपणाला शाळांतून कशाची जरूर असेल तर या स्वातंत्र्याची.

मुलांना स्वातंत्र्य दिलें म्हणजे तीं वाटेल तसें वागूं लागतील असें आपणास वाटेल, परंतु तसें होत नाहीं. स्वातंत्र्य, स्वराज्य म्हणजे बेबंदशाही नाहीं. स्वराज्यामध्येंही नियम असतात. स्वराज्यामध्यें नियम नसतील तर तें सुराज्य होणार नाहीं. बेबंदशाहीला स्वराज्य कल्पून दुःख कोण सहन करील ? स्वतंत्र मनुष्याला वाटेल तसें वागतां येत नाहीं. तो उडी मारील परंतु ५।६ फुटांपेक्षां जास्त उंच उडी त्यास मारतां येणार नाहीं. तो आवडीचे पदार्थ खाईल, परंतु त्यालाही परिमिती आहेच. ज्याप्रमाणें शारीरिक बाबतींत ही मर्यादा आहे त्याचप्रमाणें इतर बाबतींतही आहे. अमर्याद कोणालाही वागतां येत नाहीं. स्वातंत्र्यामध्यें आपली परिस्थिती आपल्यास हितकारक होईल अशा रीतीनें मनुष्य ती बदलूं शकतो. पारतंत्र्यामध्यें तें शक्य होत नाहीं, एवढाच फरक. जो परिस्थितीचा गुलाम नाहीं, किंवा परिस्थितीमध्यें बेछूट वागणारा बंडखोर नाहीं, परंतु

परिस्थितीला ओळखून ती परिस्थिती आपणांस उपकारक होईल असें करतो, तोच खरें स्वातंत्र्य भोगतो.

परिस्थितीला ओळखणें म्हणजे तिच्याशीं सहकार्य करणें होय. खरें स्वातंत्र्य सहकार्याशिवाय लाभत नाहीं. हा धडा विद्यार्थ्यांना अनुभवानें मिळाला म्हणजे स्वातंत्र्याची त्यांची व्याख्या बदलते. वाटेल तसें वागणें म्हणजे स्वातंत्र्य अशी जी त्यांची पूर्वीची व्याख्या, ती पार बदलून जाते.

सहकारी संस्थेमध्यें प्रत्येक सभासदास स्वातंत्र्य असतें. परंतु प्रत्येकानें आपलें स्वातंत्र्य वापरतांना आपल्यासारख्या दुसऱ्या सभासदांच्या स्वातंत्र्याच्या आड आपण येतों कीं काय हें पाहिलें पाहिजे. सर्वांना जी गोष्ट हितकारक आहे तीच त्याला करावी लागते. शाळा जर सहकारी तत्त्वावर चालविलेली मोठी संस्था किंवा समाज आहे तर तेथेंही प्रत्येकानें अशी दृष्टी ठेविली पाहिजे कीं, आपल्या वागण्यानें दुसऱ्यास त्रास होणार नाहीं.

शाळेमध्यें स्वराज्याची सुरवात झाली म्हणजे शिक्षकांना कांहीं काम शिल्लक राहणार नाहीं, अशी मात्र कोणी समजूत करून घेऊं नये. शिक्षकाची मदत नेहमीं लागणार. हातांत छडी घेऊन दुसऱ्यावर केवळ सत्ता गाजविणारा तो राहणार नाहीं. त्याला मार्गदर्शकत्वाची भूमिका स्वीकारावी लागेल. तो आतां विद्यार्थ्यांचा मित्र किंवा वडील बंधू म्हणून कार्य करीत राहील, एवढेंच. ही कामगिरी दिसावयास सोपी दिसली तरी ती बजावणें फार कठीण आहे. विद्यार्थ्यांना पटवून त्यांचेकडून कार्य करवून घ्यावयाचें आहे. एकादी गोष्ट त्यांना पटली नाहीं तर ती त्यांना पटेपर्यंत त्यांच्याबरोबर राहून त्यांना काम करावें लागेल व आपलें म्हणणें शेवटीं कसें खरें ठरलें हें दाखवावें लागेल. चुकीच्या मार्गानें जाऊन मुलें आपल्या पायावर धोंडा पाडून घेणार नाहींत ना, हें

डोळ्यांत तेल घालून त्याला पाहावें लागेल. शिक्षकाची जबाबदारी मुलांना मिळालेल्या स्वातंत्र्यामुळें कमी होत नसून ती वाढत असते.

शाळांमधून स्वराज्य कसें निर्माण करावयाचें यासंबंधीं वेगवेगळे प्रयोग करण्यांत आलेले आहेत. आपल्याकडे वर्ग—सेक्रेटरी नेमण्याची पद्धति सर्व ठिकाणीं दृष्टीस पडते. या सेक्रेटरीनें शिक्षकास मदत करावयाची असते. अकरा वाजतां शाळेची पहिली घंटा झाली व ११। वाजतां वर्गाचें काम सुरू व्हावयाचें असें समजल्यास ११ ते ११। पर्यंत वर्गांत दंगा न होईल हें सेक्रेटरी पाहात असतो. त्याचप्रमाणें शिक्षकाकरितां लागणारें साहित्य हेडमास्तराकडून किंवा शाळेच्या कारकुनाकडून आणावयाचें किंवा अशाच प्रकारचें काम त्याकडे सोंपविलेलें असतें.

यापेक्षां इतर बाबतींतही मुलांची मदत घेतां येण्यासारखी आहे. शाळेनें चालविलेलें वाचनालय असेल तर तेथें आळीपाळीनें देखरेख करण्याचें काम मुलांकडे सोंपवितां येईल. सर्व शाळेची प्रार्थना होते किंवा ड्रील होते त्यावेळीं मुलांना नीट उभे करण्याची व्यवस्था मुलांकडे देतां येईल. शाळेंतील वर्गांतून व शाळेच्या कंपौंडांत घाण होणार नाहीं हें पहाण्याची जबाबदारी कांहीं मुलांना देतां येईल. मुलें उशीरा येतात किंवा दिलेला अभ्यास करीत नाहींत, तर याविषयीं चूक करणाऱ्या विद्यार्थ्यांचें म्हणणें ऐकून घेऊन योग्य अशी शिक्षा ठरविणें, किंवा अशा मुलांच्या पालकांना भेटून अशा प्रकारच्या चुका पुन्हां न होतील असा बंदोबस्त करणें वगैरे अनेक कामें मुलांच्या सहाय्यानें करतां येण्यासारखीं आहेत.

शाळेच्या अभ्यासापुरतांच विचार न करतां शाळेच्या उपांगांचाही विचार केल्यास त्या बाबतींत मुलांची मदत होण्यासारखी आहे. शाळेमध्यें करमणुकीचे कांहीं कार्यक्रम वर्षांतून चार वेळ व्हावयाचे आहेत, असें आपण समजून चालूं. या कार्यक्रमासाठीं मुलांची निवड करणें, निवड

केल्यानंतर मुलांना योग्य तें शिक्षण देणें, वगैरे कामें शिक्षकाच्या देखरेखीखालीं मुलांना करतां येतील. संवाद, गाणीं निवडणें, तीं पाठ करून घेणें, पाठ म्हणण्यासाठीं भाषण निवडून काढणें, एकादें वाद्य कोणास वाजवितां येत असेल, तर त्यास तें संमेलनाचे वेळीं किंवा समारंभाचे वेळीं वाजविण्यास प्रोत्साहन देणें, हस्तव्यवसायांत ज्यांची प्रगति आहे अशांकडून कांहीं जिनसा तयार करून घेणें, अशा अनेक व्यवसायांना प्रोत्साहन देऊन अभ्यासाशिवाय इतर बाबतींतही मुलांचें लक्ष आकर्षितां येईल. गाणें, संवाद, खेळ, हस्तव्यवसाय हीं मुलांना स्वभावतःच फार आवडतात. शिक्षकानें यांत लक्ष घातलें तर मुलेंही जास्त लक्ष घालून आपली कुशलता दाखविण्याचा प्रयत्न करितात. आपल्याला दुसऱ्यापेक्षां जास्त येतें हें दाखविण्याची मुलांमध्यें हौस असते. ही स्वाभाविक हौस शिक्षकानें मारून टाकण्याचें पातक करूं नये. नाटकांतील गाणें, बोलपटांतील गाणें म्हणजे पाप अशी जी पूर्वीं सोवळी समजूत होती ती आतां नष्ट झाली आहे. रंगभूमीस दिवसानुदिवस पावित्र्य येत आहे. बोलपटामुळें मुलांची गाण्याकडे जास्त प्रवृत्ति दिसून येत आहे. साधारण लोकवस्तीच्या गांवांतून देखील तुकाराम, कुंकू, गोपाळकृष्ण या बोलपटांतील गाणीं मुलें म्हणतात. बोलपटांतील पद्यें ग्रामोफोनवर म्हटलीं जात असल्यामुळें व हे ग्रामोफोन सर्वत्र पसरल्यामुळें कांहीं कांहीं गाणीं परिचयाचीं झालीं आहेत. या सर्व गोष्टी करतांना अभ्यासाकडील लक्ष कमी होणार नाहीं, एवढें मात्र शिक्षकानें पाहाणें जरूर आहे.

सर्व शाळेंतील मुलांचे चार गट करावेत. या गटांना मोठ्या माणसांच्या नांवानें संबोधावें. विश्वामित्र, वशिष्ठ, राम, अर्जुन, धर्म, शिवाजी, अकबर वगैरे. एक विश्वामित्र संघ किंवा विश्वामित्र कुल. दुसरें वशिष्ठ कुल वगैरे नांवें द्यावींत. संघामार्फत जी कामगिरी करून घ्यावयाची आहे त्या कार्याचें निदर्शक असें नांवही संघास देतां येईल. शाळेमध्यें स्वच्छता ठेवण्याची

जबाबदारी ज्या संघाकडे आहे त्यास **आरोग्य–संघ** असें संबोधितां येईल. वर्गांतून चित्रें लावून, बाग तयार करून हें कार्य ज्यांचें आहे त्यांना **शोभा–संघ** किंवा **सौंदर्य--संघ** हें नांव देतां येईल. वर्गांतील पुस्तकालयाची व्यवस्था ठेवणें, वर्तमान-पत्रांतून प्रसिद्ध होणारी माहिती वर्गांतील विद्यार्थ्यांचे माहितीसाठीं वर्ग-फलकावर लावणें, यांसारखी ज्ञानवृद्धीचीं कामें करणाऱ्या संघास **ज्ञान–संघ** असें म्हणतां येईल. रोज वर्गांमध्यें नियमाचें पालन व्हावें, समारंभाचे वेळीं सर्व कार्यक्रम योग्य रीतीनें पार पडावा यासाठीं शिस्त राखण्याचीं कामें करणाऱ्या संघास **शिस्त–संघ** किंवा **व्यवस्था–संघ** असें म्हणतां येईल. अशा रीतीनें चार संघांकडे चार वेगवेगळीं कामें द्यावींत. प्रत्येक वर्गांत या चार संघांतील मुलें असतील. वर्गांतील प्रत्येक संघानें आपला म्होरक्या निवडावा, या चार संघांतील चार पुढारी निवडले गेले म्हणजे वर्गापुरतें त्यांचें छोटें मंडळ तयार झालें. प्रत्येक वर्गांतील चार याप्रमाणें सर्व वर्गांचें एक कार्यकारी मंडळ तयार झालें. कांहीं कामें या कार्यकारी मंडळानें करावयाचीं आहेत. परंतु शाळेंतील सर्व मुलांच्या सभा कधीं कधीं भरवून सर्वसाधारण बाबतींत मुलांचें मत घ्यावें. उदाहरणार्थ, शाळेंत गणपति बसवावा किंवा नाहीं, शाळे-मध्यें दरवर्षी किती समारंभ करावयाचे, कोणकोणत्या थोर व्यक्तींच्या स्मरणार्थ भाषणें करावयाचीं, हें सर्व साधारण सभेंत ठरविण्यांत यावें; मात्र ठरल्यानंतर त्याची अंमलबजावणी कार्यकारी मंडळानें करावी. यांत जसें अनुभव येतील त्याप्रमाणें कार्यक्रमामध्यें फरक करावा. कोणी चार कुलें करतील, तर कोणी सहा करतील. आपण किती प्रकारचें कार्य मुलांकडून करवून घेणार यावर हा प्रश्न अवलंबून राहील. हळूहळू मुलांकडे कामें सोंपविण्यांत आलीं म्हणजे शाळा ही केवळ शिक्षकांची नसून शिक्षक व मुलें यांची आहे ही मुलांची भावना वाढत जाते.

शाळेंतील नियम हे बाहेरच्या कोणातरी माणसांनीं केलेले नसून ते आपल्या विद्यार्थी-बंधूंनींच केलेले आहेत व ते पाळणें हें आपलें कर्तव्य आहे, याची त्यांना जाणीव व्हावयास लागते. आनंदानें सर्व नियमांचें पालन व्हावयास लागलें म्हणजे खरी शिस्त निर्माण झाली असें समजावें. हीच खऱ्या स्वराज्याची तयारी नव्हे काय ?

---

## प्रकरण चवथें

# अभ्यास-क्रम

अभ्यास क्रम हा शिक्षण खात्यानें ठरविलेला असतो. काय शिकवावयाचें हें शिक्षकाच्या स्वाधीन नाहीं; कसें शिकवावयाचें हें फार तर तो पाहील. राष्ट्राचे जे पुढारी आहेत ते राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें कोणी काय शिकावें याचा विचार करतात. जसा वेळ बदलेल त्याप्रमाणें प्राथमिक शाळा, हायस्कूल व कॉलेज यातील अभ्यासक्रमामध्यें फरक होतो. सरकार व विश्वविद्यालयें--ज्यामध्यें लोकांचे प्रतिनिधी असतात--अभ्यास क्रम ठरवीत असतात.

या अभ्यासक्रमाप्रमाणें शिक्षकाला शिकवावें लागतें, परंतु हा अभ्यासक्रम म्हणजेच सर्व शिक्षण असें मात्र नाहीं. अभ्यासक्रमापेक्षां कितीतरी इतर गोष्टी शिक्षकांना शिकवाव्या लागतात. आजकालचे बहुतेक सर्व अभ्यासक्रम बौद्धिक स्वरूपाचे आहेत./ शिक्षकानें मुलांची सर्वांगीण उन्नति करावी, हें ध्येय शिक्षकांचे पुढें ठेविलेलें असतें व त्या ध्येयास अनुसरून शारीरिक व नैतिक शिक्षण देण्याचा प्रयत्न त्याला करावा लागतो.

सध्यांचा अभ्यासक्रम शहरांचे शाळांना व खेडयांच्या शाळांना एकच आहे. खरें पाहतां, कांहीं विषयांचे बाबतींत शहर व खेडेगांव येथें वेगवेगळे अभ्यासक्रम असणें जरूर आहे. सुधारलेल्या देशांमध्यें अशा प्रकारचे वेगवेगळे कार्यक्रम आहेत. खेडयांत शेती हा मुख्य धंदा आहे, तेव्हां प्राथमिक शाळेंत देखील या धंद्याचा अंतर्भाव व्हावयास पाहिजे. शेती विषय ज्या शाळांतून शिकविला जातो अशा शाळा आपणाकडे फार कमी आहेत. त्या यापुढें वाढावयास पाहिजेत, म्हणजे प्राथमिक शिक्षणांस खेडेगांवांत पाठिंबा मिळेल आज खेडेगांवांतही शहरी वळणाचें शिक्षण मिळत असल्यामुळें शिकून, व्हर्न्याक्युलर फायनल होऊन, तयार झालेला तरुण शेतांत काम करणाऱ्या वडिलांच्या उपयोगी पडत नाहीं. पैसे खर्चून ही आपत्ती पदरीं बांधून घेतली असें त्यास वाटतें व एका मुलास शिकविलें बस् झालें, दुसरा मुलगा तरी बिघडावयास नको, असें त्याला वाटूं लागतें. त्याची यांत काय चूक आहे ? शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचें करणारांनीं या गोष्टीकडे लक्ष द्यावयास पाहिजे.

शारीरिक शिक्षणाकडेही आतां सरकारचें लक्ष लागून राहिलें आहे. शारीरिक शिक्षणाकडे जादा खर्च करण्यासाठीं सरकार प्रोत्साहन देत आहे. शारीरिक शिक्षण देण्यास लायक शिक्षक निर्माण करण्यासाठीं ट्रेनिंग संस्था स्थापन होत आहे. आज हायस्कूल, कॉलेजांतून या शिक्षणाची सुरवात झाली आहे, लवकरच प्राथमिक शाळांतूनही हें शिक्षण देण्याची व्यवस्था होणार आहे. अर्थात् पैशाशिवाय हें काम होणार नाहीं, हें सरकार जाणून आहे. दिवसानुदिवस शिक्षणप्रीत्यर्थ जास्त पैसा खर्च करणें सरकारास प्राप्तच आहे.

वर्षाचा अभ्यासक्रम ठरला, परंतु अभ्यास वेळच्यावेळीं होण्यासाठीं प्रत्येक महिन्याला किती अभ्यास होणें जरूर आहे हें प्रत्येक शिक्षकानें ठरवावें. नवीन अभ्यास व त्याची उजळणी यास वेगवेगळा वेळ द्यावा.

प्रत्येक तिमाहीला परीक्षा असेल तर प्रत्येक तिमाहीचा अभ्यास ठेविला जावा. पुष्कळ शाळांतून हें अंदाजपत्रक तयार होत नाहीं. तयार झालें तरी त्याप्रमाणें अभ्यास होत नाहीं. एकदां वर्गशिक्षकाचे सल्ल्यानें अंदाजपत्रक तयार झालें म्हणजे त्याप्रमाणें प्रत्येक वर्गाचे अभ्यास होतात कीं नाहीं, हें हेडमास्तरांनीं पाहावें. ज्या त्या वर्गाचा अभ्यास ज्या त्या वर्गांत न झाल्यामुळें सातवीचे वर्गांत तो करवून घेण्याची जोखीम सातवीचे शिक्षकावर येऊन पडते व त्यामुळें सातवीचे, व्ह. फा. परीक्षेचे निकालावर त्याचा परिणाम झाल्याचें आढळून येतें.

प्रत्येक शिक्षकानें प्रत्येक विषयाचा विचार अलग अलग करावा. वर्षांतील कामाचे दिवस किती, त्यांत आपल्या विषयाचे वांटणीला किती दिवस येणार, हें पाहून उजळणीकरितां कांहीं दिवस बाजूला काढून ठेवून राहिलेल्या दिवसांमध्यें सर्व अभ्यास वांटून टाकावेत. ही वांटणी आठवडेवार करून टाकावी व त्याप्रमाणें एका पाठामध्यें किती अभ्यास होणें जरूर आहे हें ठरवून रोजच्या डायरीमध्यें लिहून ठेवावें. शिक्षकाजवळ रोजच्या अभ्यासाची डायरी असणें जरूर आहे. रोज आपण अभ्यास काय घेणार हें स्वतःशीं ठरविलें गेलें पाहिजे. कांहीं शाळांमधून विशेषतः हायस्कूलमधून अशा प्रकारची डायरी ठेवण्याचा परिपाठ आहे. वर्गावर अभ्यास घेण्यापूर्वीं तो अभ्यास आपण कोणता घेणार आहोंत, हें शिक्षकानें ठरविलें आहे कीं नाहीं, म्हणजे शिक्षकानें स्वतः अभ्यास केला आहे कीं नाहीं, हें पाहाण्यासाठीं ही डायरीची योजना असते. याच डायरीमध्यें रोजचे झालेले अभ्यासही लिहिण्यांत यावेत. म्हणजे वहीचे डाव्या हाताकडे जर होणारे अभ्यास लिहिले असले तर उजव्या हाताकडे झालेले अभ्यास लिहावेत. या योगानें कोणत्या दिवशीं कोणत्या वर्गावर किती अभ्यास संपविले, याची याद शिक्षकाजवळ राहते. मुलांना गृहपाठ

कोणते दिलें हें गृहपाठाचे वहींत मांडून ठेवावें. गृहपाठाकरितां स्वतंत्र वही नसेल तर गृहपाठ काय दिला हेंही डायरीमध्यें मांडून ठेवावें.

डायरीच्या योगानें वेळेवर आपलें काम होतें कीं नाहीं हें शिक्षकास समजेल; त्याचप्रमाणें विषयवार जें लेखी काम मुलांकडून त्याला करवून घ्यावयाचें आहे, त्याविषयींच्या त्याच्या स्वतःच्या वह्या असणें जरूर आहे. शब्दार्थांच्या वह्या शिक्षकानें अगोदर तयार कराव्यात. त्या मुलांना नमुना म्हणून दाखवाव्यात. मुलांना चांगलें काम कसें असतें हें या योगें पहावयास मिळतें. शिक्षक म्हणजे कोणी सर्वज्ञ नाहीं, तो विद्यार्थ्यांचा एक वडील बंधु आहे. त्यालाही अभ्यास करावा लागतो, हें विद्यार्थ्यांना दिसूं द्या म्हणजे विद्यार्थी व शिक्षक यांमध्यें भासणारा फरक कमी होऊन दोघे एका पातळीवर येतील. निबंधाचे बाबतींतही शिक्षकाची वही असावी. निबंधासाठीं विषय देतांना कोणता विषय अवघड व कोणता सोपा हें शिक्षकाला तो निबंध स्वतः लिहिल्याशिवाय समजत नाहीं. सोप्या भाषेंत निबंध कसा लिहितां येईल हें शिक्षकानें दाखवावें. 'निबंध कसा लिहावा' या विषयावर लिहिल्या गेलेल्या पुस्तकांतूनही चांगलासा निबंध असल्यास वाचून दाखवावा! अशा प्रकारचीं पुस्तकें शिक्षक लायब्ऱ्यासाठीं म्हणून खरेदी करण्यांत यावींत. ज्या अनुभवी शिक्षकांनीं आपला अनुभव लिहून ठेविलेला आहे, त्याचा आपण जरूर फायदा घ्यावा.

इतिहास, भूगोल या विषयांमध्यें जे प्रश्न आजवर विचारले गेले आहेत ते शिक्षकाजवळ असणें जरूर आहे. इतिहास मुलें वाचतात, परंतु त्यावर प्रश्न कसे येतात हें त्यांना कळल्याशिवाय परीक्षेच्या दृष्टीनें विषयाची तयारी करतां येत नाहीं. मराठी अम्मल घेतला तर त्यावर किती प्रश्न व कोणत्या प्रकारचे येण्यासारखे आहेत हें ठरविणें कठीण नाहीं. हे प्रश्न सोडवून झाले म्हणजे विषय आपोआपच तयार होतो.

मॅट्रिक, व्ह. फायनल, यासारख्या परीक्षांचे प्रश्न पाहिले तर तशाच प्रकारचे प्रश्न, थोडी भाषा बदलून, त्यापूर्वी आल्याचें आढळून येतें. परीक्षक तरी दर वर्षी नवीन नवीन प्रश्न कोठून काढणार ? प्रश्न कसे लिहावेत, ही कला आहे व ती कला पुष्कळ प्रश्न लिहिल्याशिवाय साध्य होत नाहीं. परीक्षकानें काय विचारलें आहे हें विद्यार्थ्यांना बरोबर समजलें पाहिजे व जेवढें विचारिलें असेल तेवढेंच लिहिलें गेलें पाहिजे. पुष्कळ वेळां गैरलागू गोष्टी लिहिल्या जातात. कोणत्या गोष्टी लागू व कोणत्या गैरलागू हें पटविण्यासाठीं मासिक किंवा त्रैमासिक परीक्षांचे उत्तरांचे कागद शिक्षकानें वर्गासमोर वाचून दाखवावेत. शिक्षकानें इतिहासाच्या वहीमध्यें कांहीं प्रश्नांचीं उत्तरें लिहून दाखवावींत. भूगोलाचे जे आराखडे मुलांकडून काढून घ्यावयाचे असतील ते त्यानें अगोदर तयार करावयास पाहिजेत. हें सर्व काम एकदां केलें म्हणजे दरवर्षी पुन्हां करण्याची जरूर नाहीं. नवीन प्रश्न फार तर या वहींत पूर्वींच्या प्रश्नांचे भरीस घालतां येतील, किंवा नवीन अनुभवानें पूर्वींच्या टांचणा-मध्यें थोडा फरक करतां येईल. असें काम कांहीं वर्षें केलें म्हणजे शिक्षकाला त्या विषयापुरता आत्मविश्वास वाटतो.

शिक्षकाजवळ आपली डायरी, जिच्या पहिल्या कांहीं पानांमध्यें अंदाजपत्रक लिहून ठेविलेलें आहे अशी, व प्रत्येक विषयाची वर सांगि-तल्याप्रमाणें एक वही असावी. कोणताही विषय शिकवितांना त्या विषयांचें पाठ्य-पुस्तक व त्या विषयाची वही शिक्षकाजवळ हवी. डायरी तर त्याचे बरोबर नेहमीं असावयास पाहिजे. या सर्व वह्या हेडमास्तरांनीं मधून मधून पाहाव्यात. कोणते शिक्षक आपलें काम लक्षपूर्वक करतात हें यावरून त्यांचे नजरेस येईल. शिक्षकांचें कांहीं चुकत असल्यास त्यांनीं मार्ग दाखवावा.

प्राथमिक शाळांमधून शिक्षकांची वर्गवार वांटणी केलेली असते.

परंतु ही वांटणी विषयवारही करतां येण्यासारखी आहे व सुधारलेल्या देशांमधून अशा तऱ्हेची वांटणी लहान लहान प्राथमिक शाळांतूनही केलेली असते, हें मागें सांगितलेलेंच आहे. कोणत्याही प्रकारें वांटणी झाली तरी वर्गवार वेळापत्रकें तयार करावी लागतात व तीं वर्गांत लावून त्याप्रमाणें अभ्यास घेण्यांत येतात. विषयवार शिक्षकांची वांटणी झाली असेल तर शिक्षकवारही वेळापत्रक व्हावें लागतें. एक जसें वर्गांचें वेळापत्रक तसें दुसरें शिक्षकांचें वेळापत्रक. कोणते शिक्षक कोणत्या तासाला कोणता विषय शिकविणार हें या पत्रकावरून कळून येणार आहे. रोजच्या ६ किंवा ७ तासांपैकीं शिक्षकांना कांहीं तास रिकामे असतील तर रिकाम्या तासांचे एक तिसरें वेळापत्रक तयार होतें. म्हणजे सोमवारीं एकादे शिक्षक रजेवर असतील तर त्यांचें काम करण्यास प्रत्येक तासाला कोण कोण शिक्षक रिकामे आहेत हें हेड-मास्तरांना सहज दिसून येतें व त्यावरून हेडमास्तरांना गैरहजर शिक्ष-काचे कामाची वांटणी करण्यास सोपें जातें. मोठ्या शाळेंमध्यें, जेथें विषयवार शिक्षकांची वांटणी केली गेली आहे, तेथें हीं तिन्हीं वेळा-पत्रकें असणें जरूर आहे. हीं तिन्हीं वेळापत्रकें—सर्व वर्गांचीं—हेड-मास्तरांचे ऑफिसांत राहतील. प्रत्येक वर्गांत वर्गाचें वेळापत्रक राहील.

वेळापत्रकाप्रमाणें काम करण्याची जबाबदारी वर्ग शिक्षकावर असते. शाळातपासणीस शाळा पाहण्याकरितां आले म्हणजे ते वेळापत्रकाप्रमाणें अभ्यास चालले आहेत कीं नाहीं हें पाहातात. ज्यावेळीं विषयवार शिक्षकांची वांटणी केलेली असते, त्यावेळीं वेळापत्रकाप्रमाणें काम करणें भागच पडतें. परंतु ज्यावेळीं एका शिक्षकाकडे एक वर्ग असतो त्यावेळीं एखादा विषय एका तासांत न संपला तर तो पुढच्या तासांत कधीं कधीं घेण्यांत येतो. अशा योगानें वेळापत्रकांतील एकादा विषय अजि-बात गाळण्यांत येतो किंवा दुसऱ्या तासाचा अभ्यास तिसऱ्या तासाला

व तिसऱ्याचा अभ्यास चवथ्या तासाला झाल्यामुळें शेवटच्या तासाचा अभ्यास होतच नाहीं. एकादा विषय अपुरा रहात असल्यास तो पुरा करण्याची स्वतंत्रता शिक्षकास असावी व तेवढ्यापुरतें वेळापत्रक बाजूला ठेवण्यास हरकत नाहीं, असें कांहींचें म्हणणें आहे. शिस्तीचे जे भोक्ते आहेत त्यांना अशा प्रकारचें गैरशिस्त वर्तन पटत नाहीं. शिक्षकाकडे एक वर्ग असला तरी त्यानें वेळापत्रकाप्रमाणेंच काम केलें पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे.

वर्गांमध्यें वर्गाच्या वेळापत्रकाबरोबर गृह-पाठाचें वेळापत्रक ठेवण्यांत यावें. प्रत्येक इयत्तेच्या मुलांनीं घरीं किती अभ्यास करावयाचा हें हेड-मास्तरांनीं इतर शिक्षकांच्या मदतीनें ठरवावें. बालवर्गास गृहपाठ नाहीं. पहिले इयत्तेस अर्धा-पाऊण तास अभ्यास, दुसऱ्या इयत्तेस पाऊण तास किंवा एक तास अभ्यास वगैरे ठरविण्यांत यावें. वेळ ठरविल्यानंतर प्रत्येक विषयाला गृहपाठासाठीं किती वेळ द्यावयाचा हें ठरवावें, व गृहपाठाचें वेळापत्रक तयार करावें. गणित, मराठी, इतिहास, भूगोल, शास्त्र हे विषय आहेत असें समजूं. गणिताला तीन, मराठीला पांच, इतिहासास दोन, भूगोलास दोन व शास्त्र विषयास एक याप्रमाणें तासांची वांटणी केली. आतां सहा दिवसांमध्यें ही वांटणी पुढीलप्रमाणें मांडतां येईल.

| सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|
| गणित<br>मराठी<br>भूगोल | इतिहास<br>मराठी | गणित<br>शास्त्र | इतिहास<br>मराठी | गणित<br>मराठी | भूगोल<br>मराठी |

रविवारीं सुट्टी असते म्हणून सोमवारीं तीन विषयांचे अभ्यास गृह-पाठासाठीं दिले आहेत. घरीं जेवढा वेळ मुलांनीं गृहपाठासाठीं द्यावा असें ठरलें असेल त्या मानानें त्या त्या विषयाचा अभ्यास द्यावा.

गृहपाठ काय दिला आहे हें शिक्षकास समजावें, यासाठीं वर्गवार गृहपाठांची वही ठेवण्यांत यावी व त्या वहीमध्यें गृहपाठ मांडण्यांत यावेत. कधीं कधीं मुलांना घरीं करण्यासाठीं अभ्यास दिला जात नाहीं अशी पालकांचीं तक्रार येते. अशा वेळीं वर्गाच्या गृहपाठाची वही पालकापुढें टाकतां येते. वरच्या वर्गांतील मुलांना गृहपाठ उतरून घेण्या-साठीं एक लहान वही ठेवण्यास सांगावें व त्या वहीवर प्रत्येक विद्यार्थ्यानें रोज घरीं करावयास दिलेला अभ्यास उतरावा. शाळा सुटण्यापूर्वीं वर्ग सेक्रेटरीनें, गृहपाठाच्या वहीमध्यें वर्गशिक्षकानें किंवा विषयाचे शिक्षकानें लिहिलेला अभ्यास मुलांना सांगावा. कधीं कधीं या वहींत अभ्यास लिहिण्याचें काम शिक्षकाचे सल्ल्यानें वर्गसेक्रेटरीनें केलें तरी चालेल.

घरीं अभ्यास काय द्यावयाचा हें आयत्या वेळीं ठरवितां येत नाहीं. वर्गांत पाऊल टाकण्यापूर्वीं शिक्षकाला मुलांना आज नवीन काय शिक-वावयाचें हें जसें अगोदर ठरवावें लागतें, तसें गृहपाठ कोणता द्यावयाचा हेंही ठरवावें लागतें. तासाची घंटा झाल्यावर गडबडीनें कांहीं तरी अभ्यास सांगून भागत नाहीं. वेळ न मिळाल्यामुळें गृहपाठ देण्याचें काम व्हावें तसें होत नाहीं. जो विषय वर्गांत झाला त्या विषयाचा गृह-पाठाशीं संबंध असावा लागतो. त्याच तासाला विषय संपल्याबरोबर गृह-पाठ देणें जसें सोयीचें पडतें तसें तो तास गेल्यानंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशीं सोयीचें होत नाहीं. एका पद्धतीचें उदाहरण समजावून दिलें तर त्याच प्रकारचीं उदाहरणें पुस्तकांतून हुडकून काढून किंवा स्वतः रचून शिक्षकानें गृहपाठासाठीं द्यावींत. इतिहास सांगितल्यानंतर

तो भाग ज्या पानांत सांगितला आहे, तीं पानें वाचून त्यांवर प्रश्न देऊन तो लिहून आणावयास सांगावें.

गृहपाठ मुलांनीं तयार केला किंवा नाहीं हें शिक्षकानें पाहिलें पाहिजे. पाठ पाहाण्याकरितां पुष्कळसा वेळ खर्च करतां येणार नाहीं. कधीं कधीं गृहपाठ पाहिल्याबद्दल गृहपाठाच्या वहीवर शिक्षकानें छोटी सही करून तारीख टाकावी. कधीं कधीं आपल्या गृहपाठाच्या वह्या घेऊन उभें रहाण्यास मुलांना सांगावें व सर्वांच्या पाठाकडे दृष्टि फेंकावी. कधीं कधीं हें काम वर्गांतील एक दोन हुशार मुलांचे मदतीनें करावें. मुलें या कामांत फार चौकस असतात व मुलांच्या चुका हुडकून काढतात. कित्येक वेळां स्वतः विचार न करतां कांहीं मुलें दुसऱ्याच्या गृहपाठाची नक्कल करून आणतात. अशी टाळाटाळ कोण करतात हें शिक्षकानें पाहिलें पाहिजे. गृहपाठाचे बाबतींत शिक्षकानें पालकाशीं सहकार्य करावें. जेथें पालक सुशिक्षित आहेत तेथें गृहपाठ करून घेण्यास त्यांची मदत होते.

विषयांकरितां मुलानीं वह्या किती ठेवावयाच्या हें हेडमास्तरांनीं सर्व शिक्षकांच्या विचारानें ठरवावें. सध्यां सर्व शाळांतून वह्यांचें बंड बरेंच माजलेलें आहे. इंग्रजी शाळामधून इंग्रजी पहिलीचे वर्गांतील विद्यार्थ्यांना १२।१५ वह्या खरेदी कराव्या लागतात. विषयाकरितां वह्या असणें जरूर आहे, परंतु विषयाची हेळसांड न होतां, पालकांच्या सांपत्तिक स्थितीकडे दृष्टि देऊन, कांहीं ठराविक वह्या ठेवाव्यात. मराठी शाळेमध्य खालच्या वर्गांत वह्या ठेवण्याची जरुरी नाहीं. पाटीवर सर्व काम भागण्यासारखें आहे; मराठी चौथीमध्यें कांहीं वह्या मुलांनीं लिहावयास पाहिजेत. स्कॉलरशिपच्या परीक्षेसाठीं लेखी परीक्षा या मुलांना द्यावी लागते व म्हणून प्रश्नांचीं उत्तरें लेखी लिहिण्याची संवय होणें जरूर आहे. कांहीं शाळांतून शाळेंतील अभ्यासासाठीं व गृहपाठासाठीं एकाच विषयावर

वेगवेगळ्या वह्या ठेवण्यांत येतात. एकाच वहीमध्यें शाळेंतील काम व गृहपाठ लिहितां येईल.

पूर्वीचा काळ आतां राहिला नाहीं. शिक्षणाप्रीत्यर्थ जादा खर्च पालकांना करावा लागणारच. पुस्तकांचा खर्च सध्यां जास्त होत आहे ही पालकांची ओरड सर्वांशानें जशी कबूल करतां येण्यासारखी नाहीं, त्याचप्रमाणें वह्यांबद्दलची ओरडही बरोबर आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. हा प्रश्न शिक्षक व पालक यांच्या सहकार्यानें सुटणार आहे. शाळेचे इन्स्पेक्टर मुलांची तयारी अमुक एका पद्धतीनें व्हावी असें जर म्हणत असतील तर बिचाऱ्या शिक्षकांना त्याप्रमाणें वागणें भाग पडतें. शिक्षण बदलत आहे याची कल्पना पालकांना फारशी नसल्यामुळें, शिक्षणासाठीं अधिक खर्च करण्यास त्यांची प्रवृत्ति नसते. पालकांनीं एकमतानें आपलें म्हणणें शिक्षण अधिकाऱ्यांपुढें मांडल्यास या प्रश्नास तोंड पडून कांहीं तरी निश्चयात्मक धोरण ठरलें जाण्याचा संभव आहे.

---

## प्रकरण पांचवें

# परीक्षा

परीक्षा कशा घ्याव्यात ही एक महत्त्वाची बाब आहे. परीक्षा योग्य तऱ्हेनें न घेतल्या गेल्यामुळें परीक्षा म्हणजे एक सोरट, परीक्षा म्हणजे मुलांची कत्तल, परीक्षा म्हणजे केवळ नशिबाचा खेळ, अशी लोकांची समज होऊन राहिली आहे; व या परीक्षा वरील समजुतीमुळें आजिबात काढून टाकण्यांत याव्यात असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे. शाळांतून हस्तव्यवसायाचें किंवा धंदे-शिक्षण कसें द्यावें हें ठरविण्याकरितां जी

कमिटी सरकारनें नेमिली होती, तिनें मॅट्रिकची परीक्षा बंद करण्यांत यावी असें आपलें मत व्यक्त केलें आहे.

परीक्षा घेणारे परीक्षक, अभ्यास नेमणारे शिक्षण खातें व मुलांची तयारी करून घेणारे शिक्षक यांचा एकमेकांशीं संबंध न आल्यामुळें परीक्षा ही अवघड गोष्ट होऊन बसली आहे. परीक्षक कोण आहेत, त्यांना काय पाहिजे असतें, त्यांची प्रश्न विचारण्याची पद्धत काय आहे हें जर शिक्षकास न समजेल तर, मुलांची तयारी करून घेण्यासाठीं दृष्टीसमोर जें धोरण ठेवावें लागतें तें शिक्षकास ठेवतां येणार नाहीं. अभ्यास नेमणारें सरकार अभ्यास नेमून बाजूस होतें; परंतु त्यानें थोडें खोल जाऊन कोणता विषय किती व कसा अभ्यासावा याची योग्य कल्पना शिक्षकांना येईल व प्रश्न कशा रीतीनें विचारावेत याची कल्पना परीक्षकांना होईल, असे प्रयत्न करावयास पाहिजेत. इतिहास विषय घेतला तर त्या विषयामध्यें प्रश्न कसे असावेत, मुलांनीं उत्तरें कोणत्या प्रकारचीं द्यावींत, लढाईचीं वर्णनें कोठपर्यंत द्यावींत वगैरे सर्व ठरावयास पाहिजे. हें जर न ठरेल तर परीक्षेस लॉटरीचें स्वरूप प्राप्त होणें अपरिहार्य आहे. परीक्षकांनाही आपण ज्यांची परीक्षा घेणार त्यांची कुवत काय आहे हें समजलें पाहिजे. कॉलेजमध्यें शिकविण्याचें काम ज्यांचेकडे आहे, शाळेंतील मुलांची कुवत ज्यांना माहीत नाहीं, त्यांना शाळेंतील मुलांची परीक्षा घ्यावयास सांगावयाचें म्हणजे एक प्रकारची आपत्तीच आहे.

परीक्षा ही नष्ट करून भागणार नाहीं. मुलांना काय येतें आहे, हें अजमावलें गेलें पाहिजे. परीक्षा योग्य होण्यासाठीं शिक्षक, परीक्षक व शिक्षण-खातें ही एकत्र यावयास पाहिजेत. मुलांना काय येतें हें पाहाण्याचा परीक्षकांनीं प्रयत्न करावयास पाहिजे. त्यांना काय येत नाहीं हें पाहिलें जाऊं नये. मुलांचें ज्ञान किती आहे व मुलगा विचार कितपत

करतो हें परीक्षकानें पाहिलें पाहिजे. परीक्षा म्हणजे केवळ बुद्धिसामर्थ्याची परीक्षा होऊं नये. कांहीं मुलें बुद्धीनें कमकुवत असतील, परंतु विचारक्षम असतील. पुस्तकें मुलांच्या हातांत देऊन कधीं कधीं प्रश्न लिहावयास मुलांना सांगतां येईल. ज्यानें पुस्तक वाचलेंच नाहीं अशा मुलाचे हातांत पुस्तक दिलें तरी प्रश्नाचें उत्तर लिहिणें त्याला शक्य होणार नाहीं. पुस्तक वाचलें असलें तरी त्यांतील कोणता भाग उत्तरामध्यें येणें जरूर आहे, हें मुलांना समजत नाहीं. पुस्तकाच्या सहाय्यानें थोड्या वेळांत योग्य उत्तर लिहिणें ही कष्टसाध्य गोष्ट आहे. विषय तयार करणें व योग्य उत्तर लिहिणें या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. विषय तयार झाला, तो स्मरणांत साठवला म्हणजे योग्य उत्तर लिहितां येईलच असा नियम नाहीं. विषय तयार झाल्यानंतर प्रश्नांची उत्तरें लिहावीत याची तालीम शिक्षकानें वर्गांत घ्यावयास पाहिजे. त्याशिवाय मुलांची तयारी पूर्ण होत नाहीं.

परीक्षा ही कधीं काळीं येणारी असली म्हणजे तिच्याबद्दल भीति वाटते. एरव्हीं कधींही प्रश्न विचारावयाचे नाहींत व फक्त सहामाही किंवा वार्षिक परीक्षेच्या वेळींच प्रश्न विचारावयाचे अशी प्रथा ठेविल्यास मुलांना परीक्षेची भीति वाटते. प्रश्नांचीं उत्तरें लिहिणें हें काम अवघड आहे, परंतु नियमानें नेहमीं करीत गेल्यास तें अवघड होतें; इतकेंच नव्हे तर प्रश्नांचीं उत्तरें देण्यास किंवा लिहिण्यास मुलें उत्सुक होतात. यासाठीं विषय तयार झाला कीं त्यांचे मागें परीक्षा याव्यात. रोज आपण मुलांना प्रश्न विचारतो, परंतु त्यांचीं उत्तरें एक दोन वाक्यांत देतां येतात. झालेल्या विषयांतून परीक्षेला विचारला जाणारा प्रश्न कोणता संभवतो हें शिक्षकानें मुलांना दाखवून द्यावें व त्यावर उत्तर किती ओळींत लिहितां येईल हें बजावून सांगावें.

यावर अशी शंका येते कीं, एकाच प्रश्नाचें उत्तर जर चार

शिक्षकांना लिहावयास सांगितलें, तर तें एकाच प्रकारचें असूं शकेल कां? किंवा एका शिक्षकानें लिहिलेलें उत्तर दुसऱ्यानें तपासिलें तर त्यास पूर्ण गुण मिळतील कां? किंवा एकाच प्रकारचें उत्तर चार परीक्षकांचे हातीं पडलें तर सर्वांकडून सारखेच गुण त्या उत्तराला मिळतील कां? अनुभव असा आहे कीं, सर्वांकडून सारखे गुण मिळत नाहींत. मग यांत दोष कोणाचा? विद्यार्थ्यांचा खात्रीनें नाहीं. प्रत्येक परीक्षकाचा दृष्टिकोन वेगवेगळा असल्यामुळें ही परिस्थिति निर्माण होते. म्हणजे येथें नशीबाचा भाग आलाच. रामाची उत्तरपत्रिका अ परीक्षकाकडे गेली म्हणून रामाला बरे गुण मिळाले व गोपाळाची उत्तरपत्रिका त्याच्या दैवयोगानें खाष्ट अशा ब परीक्षकाकडे गेली म्हणून त्यास थोडे गुण मिळाले. यामध्यें गोपाळाला योग्य न्याय मिळाला नाहीं, असेंच कोणीही म्हणेल. सर्वांना सारखा न्याय द्यावयाचा तर सर्व विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका एकाच शिक्षकानें तपासाव्यात. परंतु विद्यार्थी पुष्कळ व परीक्षकही अनेक असतील तर एका परीक्षकाकडे सर्व विद्यार्थ्यांचे ठराविक प्रश्नांचे कागद जाणें जरूर आहे. एक व दोन प्रश्न एका परीक्षकानें तपासावेत, तीन व चार प्रश्न दुसऱ्या परीक्षकानें तपासावेत, अशा रीतीनें सर्व प्रश्नांची वांटणी करतां येईल. परंतु तेथेंही पुन्हां अडचण आलीच. एका विद्यार्थ्याचे प्रश्न पांच वेगवेगळ्या परीक्षकांनीं तपासायाचे म्हणजे पांच वेगवेगळ्या बुकांत किंवा वह्यांत विद्यार्थ्याला वेगवेगळे प्रश्न लिहावे लागणार. यापेक्षां सर्व परीक्षकांची एकत्र बैठक भरवून प्रत्येक प्रश्नावर कसें उत्तर यावयास पाहिजे, प्रत्येक प्रश्नाचे लहानसहान भागावर देखील प्रत्येकानें एकाच पद्धतीनें किती गुण द्यावयाचें हें अगोदर ठरविलें म्हणजे विद्यार्थ्यांचे बाबतींत अन्याय होण्याचा फारसा संभव नाहीं. याच पद्धतीनें मॅट्रिकच्या परीक्षेच्या उत्तरपत्रिकांची व्यवस्था केली जाते.

वरील प्रकारची अडचण येऊं नये,कोणाही विद्यार्थ्याची उत्तरपत्रिका कोणाच्याही हातांत पडो, ज्याप्रमाणें गणिताच्या उत्तरपत्रिकामध्यें गुण देण्याच्या पद्धतीमध्यें निश्चितता असते, तशाच प्रकारची निश्चितता इतर विषयांमध्येंही यावी, यासाठीं वेगवेगळ्या तऱ्हेनें प्रश्न विचारण्याच्या पद्धती अमलांत येऊं लागल्या आहेत. एकादा निर्बुद्ध परीक्षक असला किंवा झोपेंत जरी तो उत्तरपत्रिका तपासूं लागला, तरी त्याच्या हातून तपासण्यामध्यें चूक होणें अशक्य, अशाच रीतीनें प्रश्न विचारले जातात. या प्रकारच्या कांहीं पद्धति आपण पाहूं. हायस्कूल व मिड्ल्स्कूल स्कॉलरशिपचे प्रश्न याच पद्धतीनें सध्यां काढले जात आहेत.

१. खालील वाक्यांत मोकळ्या जागीं शब्द भरा; किंवा खालील वाक्यें पुरीं करा.

( अ ) क्लाईव्ह हिंदुस्थानास——सालीं परत आला. त्यानें——सालीं——लढाईमध्यें सुराजउद्दौला याचा पराभव केला.

( ब ) वसईच्या तहानें————ऱ्हास झाला.

( क )————हा हिंदुस्थानचा पहिला व्हाईसरॉय होता.

( ड ) हिंदुस्थानला उन्हाळ्यांत——वाऱ्यापासून व हिवाळ्यांत——वाऱ्यापासून पाऊस मिळतो.

( इ )——हें हिंदुस्थानांतील सर्वांत मोठें उद्योगाचें शहर आहे.

२. खालीं दिलेल्या विधानांतून चुकीचे शब्दांस काट मारा. ( येथें मुलांना योग्य शब्दांची निवड करावी लागते. )

( अ ) उन्हाळ्यांत रात्रीपेक्षां दिवस मोठे / लहान असतात.

( ब ) नदी सपाट मैदानांत आल्यावर जोरानें / संथपणें वाहते.

३. खालीं दिलेल्या दोन याद्यांपैकीं एकीमध्यें महत्त्वाच्या गोष्टी व दुसरीमध्यें सन दिलेले आहेत. त्यांची योग्य रीतीनें जुळणी करा.

( अ ) १ प्लासीची लढाई, २ नादीरशहाची हिंदुस्थानावर स्वारी ३ बुद्धाचा मृत्यू, ४ रेग्युलेटिंग ॲक्ट, ५ हिंदुस्थानांतील बंड, ६ ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना, ७ शिवाजीचा राज्याभिषेक, ८ पानिपतची तिसरी लढाई, ९ औरंगजेबाचा मृत्यू, १० शिकंदरची हिंदुस्थानवर स्वारी.

सन:—इ स. पू. ३२७, १७६१, १७५७, १७०७, १६००, १७३९, इ. स. पू. ४८७, १८५७, १७७३, १६७४.

( ब ) पुढें दिलेल्या गोष्टींचा खालीं दिलेल्या यादींतील देश व शहरें यांच्याशीं विशेष संबंध आहे; तेव्हां त्या यादींतील देशांच्या व शहरांच्या पुढें योग्य गोष्टी लिहा.

( आरमारी ठाणें, खेळणीं, घड्याळें, साखर, ज्यूट, मांस, टीक, मोठी भिंत, कापड, पनामा कालवा, कॉफी, सोनें, कापूस, याक. )

| | |
|---|---|
| १ स्वित्झर्लंड | ८ मँचेस्टर |
| २ तिबेट | ९ न्यूझीलंड |
| ३ जपान | १० ब्राझील |
| ४ सिंगापूर | ११ इजिप्त |
| ५ जाव्हा | १२ मध्य अमेरिका |
| ६ चीन | १३ ब्रह्मदेश |
| ७ कलकत्ता | १४ जोहान्सबर्ग |

४. कंसांत दिलेल्या कारणांपैकीं चुकीच्या कारणांवर काट मारा.

१. बंगालची लोकसंख्या दाट आहे, कारण ( तेथें पुष्कळ लोक राहातात; दरवर्षीं दोन पिकें काढतां येतात; तो ब्रिटिश सरकारच्या ताब्यांत आहे. )

२ इंग्लंडला आपल्या ताब्यांत जिब्राल्टर ठेवावयास पाहिजे, कारण ( तें भूमध्य समुद्राचें नाकें आहे; तो एक भक्कम किल्ला आहे; तें आफ्रिकेच्या जवळ आहे. )

५. खालीं दिलेल्या वाक्यांपुढें ' होय ' किंवा ' नाहीं ' यांपैकीं जो योग्य असेल तो शब्द लिहा.

( १ ) दुसरा बाजीराव हा सर्वांत मोठा पेशवा होता (  )

( २ ) सर जॉन शोअरनें तटस्थपणाचें धोरण अमलांत आणिलें (  )

( ३ ) हुमायुनानें कनोजच्या लढाईत शेरशहाचा पूर्णपणें पराभव केला. (  )

६. पुढील वाक्यें दुरुस्त करा.

१ मोंगलाशीं लढतां लढतां चांदबिबी मारली गेली.

२ नाना फडणिसानें नारायणराव पेशव्यांचा खून करविला.

३ शिवाजी सिंहगड येथें मृत्यु पावला.

वरील सर्व प्रश्नांचीं उत्तरें तपासावयाचीं झाल्यास कोणीहि परीक्षक ठराविक गुण देईल. केवळ परीक्षकाचे लहरीवर गुण कमी किंवा अधिक देणें राहणार नाहीं.

परीक्षा केव्हां घेण्यांत याव्यात हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. वर्षाचे काठीं परीक्षा असावयास पाहिजे, कारण त्या परीक्षेच्या निकालावर मुलास वरचे वर्गांत चढवावयाचें कीं खालीं ठेवावयाचें, हें आपण ठरवीत असतों. वर्षाचे दोन भाग पाडिले जातात. जूनपासून

दिपवाळीचे सुटीपर्यंत एक व दिपवाळीपासून एप्रिलपर्यंत दुसरा. या दोन्हीं कालमर्यादेनंतर सहामाही परीक्षा व वार्षिक परीक्षा घेण्यांत येतात. सहामाहीच्या किंवा पांचमाहीच्या एका कालखंडाचे पुन्हां भाग पाडले जातात. कांहीं ठिकाणीं मासिक परीक्षा असतात व कांहीं ठिकाणीं आठवड्याच्या परीक्षा असतात. कांहीं शाळांतून महिन्यामध्यें शेवटीं दोन किंवा तीन दिवसांत सर्व वर्गांची सर्व विषयांत परीक्षा घेतली जाते. कित्येक शाळांतून फक्त प्रत्येक आठवड्यांत—शनिवारीं शेवटचे दोन तास—एका विषयाची परीक्षा घेतली जाते. या पद्धतीनें प्रत्येक महिन्यांत कधीं चार व कधीं पांच विषयांमध्यें परीक्षा होते.

पांच विषयांपेक्षां जास्त विषय असतील तर इतर वारीं देखील परीक्षा घेणें जरूर पडतें. कांहीं ठिकाणीं कोणत्याही दिवशीं ठराविक वेळीं परीक्षा न घेतां, परीक्षा घेण्याचें कार्य शिक्षकांचे मर्जीवर व सवडीवर अवलंबून ठेवण्यांत येतें. महिन्यामध्यें जे त्या विषयाकरितां तास असतील त्यांपैकीं एका तासाला ही परीक्षा घेतली जाते.

कोणत्याही पद्धतीनें परीक्षा घेतली तरी महिन्यांतून एकदां प्रत्येक विषयाची परीक्षा होणें जरूर आहे हें ठरतें. पालकांस आपल्या मुलांची प्रगति प्रत्येक विषयामध्यें कशाप्रकारें होत आहे; हें समजणें जरूर आहे. खरें पाहतां नवीन अभ्यास घेतांना झालेल्या अभ्यासाची उजळणी करण्याची पद्धत शिक्षकानें ठेवावी. झालेल्या अभ्यासामध्यें लहान लहान प्रश्न विचारून चांचणी घ्यावी. परीक्षा या विद्यार्थ्यांची प्रगति अजमावण्याकरितां जशा घेण्यांत येतात, त्याचप्रमाणें शिकविलेला धडा मुलांना बरोबर समजला आहे किंवा नाहीं, हें पाहण्याकरितांही शिक्षकांना त्या घ्याव्या लागतात. नवीन विषय समजावून दिल्याबरोबर तो विद्यार्थ्यांनीं तयार करावयास हवा, अशी ताकीद शिक्षकानें मुलांना प्रथमपासूनच देऊन ठेवावी. परीक्षा येईल तेव्हां झालेल्या विषयाची उजळणी करा-

वयाची, अशी पद्धत मुलांकडून स्वीकारली जाऊं नये, यासाठीं नवीन अभ्यास सुरू होण्यापूर्वी उजळणीचे प्रश्न विचारावेत. शिपायाची बंदुक जशी त्याचे खांद्यावर, शत्रू येईल तेव्हां बंदुक घेईन असें तो म्हणत नाहीं; त्याचप्रमाणें विषय शिकवून झाला कीं, तो विद्यार्थ्याजवळ तयार पाहिजे, मग परीक्षा उद्यां येवो किंवा आणखी चार दिवसांनीं येवो.

अभ्यासाची उजळणी योग्य प्रकारें व्हावी यासाठीं अभ्यास करण्याची एक विशेष पद्धत विद्यार्थ्यांचे अंगवळणी पडणें जरूर आहे. शाळेंत झालेला रोजचा अभ्यास मुलांनीं घरीं पाहिला पाहिजे. वर्गांत जो अभ्यास समजावून दिला, त्यापैकीं कांहीं समजला नसल्यास, तो पुढील वेळीं शिक्षकास विचारला गेला पाहिजे. वर्गांत धडा झाला परंतु तो आपणास किती समजला हें मुलें ताबडतोब पाहात नाहींत व यामुळें कांहीं दिवसांनीं होणाऱ्या परीक्षेच्या वेळीं त्यांची तारांबळ उडते. आपणांस जेथें अडचण उत्पन्न होईल तेथें शिक्षकास विचारावें, हें देखील कांहीं विद्यार्थ्यांकडून भित्रेपणामुळें होत नाहीं. तरी शिक्षकानें नेहमीं आपल्या अडचणी काय आहेत त्या न लाजतां वर्गामध्यें उठून मांडण्याबद्दल मुलांना सांगावें. शिक्षक जर प्रेमळपणानें या अडचणी सांगतील तर मुलें देखील धैर्यानें प्रश्न विचारावयास लागतील. परंतु एकानें विचारलेल्या प्रश्नास ' विषय होतो त्यावेळीं लक्ष द्यावयाचें नाहीं व मागाहून दुसऱ्यास त्रास द्यावयाचा; नेहमीं नेहमीं तुम्हांला कोण सांगणार; बैस, तूं ठोंब्या आहेस, तुला नाहींच कळावयाचें; ' यांसारखीं उत्तरें मिळालीं तर प्रश्न विचारावयाचें धैर्य विद्यार्थ्यांस कधींच होणार नाहीं.

मोठी परीक्षा सहामाहीस व वर्षास होत राहील, परंतु मुलांचें यशापयश या परीक्षांवर सर्वस्वी अवलंबून राहूं नये. मधून मधून वर्गामध्यें ज्या चांचण्या घेतल्या जातात त्या देखील महत्त्वाच्या समजण्यांत याव्यात व त्यावरही विद्यार्थ्यांची प्रगति गणण्यांत यावी. एकादा मुलगा जर वार्षिक

परीक्षेस आजारीपणामुळें बसला नाहीं, तर त्याच्या एकंदर प्रगतिकडे पाहून त्यास वरचें वर्गांत घालावयाचें कीं नाहीं हें ठरविण्यांत यावें.

आठवड्याच्या किंवा महिन्याच्या परीक्षेमध्यें विचारलेले सर्व प्रश्न एका वहीमध्यें मांडून ठेवण्याची प्रथा कांहीं शाळांमधून आहे, ती चांगली आहे. प्रत्येक विषयामध्यें प्रश्न कोणत्या स्वरूपाचे असतात, हें विद्यार्थ्यांना कळावयास या वहीचा चांगलाच उपयोग होतो. जो विषय मुलांना एका वर्षांत शिकावयाचा आहे त्यावर किती व कोणते प्रश्न संभवतील हे विषयशिक्षकानें ठरविल्यास, ते मुलांना उतरून दिल्यास व 'या प्रश्नांचीं उत्तरें तुम्हाला आलीं म्हणजे तुम्ही या विषयांत खात्रीनें पास व्हाल' असें विद्यार्थ्यांना सांगितल्यास, मुलें विषयाचा अभ्यास जास्त आस्थेनें करूं लागतात. एवढ्या प्रश्नांचीं उत्तरें शोधून काढलीं म्हणजे सर्व पुस्तक वाचावयास नको असें त्यांना वाटतें, परंतु खरें पाहातां सर्व पुस्तक वाचल्याशिवाय सर्व प्रश्नांचीं उत्तरेंच लिहितां येत नाहींत. या पद्धतीनें उत्तर कसें लिहावें याचाही विद्यार्थ्यांना बोध होतो. विषय समजणें व त्या विषयावर वेगवेगळ्या तऱ्हेचे आलेले प्रश्न नीट लिहिणें, हीं दोन वेगवेगळीं कामें आहेत व तीं विद्यार्थ्यांच्या अंगवळणी पडतील असे प्रयत्न मुलांकडून करवून घेणें शिक्षकाचें कर्तव्य आहे.

परीक्षा घेण्याचा हेतु कोणता आहे हें शिक्षकानें आपल्या मनाशीं अगोदर ठरविलें पाहिजे. परीक्षेचे हेतु खालीलप्रमाणें असूं शकतील.

( १ ) विद्यार्थ्यांचें ज्ञान अजमावणें.

( २ ) विद्यार्थ्यांच्या बुद्धीचें मापन करणें.

( ३ ) मुलांची तर्कबुद्धि किती आहे किंवा मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग विद्यार्थी कोठपर्यंत करतात हें समजावून घेणें.

( ४ ) मुलांची कर्तृत्वशक्ति किती आहे हें ठरविणें.

( ५ ) विषयाची उजळणी करणें.

( ६ ) आपली तयारी किती झाली आहे हें विद्यार्थ्यांना कळावें.

( ७ ) आपण मुलांना शिकविलें तें त्यांना किती समजलें हे शिक्षकाला कळावें.

( ८ ) हुशार व मठ्ठ विद्यार्थी यांची प्रत लावतां येणें.

वर दाखविल्याप्रमाणें परीक्षा घेण्याचे हेतु असले तरी पुष्कळ वेळां इतर गुणांची देखील परीक्षा होते. मुलगा हुशार असतो, परंतु तो धांदल्या असतो; मनाचा कच्चा असतो. परीक्षेच्या हॉलमध्यें शेंकडों लोक बसलेले पाहिले म्हणजे त्याचा थरकांप होतो, तोंड कोरडें पडतें व कांहीं वेळ कांहींच सुचत नाहीं. अशा वेळीं या मुलाची केवळ एका विषयाची परीक्षा न होतां त्याच्या धैर्याची देखील परीक्षा होते. विषयाची परीक्षा न होतां विषयाशीं ज्यांचा संबंध नाहीं अशा व्यक्तीविषयक गुणांची परीक्षा होते व म्हणूनच या परीक्षाच नकोत असें कांहींचें म्हणणें आहे. जीं मुलें स्वभावतःच भित्री आहेत त्यांची तोंडीं परीक्षा घेतली तरी देखील त्यांचें मानसिक दैन्य आडवें येतें. शाळांतून शिक्षण घेतांना हा लवचिकपणा नाहींसा झाला पाहिजे. आपल्याला गूळ पाहिजे असेल तर वाणी ज्याप्रमाणें गूळ तेवढाच जोखून देतो, त्याप्रमाणें विषयाचें ज्ञान तेवढेंच काढून तें मोजतां येणें शक्य नाहीं. समयसूचकता, सभाधीटपणा, शांत वृत्ति वगैरे गुणांच्या पद्दयांतून हें ज्ञान बाहेर पडावयाचें असतें व म्हणून विषयाचे ज्ञानाबरोबर वरील गुणांची जोपासना विद्यार्थ्यांमध्यें शिक्षकाकडून झाली पाहिजे.

## प्रकरण सहावें

# आरोग्य

आतांपर्यंत आपण कोणत्या गोष्टींचा विचार केला तें पाहूं. शाळा म्हणजे काय, तिच्याशीं कोणाकोणाचा संबंध येतो, शिक्षकावर कोणती जबाबदारी येते, हेडमास्तर यांचें कर्तव्य काय, शाळेचें काम योग्यप्रकारें होण्यासाठीं शिस्तीची किती जरूरी आहे, शिस्त ही अंत:करणांतील जाणिवेशिवाय निर्माण होत नाहीं व यासाठीं अंतर्व्यवस्थेमध्यें मुलांवर कांहीं जबाबदारी सोपविणें कसें जरूर आहे वगैरे आपण पाहिलें. यानंतर अभ्यासाविषयीं विचार केला. अभ्यासाचीं वेळापत्रकें कोणतीं असावींत, शिक्षकानें स्वत: लेखी काम किती केलें पाहिजे, अभ्यासाचा व परीक्षांचा संबंध काय, परीक्षांचें महत्त्व कितपत आहे, परीक्षा जर असावयास पाहिजेत, तर त्यांचें स्वरूप काय असावें, हेंही आपण ठरविलें. आतां आरोग्याविषयीं विचार करावयाचा आहे.

सकृत्दर्शनीं असें वाटण्याचा संभव आहे कीं, याचा शाळेशीं काय संबंध येतो ? इतिहास, भूगोल, गणित वगैरे विषय जसे खात्यानें नेमून दिलेले असतात, तसा आरोग्यविषय हा कांहीं नेमून दिलेला विषय नाहीं. प्रश्न बरोबर आहे. आरोग्य हा विषय जरी अभ्यासक्रमांत नसला तरी इतर संबंधी विषयांचा ज्याप्रमाणें शिक्षकाला विचार करावा लागतो, त्याप्रमाणें याचाही विचार करणें भाग पडतें. मुलांच्या प्रकृति जर नीट राहिल्या नाहींत, तर सर्व वर्गांचे अभ्यास सुरळीत चालण्यास अडचण येणार व या दृष्टीनें आरोग्याकडे पुष्कळ लक्ष दिलें पाहिजे. विशेषत: ज्या खेड्यांत आरोग्य ही चीज माहीत नसते तेथें आरोग्याची विशेष काळजी शिक्षकाला घ्यावी लागते. खेड्यांतील मोकळी हवा,

स्वच्छ पाणी, साधें अन्न यामुळें पुष्कळांच्या प्रकृति बऱ्या असतात व यामुळें आरोग्यासाठीं म्हणून कांहीं नियम पाळावे लागतात, याची जाणीव खेड्यांतील लोकांना नसते व जेथें पालकांचें अज्ञान तेथें मुलांची काय स्थिति होत असेल याची कल्पना करणेंच बरें. शहर काय किंवा खेडें काय, हिंदुस्थानांत एकंदरीत आरोग्याकडे फार कमी लक्ष पुरविलें जातें, असें विद्वानांचें मत आहे.

शाळेच्या आरोग्यामध्यें शाळेच्या इमारतीची स्वच्छता व शाळेंतील मुलांचें आरोग्य या दोन गोष्टींचा समावेश होतो. हेडमास्तर यांचेकडे प्रथम शालागृहाचें आरोग्य राखण्याची जबाबदारी येते. शाळा सुरू होण्यापूर्वीं शाळेंतून—आंतुन व बाहेरून—फिरून शालागृह स्वच्छ असल्याबद्दल हेडमास्तर यांनीं खात्री करून घ्यावी. एकादी खोली झाडली नसल्यास ती गड्याकडून झाडून घ्यावी. शाळा भरावयास लागली म्हणजे बाहेरील घाण आंत जेणेंकरून कमी येईल हें पाहिलें पाहिजे. पावसाळ्यांत चिखल व इतर वेळीं माती किंवा फुपाटा आंत न येईल हें पाहिलें पाहिजे. शाळा चालू असतांना कांहीं कचरा होणार नाहीं यासाठीं मुलांना अमुक ठिकाणीं कागद टाकावेत अशी ताकीद द्यावी व ते त्याप्रमाणें नियम पाळतात कीं नाहीं हें पाहावें. 'मुलांनीं कागद फाडून टाकूं नयेत' असा मोघम नियम करून भागणार नाहीं, तर त्याचें पालन होत आहे किंवा नाहीं हें सतत पाहिलें पाहिजे. एकदां नियमाप्रमाणें वागण्याची संवय झाली म्हणजे मग फारसें लक्ष देण्याची जरूर पडणार नाहीं. हेडमास्तर यांनीं हें काम एकट्याकडेच न घेतां कांहीं स्वयंसेवक मदतीस घ्यावेत किंवा आळीपाळीनें एकाएका वर्गाकडे हें काम सोंपवावें. ज्या वर्गाकडे किंवा वर्गांतील एका तुकडीकडे काम असेल त्यानें सर्व वर्गांची आरोग्यदृष्ट्या पाहाणी करावी, इतकेंच नव्हे तर, मुलांची देखील पाहाणी करावी. कोणाचा पोषाख घाण आहे,

दांत, नाक, डोळे स्वच्छ नाहींत, कोणी आंघोळ केली नाहीं वगैरे गोष्टींची पाहाणी करावी. कित्येक वेळेला दांत कसे घासावेत हें शिकविण्याकरितां वर्गांतील सर्व मुलांकडून दांत घासून घ्यावेत. जें कार्य आईबापांनीं करावयास पाहिजे तें त्यांच्या अज्ञानामुळें शिक्षकांस करावें लागतें. यासाठीं इतर विषयाचा वेळ आरोग्यासाठीं देणें भाग पडतें. तेवढ्यापुरता वेळापत्रकांतील कार्यक्रम बाजूस ठेवावा लागतो.

आपल्या समाजांत ज्या घाण संवयी आहेत त्यापासूनही शाळेस उपसर्ग पोहोंचतो. कोठेंही थुंकणें, नाक शिंकरणें, लघवी करणें या त्या संवयी होत. आगगाडीच्या डब्यांतून ' थुंकू नका ' अशा पाट्या कंपनीका ठिकठिकाणीं लावाव्या लागतात. आपण घाण केली तर त्यापासून दुसऱ्याला त्रास होण्याचा संभव आहे काय, याचा आपण कधीं विचारच करीत नाहीं. हा विचार करावयास मुलांना शिकविलें पाहिजे. नाक शिंकरावयाचें असेल, लघवी करावयाची असेल, कागद किंवा घाण टाकावयाची असेल तर, त्याकरितां वेगवेगळ्या जागा राखून ठेविल्या पाहिजेत. डोळा चुकवून कोठेंही लघवी करण्याची मुलांना फार संवय असते, तिकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. मोठमोठ्या शहरांतून मुताऱ्या बांधण्यांत आलेल्या आहेत. मुताऱ्या सोडून कोणी लघवी केल्यास त्यास दंड केला जातो. पाश्चिमात्य सुधारलेल्या देशांमध्यें रस्त्यावर कागद टाकण्याची देखील मनाई आहे. पाश्चात्य लोक आपल्या हातरुमालांत आपला खाकरा व शेंबूड टाकतात व घरीं आल्यानंतर तो हातरुमाल स्वच्छ धुतात. आपणाला हा गलिच्छपणा वाटेल व तो स्वतःपुरता विचार केल्यास तो आहेही, परंतु यायोगें इतरांना तरी त्रास होत नाहीं. आपल्या घाणीपासून स्वतःला थोडा त्रास झाला तरी चालेल, परंतु इतरांना तो होऊं नये, असा विचार करण्याची त्यांना नेहमीं संवय झालेली असते.

शाळेच्या इमारतीचें आरोग्य पाहिल्यानंतर मुलांच्या आरोग्याचा

विचार व्हावा. वर सांगितल्याप्रमाणें विद्यार्थ्यांकरवीं त्यांच्या आरोग्याची पाहणी करावी. किंवा वर्ग शिक्षकांनीं पाहाणी करावी. पाणी मुबलक असतांही आंघोळ कांहीं मुलें करीत नाहींत. प्रथम शौचास जाणें, दांत घासून तोंड धुणें व आंघोळ करणें या तिन्ही आवश्यक गोष्टी आहेत, हें पुनः पुन्हा मुलांना सांगावें लागतें. ज्या शाळा सकाळीं भरतात तेथें प्रातर्विधी आटोपल्याशिवाय शाळेला आलेलीं मुलें बरींच सांपडतात. दातांतील घाण किंवा नखांतील घाण अन्नाबरोबर पोटांत जाते, म्हणून ती घाण काढून टाकावी. आंघोळ करतांना साबण नसला तरी फडक्यानें कातडी चोळून धुवावी व त्यावरील मळ नाहींसा करावा, नाक शिंकरून टाकावें; हें मुलांना सांगावें. वर्ग सुरू करण्यापूर्वी जशी प्रार्थना, त्याप्रमाणें प्रार्थनेनंतर ही आरोग्यतपासणी होणें जरूर आहे. प्रथम प्रथम या तपासणीस वेळ लागेल, पण पुढें पुढें इतका वेळ लागणार नाहीं.

कांहीं ठिकाणीं डॉक्टरांची मदत फुकट मिळाल्यास निदान वर्षांतून एकदां मुलांच्या आरोग्याची तपासणी करावी. वागणुकीच्या दोषामुळें जडलेले रोग तरी नाहींसे करतां येतात, कांहीं भयंकर स्वरूपाचे रोग असतील तर ते वेळींच पालकांचे नजरेस आणण्याची संधि शिक्षकास मिळते. डॉक्टरानें दाखविलेले दोष पालकांना कळविण्यांत आले पाहिजेत. जे समंजस आहेत व ज्यांना ऐपत आहे असे पालक आपल्या मुलांचे दोष नाहींसे करण्याची काळजी वेळींच घेतात; परंतु कांहीं पालक या कामीं दुर्लक्ष करतात, असा अनुभव आहे. यास शिक्षकाचा इलाज नाहीं. या कामीं सरकारचें जर कांहीं सहाय्य मिळेल तर खेड्याचें आरोग्य सुधारण्यास फारच मदत होण्याचा संभव आहे. खेड्यापाड्यांतून मुलांच्या आरोग्याची पाहाणी करणारे व कांहीं रोगांवर उपाय-योजना करणारे डॉक्टर आज आवश्यक आहेत. अशा प्रकारचे डॉक्टर खाजगीरीत्या किंवा सरकारमार्फत मिळेपर्यंत स्वस्थ बसण्याचें कारण नाहीं.

कांहीं बाबतींत शिक्षकांसही डॉक्टर बनतां येईल. आज आयुर्वेदिक उपाय करणारे कांहीं शिक्षक आहेत कीं नाहीं. पोटांतील गुप्त रोग शिक्षकास सांगतां येणार नाहींत; परंतु कोणास ऐकावयास कमी येतें, कोणाची दृष्टी सदोष आहे, कोणाच्या घशांतील गांठी ( टॉन्सील ) वाढलेल्या आहेत, खरजेसारखे संसर्गजन्य रोग कोणास झाले आहेत, वगैरे शिक्षकांसही कळतां येण्यासारखे आहे व त्यावर उपाययोजना जरी करतां आली नाहीं, तरी तो दोष न वाढूं देण्याविषयीं खबरदारी घेतां येईल. ज्यास लांबून फळ्यावरचें दिसत नाहीं किंवा ज्यास लांबून ऐकूं येत नाहीं, अशा विद्यार्थ्यांना फळ्याजवळ व शिक्षकाजवळ बसवितां येईल. घशांतील गांठीं असतील त्यांना मिठाच्या गुळण्या करून नियमीत व्यायाम घ्यावयास तो सांगील, खरूज आलेल्या मुलांना तो दूर वेगळे बसवील. शरीर हें यंत्र सर्वांजवळ आहे व त्या यंत्राची माहिती थोड्या-बहुत प्रमाणानें सर्वांना असते. शिक्षकास ती जास्त असावयास पाहिजे. गांवांतील सर्व माणसांमध्यें तो अधिक ज्ञानी व अनुभवी म्हणून गणला जातो व यासाठीं इतरांना मार्गदर्शक होण्याची सुसंधि त्यानें गमावतां कामा नये.

हेडमास्तरानें किंवा शिक्षकानें शाळा स्वच्छ ठेवावी व मुलांकडून घाण होणार नाहीं याबद्दल कशा प्रकारें काळजी बाळगावी हें आपण पाहिलें. शाळेकडूनही मुलांच्या आरोग्यास कांहीं बाद येईल असें वर्तन होतां कामा नये. शाळेमध्यें मुलें ५।६ तास असतात, या वेळांत त्यांना भरपूर मोकळी हवा व उजेड मिळावयास हवींत व या दृष्टीनें वर्गाची योजना शिक्षकानें करावयास हवी. एका लहानशा खोलीमध्यें ३०।४० मुलें जर बसत असतील व खोलीमध्यें मोकळी हवा खेळत नसेल, तर मुलांच्या श्वासोच्छ्वासानें हवा दूषित झाल्याशिवाय राहाणार नाहीं. खेडेगांवांत आरोग्यदृष्ट्या सोयीच्या जागा मिळत नाहींत ही गोष्ट

जरी खरी असली तरी, जी जागा मिळाली असेल तींत बोर्डाच्या व गांवकऱ्यांच्या मदतीनें दुरुस्त्या करतां येतील. खाजगी मालकीची इमारत असेल तर घरमालकाकडून योग्य ती दुरुस्ती करवून घेतली पाहिजे. शिक्षक या बाबतींत परावलंबी असतो हें आम्ही जाणून आहोंत, परंतु त्यानें या कामीं धडपड केल्यास यश आल्याशिवाय राहणार नाहीं. हवेच्या दृष्टीनें सदोष जागा असेल तर मधून मधून वर्ग बाहेरील बाजूस-पाऊस व ऊन नसेल तर--नेण्यास हरकत नाहीं. शाळेजवळ एखादें झाड असेल तर उत्तमच. त्या झाडाखालीं वर्ग बसविण्यास हरकत नाहीं. गांवापासून थोडी दूर किंवा गांवाचे सरहद्दीवर शाळा असल्यास अशा प्रकारें उघड्यावर वर्ग भरविणें सोपें जातें.

खोलीमध्यें मोकळी हवा खेळते आहे किंवा नाहीं, हें शिक्षकानें पहावयाचें असतें, त्याप्रमाणें खोलींत भरपूर उजेड आहे कीं नाहीं, हेंहि पाहिलें पाहिजे. पुस्तक वाचतांना उजेड पुस्तकावर पडावयास पाहिजे. त्याचप्रमाणें फळ्याचा ज्यावेळीं शिक्षक उपयोग करतील त्यावेळीं उजेड फळ्यावर पडावयास पाहिजे. सर्वच उजेड फळ्यावर पडून जर फळा चमकत असेल तर मात्र तें हितकारक नाहीं. खोलींत निदान दोन बाजूंनीं उजेड येणें जरूर आहे. या दोन बाजूंपैकीं ज्या बाजूनें जास्त उजेड येईल त्या बाजूला सर्व मुलांचे डावे हात यावेत हें उत्तम. एकाच बाजूला सर्व विद्यार्थ्यांचीं तोंडें न करतां, चारी भिंतीला पाठ करून जर मुलें बसविण्यांत आलीं, तर डाव्या हाताकडून उजेड आला पाहिजे हें तत्त्व पाळतां येत नाहीं. मुलें कशींही बसोत त्यांच्या पुस्तकांवर व ज्या फळ्याकडे त्यांना पाहून कार्य करावें लागतें त्या फळ्यावर उजेड पडला पाहिजे. कित्येक वेळेला एकाच बाजूकडून प्रकाश येतो व त्याच बाजूला शिक्षक बसतात व तेथेंच फळा ठेवलेला असतो. नेहमीं शिक्षकाकडे व फळ्याकडे पहावें लागल्यामुळें व उजेड समोरून

येत असल्यामुळें विद्यार्थ्यांच्या डोळ्यांवर परिणाम होतो. हवा व उजेड हीं मुलांना भरपूर मिळावीं, हें शिक्षकानें पाहावें व त्यासाठीं गांवाच्या व स्कूलबोर्डाच्या मदतीनें योग्य ती दुरुस्ती करून घ्यावी, एवढेंच आम्हांस सांगावयाचें आहे.

कांहीं शाळांतून बसण्याची सोय नसते. मुलें जमिनीवर बसतात, इतकेंच नव्हे तर, जमिनीला खोल खड्डे पडलेले असतात. जमिनी करण्यासाठीं स्कूलबोर्डकडे मागणी होते, परंतु पैसे मिळेपर्यंत हे मुलांचे हाल चाललेले असतात. ही स्थिति लहान शाळेंतच नाहीं; तर मोठ्या शाळेंतही दृष्टोत्पत्तीस येते. अशा वेळीं बोर्डाची वाट न पाहतां आपल्या वर्गांतील खड्डे शिक्षकांनीं मुलांच्या साह्यानें भरवून घ्यावेत. शनिवारचा किंवा रविवारचा वेळ काढून हें काम करतां येईल. मुलांची सोय मुलांनींच करावयाची असल्यामुळें पालकमंडळीकडून या बाबतींत कांहीं दोष दिला जाईल असें आम्हांस वाटत नाहीं. गांवांत भांडणें असतील तर शिक्षकानें मुलांकडून कामें करवून घेतलीं, याचा सर्वत्र गवगवा होण्याचा संभव आहे. इतकेंच नव्हे तर अशा वेळीं ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरपर्यंत शिक्षकाविरुद्ध तक्रारी गेल्याचींही कांहीं उदाहरणें आमच्या माहितींत आहेत. अशी नाजूक परिस्थिति असेल तर शिक्षकानें पालकांची परवानगी घेऊन अशाप्रकारें काम करणें बरें, म्हणजे मागाहून त्रास करण्याची पाळी येणार नाहीं. कांहीं ठिकाणीं मुलें घरूनच आपलें बस्कर घेऊन जातात. ही वहिवाट चांगली आहे. शाळागृहांतून विशेषतः पावसाळ्यांत ओल येते व अशा ओलींत मुलांना बसविणें योग्य नाहीं. प्रत्येक गांवांत वाण्याचीं दुकानें असतात व तेथें जुनीं पोतीं मिळण्याचा संभव असतो. दुकानदाराकडून हीं पोतीं मिळवून व शिवून घेतल्यास लांब पट्टा तयार करतां येईल; व तो गुंडाळून ठेवतां येईल. शाळेच्या अडचणी गांवकऱ्यांना सांगून भागणार नाहीं. त्यांना संधी

पाहून शाळेंत बोलाविलें पाहिजे व मुलांना कोणता त्रास सोसावा लागतो हें त्यांना प्रत्यक्ष दाखविलें पाहिजे.

शालागृहाची स्वच्छता नेहमीं ठेवावयाची हें ध्येय जसें शिक्षकापुढें त्याचप्रमाणें विद्यार्थ्यांपुढें रहावयास पाहिजे. वर्षांतून असे कांहीं प्रसंग उत्पन्न व्हावयास पाहिजेत कीं, ज्यावेळीं स्वच्छतेचें कार्य विशेष केलें जावें. दिपवाळीला जसा घरांना रंग लावून तीं आपण सुशोभित करतों, त्याप्रमाणेंच शालागृहांची दुरुस्ती झाली पाहिजे. दिपवाळीला शाळा देखील स्वच्छ करतां येतील. शहरांतील मुलें दिपवाळीला बाहेरगांवीं जाण्याचा संभव असतो; खेडयांतील मुलें खेड्यांतच राहतात. शालागृह शृंगारण्याची कल्पना मुलांपुढें ठेविली व वर्गवार काम वांटून दिलें तर गृह कसें स्वच्छ करावें व कसें शृंगारावें हें शिक्षण सुटीच्या दिवसांतही मुलांना मिळणार आहे. हें काम करवून घेण्यासाठीं शिक्षकांना मात्र त्या गांवीं रहावें लागणार. ज्या गांवचे शिक्षक त्या गांवीं शिक्षकाचें काम करतांना क्वचितच आढळतील व यायोगें दिपवाळी-सारखी सुट्टी आपल्या गांवीं जाऊन उपभोगण्याची संधि गमावणें त्यांचे जिवावर येणार व हेंही स्वाभाविक आहे. सर्व सुट्टी या कामीं खर्च न करतां कांहीं दिवस जरी खर्च झाले तरी शाळागृह स्वच्छ होऊन शिक्षकासही आपल्या गांवीं जातां येईल.

वर्षांतून कांहीं समारंभ घडवून आणण्याची प्रथा ठेवल्यास त्यावेळींही शालागृह स्वच्छ करण्याची संधि अनायासें येते.

---

## प्रकरण सातवें

# वाचनालय

मुलांनीं काय वाचावें ? फक्त क्रमिक पुस्तकेंच वाचावीं काय ? क्रमिक पुस्तकांमध्यें सर्व वाङ्मय सांठविलें आहे काय ? सर्वसाधारण ज्ञान केवळ शिक्षकांच्या तोंडून किंवा क्रमिक पुस्तकांच्या द्वारां मुलांना मिळणें शक्य आहे काय ? या सर्व प्रश्नांचा आपण विचार केला म्हणजे वाचनालयाची–यांतच पुस्तकालयाचा अंतर्भाव आम्ही करतों– प्रत्येक शाळेस किती जरूर आहे, हें सहज कळून येईल. ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न मुलांनीं स्वतः करावयाचा आहे; शिक्षकानें त्यांना फक्त मदत करावयाची आहे. हें जर खरें आहे तर विद्यार्थ्यांनीं तें ज्ञान कोठें जाऊन पैदा करावें ? मुलांच्या दृष्टीनें लिहिलेलीं पुस्तकें हेंच ज्ञान मिळविण्याचें प्रमुख साधन नव्हे काय ?

शाळा लहान असो किंवा मोठी असो, शाळेमध्यें पुस्तकालय असणें जरूर आहे व शिक्षकानें प्रयत्न केल्यास असें पुस्तकालय तयार करतां येतें. ज्याप्रमाणें शाळेसाठीं गांवकऱ्यांकडून आपण मदत मिळवितों, त्याप्रमाणें पुस्तकालयासाठीं मदत मिळवावयास पाहिजे. वाचनाची ज्याला हौस आहे अशा एकाद्या गांवकऱ्यास पुस्तकालयाची अडचण दाखविल्यास तो ती दूर करण्याचा प्रयत्न करील. तो श्रीमंत असेल तर कांहीं द्रव्यद्वारां मदत करील, निदान आपल्याजवळ पडून असणारीं कांहीं पुस्तकें तो देऊं शकेल. हीं सर्वच पुस्तकें मुलांचे उपयोगाचीं ठरणार नाहींत. कांहीं पुस्तकें शिक्षकांचे उपयोगी पडतील. एकाद्या श्रीमंत गृहस्थाचें नांव पुस्तकालयास देण्याचें ठरविल्यास

एकाद्या शुभप्रसंगीं ग्रंथालयाचें उद्घाटन करण्याचा समारंभ घडवून आणावा.

स्कूल-बोर्डाकडून कांहीं शिक्षकांसाठीं व कांहीं मुलांना बक्षिसें म्हणून पुस्तकें दिलीं जातात. हीं पुस्तकें मुलांकडून वाचून झाल्यावर मुलांचीं शाळेस भेट म्हणून शिक्षकानें शाळेच्या पुस्तकालयांत ठेवून घ्यावीं‍त. त्यावर मुलांचीं नावें व सन घालावींत. वर्षोंवर्षीं मिळणारीं पुस्तकें अशा रीतीनें एकत्र केल्यास पांच वर्षांत बरींचशीं पुस्तकें खात्रीनें गोळा होतील. शिक्षकांसही वाचण्याचा नाद पाहिजे. पुस्तकालयांत मुलांकरितां ठेविलेल्या पुस्तकांत काय आहे, हें त्याला सांगतां आलें पाहिजे. कोणत्या मुलास कोणतें पुस्तक देणें जरूर आहे हें त्यास ओळखतां आलें पाहिजे. कांहींचीं भूक लहान असते, कांहींची मोठी असते. ज्यांना अजून वाचनाची गोडी लागलेली नाहीं त्यांना लहान लहान गोष्टींचींच पुस्तकें देणें श्रेयस्कर होईल.

गांवांतील कांहीं ठिकाणीं वर्तमानपत्रें येत असतात. तीं शाळेमध्यें दुसऱ्या दिवशीं आणून ठेवण्याची व्यवस्था केल्यास जगांत काय चाललें आहे याचें ज्ञान मुलांना सहजच होणार आहे. शाळा सुटल्यानंतर वरच्या वर्गांतील मुलांनीं हीं वर्तमानपत्रें वाचावींत. वाचनालयाकरितां स्वतंत्र खोली असल्यास ठीकच. नाहीं तर एकाद्या सोयीच्या वर्गांतच हीं पत्रें ठेवण्यांत यावींत. वर्तमानपत्राची गोडी सर्वांना लागत नाहीं. ती त्यांना लागावी यासाठीं किंवा जगांतील घडामोडी त्यांना कळाव्यात यासाठीं, आठवड्यांतून एकाद्या दिवशीं प्रार्थनेनंतर शिक्षकानें वर्तमानपत्रांतील सार सांगावे. वर्तमानपत्रांतील कांहीं मनोरंजक भाग पत्रावरून वाचून दाखवावा म्हणजे अनायासें त्या पत्राकडे मुलांचें लक्ष वेधलें जातें. सर्व शिक्षकांनीं वर्तमानपत्राचा अभ्यास ठेवावा. यासाठीं आठवड्यांतून माहिती सांगण्याचें काम हेडमास्तरांनींच न घेतां आळीपाळीनें तें शिक्षकाकडे

द्यावें. चीन–जपानचें युद्ध, स्पेनमधील युद्ध, झेकोस्लोव्हाकिआचा प्रश्न व त्यामुळें उठून राहिलेली खळबळ हीं मुलांच्यापुढें योग्य प्रकारें मांडलीं तर भौगोलिक परिस्थिति; देशांचा पूर्वापार इतिहास व त्यांची राजकीय महत्वाकांक्षा नजरेसमोर येईल. लढाईच्या निमित्तानें देशाची भौगोलिक, ऐतिहासिक, माहिती मिळविण्याचा मनुष्य प्रयत्न करतो. इटली–अबिसिनियाचे लढाईमुळें अबिसिनिया हा मुलुख कोणत्या स्वरूपाचा आहे हें लोकांना कळून आलें. झेकोस्लोव्हाकिआसंबंधीं जेव्हां सुडेटिन जर्मनांच्या तक्रारी ऐकूं येऊं लागल्या व जर्मनीनें सुडे-टिन जर्मनांचा मुलूख जर्मनीस जोडण्याबद्दल मागणी केली, तेव्हां झेकोस्लोव्हाकिआ हा प्रांत महायुद्धानंतर कसा निर्माण करण्यांत आला, तो पांच सहा वेगवेगळ्या जातीचा कसा बनलेला आहे व त्यामुळें तो प्रांत एकत्र ठेवणें किती कठीण आहे; याची कल्पना लोकांना येऊं लागली व या देशाचें करावें तरी काय, हा बिकट प्रश्न मोठ्या राष्ट्रांना कसा जाचक झाला, याचें वर्म कळूं लागलें.

पुस्तकालय शाळेंतील मुलांसाठीं ठेवतां येईल, परंतु वाचनालय सर्व गांवासाठीं देखील खुलें ठेवण्यास हरकत नाहीं. यायोगें गांवकऱ्यांचा संबंध शाळेशीं येत राहील. आज शाळा ही महारवाड्यासारखी दूर ठेविली जाते. महारवाडे जवळ जवळ येत चालले, परंतु शाळा अजून गांवाला आकर्षण करूं शकत नाहीं, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. शाळा व शाळेंतील मुलें जगापासून, गांवापासून, इतकीं सोंवळीं ठेवण्यांत आलीं कीं, त्याचा परिणाम आज मुलांना व शिक्षकांना भोगावा लागत आहे. शिक्षक शाळेच्या कामापलीकडे पाहात नाहीं. आपला देश काय आहे, तो कोठें चालला आहे, याची त्याला कल्पना फारशी नाहीं. तो भोळा सांब आहे व तो तसा आहे म्हणून इतर लोक त्याची चेष्टा करतात. आज राजकारण पूर्वीइतकें सोंवळें राहिलें नाहीं. सभेला जावें,

वर्तमानपत्रें वाचावींत, स्वतंत्रपणें प्रत्येकानें विचार करावा, अशी मुभा सरकारनें आज दिली आहे. अशा काळांत गांवच्या कांहीं चळवळी-ज्यांचा संबंध शिक्षणाशीं येण्यासारखा आहे शाळेंत चालावयास हरकत नाहीं. ग्रामपंचायत, सहकारी पतपेढी, प्रमुख नागरिकांचें व्याख्यान किंवा कीर्तन शाळागृहांत व्हावयास काय हरकत आहे ? वाटेल त्याला रात्रीचे उतरण्याकरितां धर्मशाळेसारखा शाळागृहाचा उपयोग करूं देऊं नका, चकाट्या पिटण्याकरितां किंवा पत्ते, सोंगट्या खेळण्याकडे त्याचा उपयोग होणार नाहीं एवढी सावधगिरी घेतली म्हणजे झालें. शाळा-गृहाचा शाळा म्हणूनच उपयोग केला पाहिजे असें आजपर्यंतचें शाळा-खात्याचें धोरण होतें व तें एका दृष्टीनें योग्यच होतें. परंतु शाळे-सारखी सार्वजनिक स्वरूपाचीं कामें दिवसानुदिवस जास्त निघूं लागलीं, तर प्रत्येक चळवळीसाठीं लहानशा गांवामध्यें वेगवेगळीं घरें कोठून पैदा करावयाचीं ? शिवाय ११ ते ५ शाळागृहाचा उपयोग झाल्यानंतर त्याला कुलूप लावून ठेवण्यामध्यें तरी काय अर्थ आहे ? त्या गृहाचा अनेक कार्यांकरितां उपयोग झाला तर त्याची किंमतही वाढणार आहे. गांवकऱ्यांना शाळा आपली वाटावी यासाठीं प्रयत्न होणें जरूर आहे व शाळेमध्यें वाचनालय गांवकऱ्यांसाठीं उघडल्यानें हा आपलेपणा वाढणार आहे, एवढेंच आम्हांस सुचवावयाचें आहे.

वरच्या इयत्तांचें क्रमिक पुस्तकामध्यें जे धडे घेतलेले असतात ते कोणत्या पुस्तकांतून घेतलेले आहेत, हें लिहिण्याची चाल पडूं लागली आहे. आतां खालचे वर्गांकरितां लिहिलेल्या कांहीं पुस्तकांतूनही अशा प्रकारचा निर्देश केलेला आढळतो. ज्या पुस्तकांतून हे उतारे घेतलेले आहेत तीं पुस्तकें, किंवा त्यांपैकीं कांहीं, शाळेच्या पुस्तकालयांत असणें जरुर आहे. पुस्तकांतील उतारा एकाद्या मुलास आवडला व ज्या पुस्तकांतून तो घेतला आहे तें पुस्तक आपण वाचावें, अशी इच्छा

मुलामध्यें जर उत्पन्न झाली तर, ती इच्छा शाळेला पुरी करतां आली पाहिजे. गडकरी, खाडिलकर, कोल्हटकर, देवल, अत्रे यांचीं नाटकें; गडकरी कोल्हटकरांचें विनोदी लेख; फडके, खांडेकर, आपटे यांच्या कादंबऱ्या यांची ओळख विद्यार्थ्यांना होणें जरूर आहे. त्याशिवाय क्रमिक पुस्तकांतील उतारा चांगला समजणार नाहीं. सर्व शाळांना अशा प्रकारची पुस्तकें खरेदी करतां येणार नाहींत, परंतु ज्यांना शक्य आहे त्यांनीं असे प्रयत्न जरूर करावेत. मोठ्या शाळांतून वर्गावर्गाकरितां निरनिराळ्या पुस्तकांचे गट तयार ठेवावेत. कोणत्या वर्गानें कोणतीं पुस्तकें वाचावीत हें वर्गशिक्षकांचे सल्ल्यानें हेडमास्तरनें ठरवावें. वर्गांत जितकीं मुलें आहेत तितकीं तरी पुस्तकें असावींत. हीं सर्व वेगवेगळींच पुस्तकें असलीं पाहिजेत असें नाहीं. कांहीं चांगलीं पुस्तकें असतील तर त्यांच्या अनेक प्रति खरेदी करण्यांत याव्यात. ह. ना. आपटे यांच्या मूळ कादंबऱ्या बऱ्याच किंमतीच्या आहेत. यांपैकीं कांहीं कादंबऱ्यांची लहान पुस्तकांत रूपांतरें झालेलीं आहेत व त्यांच्या किंमतीहि, पुस्तकें सर्वांना घेतां येतील अशा ठेविलेल्या आहेत. हीं व या सारखीं पुस्तकें हळू हळू बाहेर पडूं लागली आहेत व लोकांची मागणी जशी होईल त्याप्रमाणें तीं जास्त प्रमाणांत निघूं लागतील.

आज जें वाङ्मय मराठींतून प्रसिद्ध होत आहे, तें बहुतेक प्रौढांकरितांच तयार होत आहे. लहान मुलांकरितां जीं पुस्तकें लिहिलीं जातात त्यांत क्रमिक पुस्तकांचा जास्त भरणा आहे. मुलांकरितां कांहीं थोडीं पुस्तकें लिहिलीं गेलीं आहेत, नाहीं असें नाहीं परंतु तीं ज्या प्रमाणांत प्रसिद्ध व्हावयास पाहिजेत त्या प्रमाणांत प्रसिद्ध होत नाहींत. जर या पुस्तकांना मागणी असेल तर अशा प्रकारचीं पुस्तकें पुष्कळ लिहिलीं जातील. प्राथमिक शिक्षकांमधून मुलांकरितां पुस्तकें लिहिणारे लेखक सहज मिळूं शकतील. परंतु या शिक्षकवर्गाला स्वतःचें भांडवल घालणें अशक्य

आहे. मुंबईचे रा. ढवळे, कर्नाटक प्रेसचे रा. कुलकर्णी, पुणें येथें आनंद मासिक व चित्रशाळा प्रेस यांनीं भांडवल घालून बरींच पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत, हें त्यांना भूषणावह आहे.

शाळाखात्याकडून बक्षिसाकरितां या पुस्तकांची खरेदी केली जाते, परंतु या पुस्तकांचा उठाव मोठ्या प्रमाणावर जर व्हावयाचा असेल, तर पालकांनीं आपल्या मुलांकरितां हीं पुस्तकें जास्त प्रमाणांत खरेदी केलीं पाहिजेत. मुलांकरितां क्रमिक पुस्तकांचे बाहेर सहसा पुस्तकें आज खरेदी केलीं जात नाहींत.

मागणी नसल्यामुळें पुरवठाही होत नाहीं. लहान मुलांकरितां मुद्दाम पुस्तकें कोण लिहितो ? खेड्याकरितां मोठ्या अक्षरांचीं सोपीं सोपीं पुस्तकें कोण लिहितो ? मागणी व्हावी यासाठीं अगोदर आकर्षक पुस्तकें तयार करण्यासाठीं स्वत:चें भांडवल घालण्याचें धाष्टर्य कोण करतो? या बाबतींत ग्राम सुधारणेच्या कार्यक्रमापासून सरकारचें व शहरांतील लोकांचें थोडें लक्ष या प्रश्नाकडे लागल्यासारखें दिसत आहे. साक्षरताप्रसार करण्याकरितां निघालेलीं मंडळें स्वस्त, सोपीं, मोठ्या अक्षरांचीं पुस्तकें बाहेर काढीत आहेत. परंतु याच्या कितीतरी पटीनें हे प्रयत्न व्हावयास पाहिजेत. आज खेड्यापाड्यांतून वाचनालयें उघडलीं जात नाहींत याचें कारण खेड्यांची गरिबी हें तर आहेच, परंतु खेड्यानें काय वाचावें किंवा खेड्याला काय वाचतां येईल या विचाराचा अभाव हें होय. शहरांतील माणसांनीं जीं पत्रें वाचावयाचीं तींच खेड्यांनीं वाचावयाचीं. खेड्यांतील ज्या थोड्या व्यक्तींचा शहरांशीं संबंध येतो तींच माणसें खेड्यांत वर्तमानपत्रें वाचतात. इतर मंडळींचा जगाशीं फारसा संबंध रहात नाहीं या परिस्थितीमुळें शाळेंत शिकून तयार झालेलीं मुलें पुढें अक्षरओळख देखील विसरतात. शाळेंत असतांना वाङ्मयाची गोडी उत्पन्न झालेली नसते व शाळा सुटल्यावर

वाचनही सुटतें. शिकलेल्या मुलांच्या संसर्गानें दुसरी मुलें शिकण्याच्या ऐवजीं त्यांचीच पुंजी खलास होते. या परिस्थितीमुळें प्राथमिक शिक्षणाकडे खर्च झालेल्या पैशांचें चीज व्हावें तसें होत नाहीं. पांच पंचवीस वर्षें गांवांत शाळा असूनही लिहितां व वाचतां येणारीं माणसें गांवांत फारशीं सांपडत नाहींत, ही वस्तुस्थिति बऱ्याच ठिकाणीं आपणांस आज पहावयास सांपडते. \साक्षरता टिकविण्यासाठीं सरकारनें, लोकल बोर्डानें किंवा म्युनिसिपालिटीनें फिरतीं वाचनालयें सुरू करावींत।

शहर आणि खेडें यांना जवळ जवळ आणण्याचा सरकारचा प्रयत्न चालू आहे. अशा वेळीं खेडयापाडयांतून फुकट वाटलें जाईल असें वर्तमानपत्र किंवा माहिती-पत्र प्रसिद्ध होणें जरूर आहे. कलेक्टर-साहेबांचा जाहीरनामा जसा चावडीवर लाविला जातो तसें हें माहिती-पत्र शाळेच्या बाहेरील बोर्डावर लाविलें जावें व तें गांवकऱ्यांनीं वाचावें. शक्य असल्यास कांहीं प्रमुख ठिकाणीं हीं पत्रें चिकटविलीं जावींत किंवा वाचण्याकरितां ठेविलीं जावींत. आज शहरामध्यें हजारों वर्तमानपत्रें निघत आहेत व कित्येकांना यांत बूड येत आहे. सरकारनेंही अशा तऱ्हेची बूड सोसून शिक्षणाचें महत्त्वाचें अंग म्हणून या कामीं खर्च करणें जरूर आहे. लोकांना वाचण्याची गोडी लागेपर्यंत हा प्रयत्न यशस्वी झाला असें वाटणार नाहीं, परंतु परिणामीं तो हितकारक ठरल्याशिवाय राहाणार नाहीं, असा भरवंसा वाटतो.

---

प्रकरण आठवें

# खेळ व व्यायाम

\मुलांचें व शाळेचें आरोग्य राखलें पाहिजे.\शाळा, शाळेच्या आजूजूची हवा व पाणी निरोगी आहे, परंतु मुलांची प्रकृति जर ठीक नसेल तर आरोग्यकारक वातावरणापासून स्वतःच्या शरीराला फायदा करून घेतां येणार नाहीं. शुद्ध प्राणवायु आपल्या सभोंवतालीं वावरत आहे, परंतु आपल्या नाकपुड्या कोंदल्या असतील तर तो प्राणवायु आपलें काय हित करणार? यासाठीं (शरीरयंत्र उत्तम चाललें पाहिजे व तें चालण्यासाठीं व्यायामाची आवश्यकता आहे. प्राणवायु शरीरांत घेतला गेला पाहिजे, तो शरीरांतील रक्तांत मिसळला पाहिजे;\ त्याशिवाय शरिराला तरतरी व हुरूप वाटत नाहीं. आपण बैठें काम करून शिणतों. मेंदूच्या कांहीं पेशी थकून जातात. त्यांना आराम मिळाला पाहिजे, थकलेल्या भागाला ताजें रक्त पुरविलें गेलें पाहिजे. थकलेल्या मेंदूला रक्त व विसावा न मिळेल तर तो पुढें चांगलें काम देणार नाहीं.

शाळांमधून जे व्यायाम करविले जातात, त्यांत कांहीं स्नायूचें बल वाढविणारे व कांहीं फुप्फुसांना मजबूत करणारे व्यायाम असतात. श्वास नाकावाटे घेणें ही साधी गोष्ट वाटते, परंतु ती पुष्कळांना साधत नाहीं. फुप्फुसांना लहानपणापासून व्यायाम न दिल्यामुळें तीं फुगत नाहींत; त्यांची प्रसरण व आकुंचन पावण्याची शक्ति जवळ जवळ नाहींशी झालेली असते. फुप्फुसें जेवढीं फुगवतां येतील तेवढीं फुगविलीं पाहिजेत. त्यायोगें फुप्फुसांतील कानाकोपऱ्यासही प्राणवायु मिळतो व तीं कुजण्याची भीति उरत नाहीं. रबराची नळी न वापरतां आपण खुंटीला ठेवून दिली व कांहीं दिवसांनीं ती ओढून लांबविण्याचा प्रयत्न केला तर तिचे तुकडे

पडतात, तीच गत फुप्फुसाची होते. यासाठीं लहानपणापासून नाकावाटें श्वास घेण्यास व सोडण्यास मुलांना शिकविलें पाहिजे.

दुसरा व्यायाम स्नायुंचा. हातामध्यें कोणताही पदार्थ-डंबेल, जोडी, काठी-न घेतां योग्य पद्धतीनें गात्रांना फिरविल्यास सर्व स्नायूंना व्यायाम मिळतो. आपण आपला नेहमींचा व्यवसाय करीत असतांना कांहीं भागांना मुळींच व्यायाम मिळत नाहीं. शिक्षक, विद्यार्थी, कारकून हे खुर्चीजवळ किंवा टेबलाजवळ बसून तासचे तास काम करीत असतात. अशांच्या पोटाचे, पाठीचे, कंबरेचे स्नायूंना व्यायाम मिळणें जरूर असते. स्नायुंना चलनवलन देण्यासाठीं घ्यावा लागणारा व्यायाम मग तो कोणत्याहि स्वरूपाचा असो—थोडा कंटाळवाणा असतो; परंतु तो करणें जरूर आहे. नमस्काराचा व्यायाम पुष्कळांना कंटाळवाणा वाटतो. तीच तीच गोष्ट पुनः पुन्हा करावयाची. परंतु ती करणें अवश्य असल्यामुळें कंटाळा करतां उपयोगी नाहीं. शाळेमध्यें शरीर बळकट होईल याकरितां रोज सर्व मुलांना थोडा वेळ कां होईना व्यायाम देणें जरूर आहे. अमेरिकेनें प्रत्येक कुटुंबाकरितां वॉल्टर कँपचे डेली डझन या नांवाचे बारा व्यायाम तयार केले आहेत. या व्यायामाचे ग्रामोफोन रेकार्डस् तयार केले आहेत. हे रेकार्ड लावावयाचे व त्याप्रमाणें चहा घरांतील सर्व मंडळींनीं एकत्रा घ्यावयाचा, त्याप्रमाणें हा व्यायाम १० ते १५ मिनिटें सर्वांनीं मिळून घ्यावयाचा, हा हें रेकॉर्डस तयार करणारांचा हेतु आहे. हे व्यायाम हिंदुस्तानांतील कांहीं शाळांतूनहि आज प्रचलित आहेत. याच प्रकारच्या इतर व्ययामाच्या पद्धति निघाल्या असून त्यांचीही रेकॉर्डस तयार करण्यांत आलेलीं आहेत. स्त्री व पुरुष या उभयतांना व्यायामाची जरूर आहे व या दृष्टीनें पाश्चिमात्य देशांमध्यें व्यायाम घेण्याचा प्रयत्न स्त्री-पुरुष करीत असतात. आपल्याकडे औंध संस्थानामध्यें हायस्कूलच्या सर्व मुलांना नमस्काराचा व्यायाम सक्तीनें दिला जातो.

शरीराचें आरोग्य राखण्याकरितां आपल्याकडे आसनांची योजना केलेली होती. परंतु आसनें करणें म्हणजे ही एक प्रकारची कसरत आहे, अशी बहुतेकांची समजूत झाल्यामुळें त्याकडे कानाडोळा करण्यांत आला होता. आतां पाश्चिमात्य व्यायामपद्धति हळूहळू आसनाच्या पद्धतीवर आली आहे, म्हणून कीं काय न कळे, पुन्हां आसनांकडे लोकांचे लक्ष लागूं लागलें आहे. शरीराचे कांहीं रोग आसनाच्या योगें सुधारल्याचीं उदाहरणें आहेत. पुढें मागें सर्व शाळांतून आसनांविषयींचें अज्ञान नाहींसें होऊन आसनाचा व्यायाम कांहीं प्रमाणांत सुरू होईल अशी आशा वाटते.

व्यायाम ज्याप्रमाणें आवश्यक त्याप्रमाणें खेळ सर्व शाळांतून आवश्यक आहेत. व्यायाम मुलांना कंटाळवाणा व त्रासदायक वाटतो, त्याचे उलट खेळ मुलांना प्रिय वाटतो. खेळानें मुलें मुबलक प्राणवायु ग्रहण करतात. हसणें, धावणें, स्वतःचीं कामधामें विसरणें, यामुळें मुलांचा शीण पार नाहींसा होतो व त्यांना तरतरी वाटते. खेळानंतर जेवण करून विश्रांति-झोप-घेतली म्हणजे मुलें दुसऱ्या दिवसाच्या कामाकरितां उत्साहपूर्ण बनतात.

घरांमध्यें खेळाला जागा पुरेशी नसते; परंतु खेडयांतही जागा तयार केल्याशिवाय मिळत नाहीं खेडयांतील मुलें मोकळ्या हवेंत असल्या-मुळें त्यांना व्यायामाची फारशी आवश्यकता वाटत नाहीं म्हणून म्हणा किंवा खेळाची एकंदरीत हौस कमी म्हणून म्हणा, खेडयांत खेळ म्हण-ण्यासारखे खेळले जात नाहींत. शाळेजवळ मोकळें मैदान सांपडणार नाहीं, परंतु थोडे दूर गेल्यास खेळाकरितां जागा मिळणें कठीण नाहीं. अशी जागा गांवकऱ्यांच्या, स्कूलबोर्डाच्या किंवा मामलेदार साहेबांच्या मदतीनें मिळवावी व तिचा योग्य उपयोग करावा.

खेडयांतील शाळांमधून ड्रील–शिक्षक वेगळा नसतो. शहरांतील

शाळांमधूनही अशा शिक्षकांची आतां गरज राहिलेली नाहीं. प्रत्येक शिक्षकांस मुलांकडून व्यायाम घेतां आला पाहिजे व मुलांमध्यें खेळ खेळतां आले पाहिजेत. शाळा सकाळ दुपार भरत असो किंवा केवळ दुपारीं भरत असो, दर दिवशीं शेवटचा तास हा खेळासाठीं राखून ठेवावयास हरकत नाहीं. खेळ कोणता कां असेना परंतु प्रत्येकानें तो खेळला पाहिजे ही सक्ती असावी. चार मुलांनीं खेळ खेळावयाचा व बाकीच्यांनीं त्यांच्याकडे बघावयाचें हें ठीक नाहीं. खो खो, हुतुतूसारखे खेळ आज शहरांतूनही प्रिय होत आहेत. त्यासंबंधीं जे नियम ठरवून ठेविलेले आहेत ते मुलांना समजावून दिले पाहिजेत. नियमाशिवाय खेळांत रंग येत नाहीं. बालवीर चळवळीपासून कांहीं छोटे छोटे खेळ तयार करण्यांत आले आहेत. यावर डॉ. नातू व रा. जोशी यांनीं 'खेळांचें पुस्तक' तयार केलें आहे. मे. एस. एस. शिर्के जळगांव व रा. मोडक मुंबई यांनींही खेळावर पुस्तकें लिहिलीं आहेत. हीं पुस्तकें शिक्षकांच्या पुस्तकालयांसाठीं हेडमास्तरांनीं मिळवावींत. वर्गवार खेळ घेऊन वर्गावर्गांमध्यें मधूनमधून चढाओढ लावावी. शक्य झाल्यास जवळच्या खेडयांतील शाळांच्या संघामध्यें चढाओढीचा कार्यक्रम व्हावा. नगर जिल्हामध्यें व्ह. फायनल परीक्षेकरीतां आलेल्या शाळाशाळांमध्यें अशा प्रकारची चढाओढ होते. यशस्वी शाळांना व मुलांना बक्षिसेंही वांटण्यांत येतात.

अभ्यास चालू असतांना दोन तासामध्यें थोडा वेळ लहानसा व्यायाय देण्याची पद्धत आहे. वर्गाची जागा मोठी असेल तर वर्गामध्यें, नाहीं-तर वर्गाबाहेर मुलें नेऊन हा व्यायाम देतां येतो. हात वर करणें, श्वासोच्छ्वास घेणें एवढाच हा व्यायाम असतो. यायोगें बसून बसून आलेला आळस नाहींसा होतो. वर्गामध्यें हवा खेळती नसेल तर दूषित हवेनेंही मुलांना कंटाळा येतो. अभ्यास चालू असतां मुलांचें लक्ष अभ्यासाकडे

नाहीं असें शिक्षकास दिसून आल्यास शिक्षकानें हा उपाय ताबडतोब अमलांत आणावा. खालीं वांकून पाठीच्या कण्यालाही शीण येतो. तो पाठीचा कणा उलट बाजूनें वाकविला जाईल असा व्यायाम यावेळीं देणें जरूर असतें.

मुलांनीं खेळ खेळावेत यासाठीं शिक्षकानें मुलांमध्यें खेळलें पाहिजे. आज शिक्षकांना खेळ खेळतां येत नाहींत ही मोठी आपत्ति होय. प्रपंचामध्यें शिक्षक शिरला म्हणजे तालीम करणें, खेळणें या गोष्टी तो अजिबात विसरतो. असेंही कांहीं शिक्षक सांपडतात कीं ज्यांनीं उभ्या आयुष्यांत कधीं जोर काढलेला नसतो. अशा शिक्षकाचे हातून मुलांना योग्य व्यायाम कसा मिळणार ! शिक्षक जसा कमींत कमी ०द्द. फायनल असावयास पाहिजे, तसा त्याला कांहीं खेळही खेळतां आला पाहिजे. ही लायकी नोकरी देण्यापूर्वीं शाळाखात्याचे अधिकाऱ्यानें पाहिली पाहिजे.

शारीरिक शिक्षणाकडे सरकारचें लक्ष लागलेलें आहे व कॉलेजांतून हें शिक्षण सक्तीनें देण्याचें घाटत आहे. पुढें मागें शाळेंतूनही हें शिक्षण सक्तीनें देण्यांत येईल. शारीरिक शिक्षण न झाल्यास त्याला मॅट्रिकचें किंवा बी. ए. चें सर्टिफिकेटच मिळणार नाहीं, असा कायदा सरकारनें केला म्हणजे, अनायासें लोकांचें लक्ष या शिक्षणाकडे लागेल. प्रत्येक माणसाला आपलें, आपल्या मुला-बाळांचें माताभगिनींचें रक्षण करतां आलें पाहिजे. आपण दुर्बल राहिलों तर दुसरा आपल्यावर चढाई करण्याचा प्रयत्न करतो हा अनुभव प्रत्येकास येतो. जगांत शांतता नांदावी, हें ध्येय ठीक आहे; परंतु तें ध्येय साध्य होण्यासाठीं प्रत्येक राष्ट्र बलवान झालें पाहिजे. वेळ प्रसंग आला तर लढण्याची तयारी प्रत्येक राष्ट्रानें ठेविली तरच जगांत शांतता नांदेल, असें एकानें म्हटलें आहे, व तें बरोबर दिसतें. रोगी मनुष्य हा जसा मृत्यूला पाचारण करीत

असतो, त्याचप्रमाणें दुर्बल राष्ट्र बलवान् राष्ट्राला स्वतःवर चालून येण्यास बोलावीत असतें. १९१८ नंतर जगांत लढाई होणार नाहीं असा चंग बांधून राष्ट्रसंघानें योजना आंखली होती, परंतु अवघ्या वीस वर्षांत तो राष्ट्रसंघ मृतवत् पडला आहे. सर्व राष्ट्रांनीं लढावयाचें नाहीं असें ठरविल्यास शांततेची शक्यता आहे. जोपर्यंत कांहीं राष्ट्र असंतुष्ट आहेत, आहे त्यापेक्षां आपला देश वाढावा अशी त्यांची महत्त्वाकांक्षा आहे, तोंपर्यंत त्याला शांतिपाठ कसा आवडणार? जर्मनी, इटली सारख्या राष्ट्रांनीं सर्व युरोप खंडामध्यें व पर्यायानें सर्व जगामध्यें कोणती शिकवण पसरविली आहे, हें आपण पाहात आहोंत. प्रत्येक राष्ट्र आज आपलें शस्त्रास्त्रांचें सामर्थ्य वाढवीत आहे. ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानचें रक्षण करण्याची जबाबदारी स्वीकारली होती व आहेही; परंतु भूमध्य समुद्रांत इटलीनें मिळविलेल्या वर्चस्वामुळें युद्धप्रसंगीं हिंदुस्तानचें संरक्षण हिंदुस्थानलाच करावें लागणार अशी साधार भीति वाटत आहे. हिंदुस्थान आज अत्यंत दुर्बल आहे. त्याचें रक्षण करण्यास ब्रिटिश सरकार धांवून न आल्यास अबिसिनियासारखी हिंदुस्थानची स्थिति होणार आहे. अबिसिनिआ-जवळ शस्त्रें तरी होतीं, शत्रूशीं दोन हात करण्यास शरीर सामर्थ्य तरी त्यांचे जवळ होतें, आज आम्हांजवळ काय आहे? हिंदुस्थानचें रक्षण हिंदुस्थानाला कसें करतां येईल, हा प्रश्न राष्ट्रीय पुढाऱ्यांपुढें आहे. भावनेच्या जोरावर मोटमोठ्या सभा होतील, त्यांत भाषणें होतील, टाळ्या वाजविल्या जातील; परंतु वेळ आली तर दुसऱ्यानें टाकलेला प्राणहारक वायूच्या बॉबपासून आपलें रक्षण करण्यास तोंडावर घालण्याचे मुखवटेही आपणाजवळ नाहींत, ही केविलवाणी स्थिति दृष्टी आड करून भागणार नाहीं. हिंदुस्थानांत लोकसंख्या भरपूर आहे, परंतु या लोकसंख्येच्या जोरावर काय करतां येईल? लढाईचे वेळीं रिक्रूटभरती करावयाची म्हटल्यास शंभरापैकीं किती लोक शरीरानें लायक टरतील?

महाराष्ट्रांत मराठ्यांचें राज्य होतें त्यावेळीं आमची शरीरसंपत्ती कशी होती व आज नष्ट कां झाली याचा विचार केल्यास, त्यावेळीं मुसलमानापासून-आमचा शेजाऱ्यापासून-आमचें रक्षण करणें आम्हांस जरूर होतें व त्यामुळें प्रत्येकानें आपल्या शरीराची काळजी वाहिली. आज आमच्या देशाचें रक्षण करण्याची जबाबदारी हिंदुस्थानच्या नागरिकांवर पडल्याशिवाय, इतर स्वतंत्र देशांमध्यें दिसून येणारें बळ येथें निर्माण होणार नाहीं. राष्ट्रीय पुढारी या प्रश्नाचा विचार करतीलच, परंतु शाळांतून शारीरिक शिक्षण देण्याचें शिक्षकानें विसरूं नये. आजवर शरीराची हेळसांड झाली ती पुरे झाली. (मुलांना बौद्धिक शिक्षण द्यावयाचें म्हटल्यास त्यास शरीरसामर्थ्याची जोड लागते. मन व शरीर एकमेकांवर अवलंबून असतात. शरीर सुदृढ नसेल तर मन काय काम करूं शकणार ? ) परीक्षेच्या वेळीं परीक्षक किंवा इन्स्पेक्टर मुलांना किती खेळ शिकविले हें पाहात नाहीं, म्हणून खेळांकडे दुर्लक्ष करूं नका. अभ्यासक्रमाच्या बाहेर ज्या अनेक गोष्टी शिक्षकास कराव्या लागतात त्यांपैकी ही एक महत्वाची बाब समजून तिकडे प्रत्येकानें लक्ष द्यावें.

---

## प्रकरण नववें

# धार्मिक शिक्षण

सध्यां प्राथमिक शाळेंतून ज्याला धार्मिक शिक्षण म्हणतां येईल असें शिक्षण दिलें जात नाहीं. कदाचित् कांहीं शाळा अपवाद म्हणून असतील. शाळा सुरू होतांना प्रार्थना म्हणण्याची प्रथा बहुतेक ठिकाणीं आहे. ही प्रार्थना कशा रीतीनें म्हटली जाते हें जर पाहिलें तर त्यावरून एक प्रकारचें सात्विक वातावरण मुलांचे आजुबाजूस निर्माण झालें

आहे, किंवा मुलें परमेश्वराचे थोडे जवळ गेलीं आहेत, असें दिसून येत नाहीं. कांहीं ठिकाणीं प्रार्थना म्हणण्याचें काम मुलेंच उरकतात. कविता ज्याप्रमाणें आपण म्हणतों त्याप्रमाणें एक पद्य म्हणावयाचें. फरक एवढाच कीं, कवितेचा अर्थ शिक्षकाकडून समजलेला असतो; परंतु प्रार्थनापद्याचा अर्थ शिकवलेला नसतो. परमेश्वराची प्रार्थना म्हणावयाची परंतु परमेश्वराजवळ आपण काय मागत आहोंत, हेंच मुलांना कळत नाहीं. राष्ट्रगीत ' वंदे मातरम् ' हें सर्वत्र म्हटलें जातें, परंतु त्याचा साधारण अर्थ मुलांना ठाऊक नसतो; इतकेंच नव्हे तर, तें पद्य शुद्ध लिहिलेलेंही फारच थोड्या ठिकाणीं पाहावयास सांपडेल. पद्य संस्कृतामध्यें असल्यामुळें व समासयुक्त असल्यामुळें शिक्षकास तें सहज समजण्यासारखें नाहीं; परंतु शिक्षकानें प्रयत्न केल्यास मूळ पद्य व त्याचा थोडक्यांत अर्थ शाळेंत लावून ठेवणें कठीण पडणार नाहीं.

प्रार्थना पद्य व राष्ट्रीय पद्य हीं जरी नीट म्हटलीं गेलीं तरी आज धार्मिक बाबतींत एक प्रकारची सुधारणा झाली, असें म्हणावयास हरकत नाहीं. प्रार्थना पद्य व राष्ट्रीय पद्य शुद्ध लिहून शाळेंत लावावींत व शुद्ध म्हणवून घ्यावींत. मुलांकडून कोणत्याही प्रकारची घाई होऊं नये. प्रार्थना म्हणतांना मुलांना आपण देवळांत आहोंत, देवाजवळ आहों, असें वाटलें पाहिजे. देऊळ व विद्यामंदीर एकच, ही त्यांची भावना झाली पाहिजे. देवाजवळ जसे आपण लहान–मोठा; स्त्री–पुरुष ब्राह्मण–अब्राह्मण किंवा स्पृश्य–अस्पृश्य वगैरे भेद पाळीत नाहीं, त्या-प्रमाणें विद्यामंदीरांतही हे भेद पाळणें म्हणजे परमेश्वरा घरीं अपराध करणें होय, असें मुलांना वाटलें पाहिजे. हें वातावरण शिक्षकानें आपल्या पावित्र्यानें निर्माण करावयास पाहिजे. परमेश्वराचे ठिकाणीं शिक्षकाचा विश्वास असेल,प्रार्थनेवर शिक्षकाचा विश्वास असेल, मुलांबरोबर शिक्षकही प्रार्थनेच्या वेळीं हात जोडून उभा राहील व देवाला नमन करील तर हें

वातावरण कां निर्माण होणार नाहीं ? कांहीं शाळांना शाळेचें असें स्वतंत्र शालागृह नसतें. शाळा देवळांत किंवा चावडींत भरवावी लागते. ‘ चावडीमध्यें स्पृश्याअस्पृश्य भेद एक वेळ न पाळला तरी चालेल, परंतु देवळांत तो पाळला पाहिजे; कारण तसा तो पाळला गेला नाहीं, तर सर्व भ्रष्टाकार होईल व मग देव आपणावर रागवेल, ’ ही कांहीं खेडयांतून लोकांची समज आहे, ती शिक्षकास नाहींशीं करतां येईल. निदान शाळेंतील मुलांची तरी तशी समज यापुढें राहतां कामा नये. ही समज स्वराज्याचे आड येणारी आहे.

धार्मिक शिक्षण द्यावयाचें म्हटल्यास तें कसें द्यावें हा प्रश्न आहे. शाळेंत सर्व जातींचीं मुलें असतात. हिंदूंचा भरणा जास्त असला तरी मुसलमान ख्रिश्चन या धर्मांचीहीं मुलें थोडीफार असतात. आपआपले धर्म विसरावयास मुलांना सांगण्याची जरूर नाहीं व तें इष्टही नाहीं. नैतिक शिक्षण म्हटलें तरी धर्माला सोडून देणें कठीण आहे. ज्यानें त्यानें आपला धर्म ओळखला व त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न केला, तरी त्यायोगें धर्माधर्मामध्यें वितुष्ट येणार नाहीं व मुलांचीही नीति सुधारेल. आपण एका परमेश्वराचीं लेकरें आहोंत, हेंच तत्त्व प्रत्येक धर्म प्रतिपादन करीत असतो, व धर्म—शिक्षणानें हीच भावना दृढ व्हावयास पाहिजे. सर्व धर्मांची शिकवण एक आहे हें मुलांना पटविण्यासाठीं हिंदु, मुसलमान, बुद्ध, ख्रिश्चन या धर्मांतील ठळक ठळक वेचें काढून ते मुलांपुढें ठेविलें म्हणजे प्रत्येक धर्म वेगवेगळा आहे ही मुलांची समजूत दूर होईल. एकच तत्त्व केवळ वेगवेगळ्या भाषेमध्यें सांगितलें तर तें भिन्न कसें होतें ?

संतांचीं चरित्रें मुलांपुढें सांगितल्यास धर्माबद्दलची एकांगी कल्पना नाहींशीं होते. संत सर्व जातीमध्यें झाले आहेत व सर्वांची शिकवण एक आहे, हें त्यांच्या चरित्रांतील गोष्टी घेऊन दाखवितां येईल. केवळ हिंदु

धर्मामध्यें जे निरनिराळे संत झाले आहेत त्यावरून हिंदू-धर्मामध्यें पाळला जाणारा भेदभाव किती त्याज्य आहे, हें दिसून येईल. 'भेदाभेद भ्रम अमंगळ' ही शिकवण ज्या संतानें दिली त्यांचेच अनुयायी धर्माचे नांवाखालीं समाजामध्यें केवढें अज्ञान फैलावीत आहेत, हें पाहिलें म्हणजे धर्म धर्म म्हणतां अधर्म आपल्या पदरीं कसा येतो, हें सहज समजतें. तुकाराम, एकनाथ, ज्ञानदेव, जनाबाई, चोखा, सोयरा वगैरे संतांच्या अभंगांमध्यें ज्याप्रमाणें एकच तत्त्व आहे, त्याचप्रमाणें ख्रिस्ताचें बायबल, मुसलमानांचें कुराण, व हिंदूंची गीता व इतर धर्मग्रंथ यामध्यें एकच शिकवण सांपडते. ज्याला आपण सर्व एक आहोंत ही शिकवण द्यावयाची आहे, त्यानें वेगवेगळ्या धर्मांतील उतारे मिळवून त्यांवर मुलांना पाठ द्यावेत. ख्रिस्ताच्या कांहीं गोष्टी बायबलमध्यें दिल्या आहेत. त्यावरून माणसानें जगांत कसें वागावें, कोणत्या प्रकारें वागलें असतांना आपण ईश्वरास प्रिय होऊं किंवा नैतिक वर्तन म्हणजे काय, याची कल्पना येते. 'दुसऱ्यानें आपणांशीं जसें वर्तन करावें असें तुला वाटतें, तसें वर्तन अगोदर तूं दुसऱ्याशीं कर.' 'परमेश्वरानें आपणास क्षमा करावी असें जर तुला वाटत असेल तर तूं अगोदर दुसऱ्यांना क्षमा केली पाहिजे.' 'जें धान्य पेराल तेंच उगवेल' यासारखीं बायबलमधील वचनें, तीं केवळ परधर्मीय पुस्तकांमध्यें आहेत म्हणून कोण फेकून देईल? आज हिंदुस्थानामध्यें आपणास एकी निर्माण करावयाची आहे. प्रत्येकाचे अंतःकरणांत दुसऱ्याबद्दल प्रेम वसलें पाहिजे. आपण शेंडी ठेवतो; दुसरा दाढी ठेवतो; आपण धोतर नेसतो, दुसरा विजार घालतो. केवळ वेष निराळा म्हणून मत्सर करण्याचें कारण नाहीं. दोघांच्या शरीरांत एकाच रंगाचें रक्त आहे, दोघांचीं शरीरें एकाच कारागिरानें बनविलीं आहेत, याची साक्ष पदोपदीं आपणांस पटते.

शाळेमध्यें विषय शिकवीत असतांनाहि एकमेकांबद्दल सहानुभूति आपण निर्माण करावयास पाहिजे. भूगोल विषय शिकवितांना जगांतील वेगवेगळ्या माणसांबद्दल सहानुभूति विद्यार्थ्यांच्या मनामध्यें आपण निर्माण करीत असतो. केवळ नद्या, भूशिरें, डोंगर वगैरेंची नांवेंच मुलांना आपण शिकवीत नाहीं. अनेक ठिकाणीं अनेक प्रकारचे देश आहेत, नानाप्रकारचे लोक तेथें रहातात, वेगवेगळ्या प्रकारचें हवामान तेथें आपण पाहातों. देशांमध्यें उत्पन्न होणाऱ्या मालाची देवाण व घेवाण सारखी चालू असते. एक दुसऱ्यास मदत करीत असतो. हें जग म्हणजे मोठें कुटुंब आहे व त्यांत रहाणारे आपण सर्व बंधु आहोंत ही जाणीव भूगोलविषय शिकतां शिकतां सहजच होत असते. भूगोलानें दिलेली दृष्टी धर्म-शिक्षणानें मजबूत करावयाची आहे.

धर्म-ग्रंथाबद्दल ज्याप्रमाणें मुलांमध्यें आपणांस प्रेम निर्माण करतां येईल; त्याप्रमाणें त्या त्या धर्माच्या मुलांमध्यें व्यक्तीबद्दल प्रेम निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. हिंदूंची मुलें ज्या शाळेंत आहेत त्या शाळेंत हिंदु गृहस्थाशिवाय कोणी गेल्याचें सहसा आढळत नाहीं. हिंदूच्या शाळेंत मुसलमान किंवा ख्रिश्चन सद्गृहस्थांना बोलावून त्यांचे तोंडून त्यांच्या धर्माची शिकवण काय, हें समजावून घेण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्याबद्दल वाटत असलेला परकेपणा नाहींसा होतो, असा अनुभव आहे. दिपवाळीचे सणाला आपण गोडधोड करतों. त्यावेळीं आपल्या मुसलमान व ख्रिश्चन बंधूंना आपण बोलवावें, म्हणजे त्यांच्या सणांतही ते आपणांस बोलावतात. ख्रिस्ती लोक हीं सामाजिक बंधनें उत्तम तऱ्हेनें पाळतात. दुसऱ्याच्या सुखामध्यें स्वतः सुख मानावयास आपण शिकलें पाहिजे, म्हणजे हळूहळू त्यांच्या दुःखाचेही वांटेकरी आपण होऊं लागतो.

ज्याप्रमाणें व्यायाम किंवा खेळ शिक्षकाचे नजरेसमोर व्हावयास

पाहिजेत, त्याप्रमाणें धर्मशिक्षण, हें शिक्षणाचें प्रमुख अंग असें समजून, शिक्षकानें द्यावयास पाहिजे. जेथें एकापेक्षां अधिक शिक्षक आहेत तेथें हें धर्मशिक्षणाचें काम, ज्याचा या शिक्षणावर विश्वास आहे अशा शिक्षकाकडे सोपविण्यांत यावें. असे शिक्षक एकापेक्षां अधिक असतील तर आळीपाळीनें हें काम त्यांच्याकडे सोपवावें. हा विषय अभ्यासक्रमांत नाहीं, म्हणून तो वाटेल तसा घेऊं नये. कोणत्या वर्गाला काय शिकवावें हें दोन तीन शिक्षकांनीं एकत्र बसून ठरवावें. कथा-कीर्तन हीं लोकशिक्षणाचीं महत्त्वाचीं साधनें आहेत. त्यांचाही उपयोग शाळांतून केला जावा.

धर्म-साधनांचा अंतःकरणाशीं संबंध आहे. अंतःकरणांत जागृती व्हावयास पाहिजे. धर्मसाधनाचे वेळीं, शांत गंभीर वातावरण निर्माण व्हावयास पाहिजे. प्रत्येकानें आपली दृष्टी बाहेरून काढून आंत वळविली पाहिजे. अंतःकरण हें परमेश्वराचें आसन आहे. चित्तशुद्धि झाल्यावर परमेश्वर आपण होऊन आसनावर अधिष्ठित होत असतो. मूर्ति पुढें ठेवा किंवा ठेवूं नका. परमेश्वर-साधन ज्या ठिकाणीं चाललें आहे तेथे पावित्र्य दिसलें पाहिजे, टापटिपीनें वस्तू मांडून सौंदर्य निर्माण केलेलें दिसलें पाहिजे. मन प्रफुल्लित करणारें संगीत हवें, आरोग्य पसरविणारा सुगंधि धूप, उदबत्त्या पाहिजेत, प्रकाश पाहिजे, सर्वत्र शांतता पाहिजे. दुसऱ्याबद्दल आदर, प्रेम दिसलीं पाहिजेत. उत्सवाच्या वेळीं या सर्व किंवा यांपैकीं शक्य तितक्या जास्त गोष्टी हव्या. रोजच्या प्रार्थनेच्या वेळीं हीं सर्व असणें शक्य नाहीं. परंतु शालागृहांत पूर्ण प्रकाश पाडतां येईल. शालागृह स्वच्छ झाडतां येईल. भिंतीवर टांगलेल्या तसबिरा किंवा इतर चित्रें व्यवस्थेनें लावितां येतील. सर्वांनीं मोठ्यानें ओरडण्यापेक्षां ज्यांचा आवाज गोड आहे अशा विद्यार्थ्यांनीं प्रार्थना प्रथम म्हणून इतरांना ती मागाहून म्हणतां येईल. प्रार्थनागीत

झाल्यानंतर एक क्षण स्तब्ध बसून परमेश्वराचें ध्यान करून परमेश्वराच्या पवित्र नांवाचा जयजयकार करतां येईल. या सर्व गोष्टी शांतपणानें व्हावयास पाहिजेत. आपण जबाबदारीचें गंभीर कार्य करीत आहोंत, असें प्रत्येकास वाटलें पाहिजे. शाळेंत मोठे पाहुणे आले म्हणजे आपण किती आदबीनें कार्यक्रम पार पाडतो ? परमेश्वर हा सर्वांपेक्षां थोर, त्याचेजवळ जातांना केवढा आदर आपल्या ठिकाणीं उत्पन्न व्हावयास पाहिजे ? प्रार्थनेस उपयोगी पडावीत म्हणून चार पद्यें आम्ही येथें जोडीत आहोंत. पहिलें डॉ. रवींद्रनाथ टागोर यांचें असून हिंदुस्थानची एकी जेणेंकरून वाढेल असा भाव त्यामध्यें जागृत केला आहे. दुसरें राष्ट्रगीत असून त्याचा सोपा अर्थ मराठींत दिला आहे. तिसरें पद्य हिंदीमध्यें असून त्याचा अर्थ समजण्यासारखा आहे. चवथें पद्य शाळे-विषयीं आपलेपणा वाढविणारें आहे. पहिलें पद्य पूर्ण असून राष्ट्रगीत व महाराष्ट्र-गीत यांतील महत्त्वाचीं कडवीं घेतलेलीं आहेत.

## ईश प्रार्थना

जणगणमन–अधिनायक जय हे भारत भाग्यविधाता,
पंजाब, सिन्धु, गुजराथ, मराठा, द्राविड, उत्कल, बंग
विन्ध्य, हिमाचल, यमुना, गंगा, उच्छल--जलधितरंग
तव शुभ नामें जागे, तव शुभ आशिष मागें–
गाहे तव यशगाथा.

जनगण–मंगलदायक जय हे भारत–भाग्य विधाता
जय हे ! जय हे ! जय हे ! जय जय जय जय हे !
अहरह तव आव्हान प्रचारित, सुनि तव उदार वाणी
हिन्दु बौद्ध शीख जैन पारसिक मुसलमान ख्रिस्तानी

पूरव पश्चिम आसे तव सिंहासन पासे प्रेमहार होय गाँथा,
जनगण–ऐक्य विधायक जय हे भारत–भाग्य विधाता !
जय हे ! जय हे ! जय हे ! जय जय जय जय हे !
रात्रि प्रभातिल उदिल रविच्छवि पूर्व उदयगिरी भाले,
गाहे विहंगम पुण्य समीरण, नवजीवन रस ढाळे,
तव करुणारुण रागे ! निंद्रित भारत जागे !
तव चरणे नत माथा !
जय जय जय हे ! जय राजेश्वर; भारत-भाग्य विधाता
जय हे ! जय हे ! जय हे ! जय जय जय जय हे !
—( रवीन्द्रनाथ टागोर. )

---

## राष्ट्रगीत ( १ )

—:०:—

वंदे मातरम् । सुजलाम् । सुफलाम् ।
मलयजशीतलाम् । सस्यश्यामलाम्
मातरम् ॥ ध्रु० ॥
शुभ्रज्योत्स्ना पुलकितयामिनीम् ।
फुल्लकुसुमित द्रुमदलशोभिनीम् ॥
सुहासिनीम् । सुमधुर–भाषिणीम् ।
सुखदाम् । वरदाम् । मातरम् ॥ १ ॥
—( बंकिमचंद्र )

## अर्थ

मी आईला नमस्कार करतों. चांगल्या पाण्यानें युक्त, उत्तमोत्तम फळें धारण करणारी, मलय पर्वतावरील चंदनानें थंडगार असणारी, व धान्यानें शोभिवंत दिसणारी—अशा आईला मी नमस्कार करतों. स्वच्छ अशा चांदण्यामुळें आनंदित अशा रात्रीनें युक्त, उमललेल्या फुलांनीं युक्त असणाऱ्या वृक्षांनीं शोभून दिसणारी, सुहास्य करणारी, गोड भाषण करणारी सुख देणारी व मागूं ती इच्छा पूर्ण करणारी—अशा मातेस मी प्रणाम करतों.

---

## राष्ट्रगीत ( २ )

आयि मातृभूमि ! तेरे चरणों में सिर नमाऊं
मैं भक्ति भेट अपनी, तेरे शरण में लाऊं ॥ ध्रु० ॥
जिससे सुपूत उपजे, श्रीराम, कृष्ण जैसे
उस तेरि धुलि को मैं, निज सिस पे चढाऊं ॥ १ ॥
सेवामें तेरे सारे, भेदों को भूल जाऊं ॥
वह पुण्य नाम तेरा, प्रतिदिन सुनूं सुनाऊं ॥ २ ॥
तेरे ही काम आऊं, तेरा ही मंत्र गाऊं ॥
मन और देह तुझ पर, बलिदान मैं चढावूं ॥ ३ ॥

—( स्वामी सत्यदेव )

---

## महाराष्ट्र गीत

बहु असोत सुंदर संपन्न की महा ?
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ॥ ध्रु० ॥

गगनभेदि गिरिविण अणु नच जिथें उणें ।
आकांक्षांपुढति जिथें गगन ठेंगणें ॥
अटकेवरि जेथील तुरगिं जल पिणें ।
तेथ अवे काय जलाशयनदांविणें ॥
मर्यादा पौरुषासि जेथ दुःसहा ॥ प्रिय अमुचा ॥ १ ॥

विक्रम वैराग्य एक जागिं नांदती ।
जरिपटका-भगवा झेंडाहि डोलती ॥
धर्म-राजकारण समवेत चालती ।
शक्तियुक्ति एकवटुनि कार्य साधिती ॥
पसरे यत्कीर्ती अशी विस्मयावहा ॥ प्रिय अमुचा ॥२॥

गीत मराठ्यांचें हें श्रवणिं मुखिं असो ।
स्फूर्ति दीप्ति धृतिहि देत अंतरीं ठसो ॥
वचनिं लेखनींहि मराठी गिरा दिसो ।
सतत महाराष्ट्रधर्ममर्म मनिं वसो ॥
देह पडो तत्कारणिं ही असें स्पृहा ॥ प्रिय अमुचा ॥३॥

--( श्रीपाद कृष्ण कोल्हटकर )

## शाला-गीत

### माझी शाळा

ही आवडते मज मनापासुनी शाळा ।
लाविते लळा ही, जसा माउली बाळा ॥
हांसऱ्या फुलांचा बाग जसा आनंदी ।
ही तशीच शाळा मुलें इथें स्वच्छंदी ॥
हांसुनी हंसवुनी खेळुनि सांगुनि गोष्टी ।
आम्हांस आमचे गुरुजी शिक्षण देती ॥
हें प्रेम कराया किती भॉवतीं भाऊ ।
हातांत घालुनि हात तयांच्या राहूं ॥
एथेंच बंधुप्रेमाचे । घ्या धडे ॥
मग देशकार्य करण्याला व्हा खडे ॥
पसरवा नांव शाळेचें । चहूंकडे ॥
मग लोक बोलतील " धन्य धन्य ती शाळा ।
जी देशासाठीं तयार करिते बाळा ॥ "

—( केशव कुमार )

# प्रकरण दहावें

# इतर पोषक चळवळी

## सहकारी संघ

लहान शाळेमध्यें सर्व भार एका शिक्षकावर पडतो. एकदोन मोठ्या मुलांची मदत त्यास घेतां येते. परंतु शाळा जशी मोठी असेल त्याप्रमाणें कामाचा भार शिक्षक, विद्यार्थी व पालक यांमध्यें वाटला जाणें जरूर आहे. सर्वांना कामाला लावल्याशिवाय सर्व बाजूंनीं कार्य होऊं शकत नाहीं. शाळा चालविण्याचे बाबतींत जेवढें कार्य करावें तेवढें थोडेंच होतें. अभ्यासक्रमामध्यें शाळेला पोषक असणाऱ्या सर्व चळवळींचा उल्लेख नसतो. मुलांचे खेळ घ्यावेत, परंतु ते कोणते व किती घ्यावेत हें शिक्षकाच्या आवडीवरच अवलंबून राहतें. शाळेच्या किंवा मुलांच्या आरोग्याकडे लक्ष देणें, ही बाब अभ्यासक्रमांत नोंदलेली नाहीं; परंतु ती अभ्यासक्रमांत नाहीं म्हणून तिकडे दुर्लक्ष करून भागत नाहीं. त्याचप्रमाणें इतर चळवळींचे आहे. खेड्यांतील मुलांचा पुढील आयुष्यांत ज्या चळवळींशीं विशेष संबंध येतो अशी चळवळ म्हणजे सहकारी चळवळ होय. शेतकऱ्यांचें हित व्हावें यासाठीं ही चळवळ सरकारनें सुरू केली, परंतु शेतकऱ्यांच्या अज्ञानामुळें तिचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं व होत नाहीं. आपल्या एकमेकांच्या अडचणी एकमेकांच्या सहकार्यानें नाहींशा करावयाच्या. प्रत्येकानें दुसऱ्यास किंवा सहकारी संघास प्रथम मदत करण्याचा प्रयत्न करावयाचा व नंतर संघानें प्रत्येकास मदत करावयाची. प्रत्येकानें संघाकरितां अगोदर कांहीं केलें नाहीं तर संघ प्रत्येकाकरितां कांहीं करूं शकत नाहीं. संघ व्यक्तींतूनच निर्माण झालेला असतो, त्याला स्वतंत्र असें अस्तित्व नाहीं, वगैरे

गोष्टींचें शिक्षण बाल--शेतकऱ्यांना मिळावयास पाहिजे, तरच आमचा शेतकरी-बंधु सुधारेल.

या सहकारी तत्त्वाचें शिक्षण देण्यासाठीं बहुतेक मोठ्या शाळांतून मुलांचें सहकारी तत्त्वावर चालविलेलें स्टोअर किंवा दुकान एका शिक्षकाचे नेतृत्वाखालीं उघडण्यांत आलेलें असतें. मुलांना लागणारा माल, कागद, पेन्सील वगैरे या दुकानांतून पुरविला जातो व जो फायदा होईल तो मुलांच्या कामीं लाविला जातो. वर्षाचे काठीं शाळांतील मुलांना लागणारीं पुस्तकें या संघामार्फत विकत घेतलीं जातात व त्यांचें कमिशन संघाकडे जमा होते. या दुकानाचे योगानें शिक्षकाला आपल्या पसंतीप्रमाणें विद्यार्थ्यांना माल पुरवितां येतो व तो योग्य किंमतीस मिळतो. शाळेला कोणता माल लागतो याची योग्य कल्पना गांवांतील दुकानदारांना असत नाहीं व यामुळें सहकारी संघाचें दुकान नसल्यास मुलांना कसला तरी माल घेऊन काम चालवून घ्यावें लागतें.

या चळवळीचे योगानें मुलें स्वावलंबनाचा धडा शिकतात. प्रत्येकानें चार आण्यांचा शेअर-वाटा-घ्यावयाचा व अशा रीतीनें जमलेल्या पैशांतून सर्वांच्या विचारानें प्रथम जास्त जरूर अशा मालाची खरेदी करावयाची व वर्षाकांठीं सर्व हिशेब मुलांपुढें मांडावयाचा. मालाची खरेदी कोठें व कशी करावी, हिशेब कसे ठेवावेत, दुकानांत माल कसा मांडून ठेवावा, प्रामाणिकपणें व्यवहार कसा करावा, याचें शिक्षण मुलांना सहजच मिळतें. ज्या शिक्षकाकडे हें कार्य सोपविण्यांत आलें असेल त्यानें मुलांना बरोबर घेऊन सर्व कार्य करावें, म्हणजे त्यांना हळूहळू शिक्षण मिळतें. प्रथम प्रथम सर्व काम शिक्षकांनाच करावें लागेल, परंतु थोड्या दिवसांनीं मुलें मोठ्या आस्थेनें काम करूं शकतात. या दुकानांत काम करण्याकरितां जीं मुलें निवडावयाचीं तीं प्रामाणिक असावयास पाहिजेत, तशीं तीं नसतील तर दुकानापासून फायदा न

होता उलट तोटा होण्याचा जास्त संभव आहे. मुलांवर गैरविश्वास न दाखवितां त्यांच्या वागणुकीवर प्रथम लक्ष द्यावें लागतें व त्यांचा प्रामाणिकपणा किंवा अप्रामाणिकपणा ओळखावा लागतो. हें काम फार नाजुक परंतु महत्त्वाचें आहे.

या दुकानांतून कोणासही उधार माल देण्यांत येऊं नये. एकास माल उधार दिला म्हणजे दुसरा मागतो व या योगानें उधारी वाढते. उधारी सर्व वसूल होत नाहीं असा अनुभव आहे. शाळांतील दुकान चोख चालेल तर तेथें शाळेचीं मुलें सामान घेतील, इतकेंच नव्हे तर शिक्षक व पालकही सामान घेतील. अशा पुष्कळ जिनसा असतात कीं, त्यांचा उपयोग पालकांना नेहमीं करावा लागतो. शिक्षकांच्या व पालकांच्या संमतीनें अशा वस्तु खरेदी करून दुकानांत ठेविल्यास व बाजारभावापेक्षां थोड्या स्वस्त भावानें किंवा बाजारभावानें त्या पालकांना मिळाल्यास शाळेचा बराच फायदा होणार आहे. या कामांत जबाबदार शिक्षक जेवढें लक्ष घालील तेवढें थोडेंच आहे. सर्व प्रकारची स्टेशनरी, लहान मुलांचा खाऊ—बिस्कीट, पेपरमिंट, गोळ्या वगैरे—साबण, दंतमंजन व यासारख्या प्रपंचास लागणाऱ्या जिनसा दुकानांत ठेवतां येतील. या दुकानांतून जो फायदा होईल तो शाळेसाठीं खर्च झाला म्हणजे हस्तें-परहस्तें विद्यार्थी, पालक व शिक्षक यांची शाळेला मदतच झाली. या फायद्यांतून एकादें वर्तमानपत्र विकत घेतां येईल किंवा मुलांचें वाचनालयासाठीं पुस्तकें खरेदी करतां येतील किंवा प्रेक्षणीय स्थळें पाहाण्यासाठीं ज्या सहली कराव्या लागतात त्यांचे खर्चाकडे हा फायदा लावतां येईल. पैसा मुलांचा असतो व तो मुलांच्या शिक्षणासाठीं खर्च करण्यास मुलें समर्थ असतात. 'हा आमचा पैसा आहे.' ही आत्मीयतेची भावना त्यांचे ठिकाणीं जागृत होते. 'हें मी मिळविलें व तें मी माझ्या मर्जीप्रमाणें खर्च करीन' हें जें विद्यार्थ्यांना वाटत असतें,

त्याच्या आड शिक्षकानें येऊं नये. या पैशाचा उपयोग गैरशिस्त होत असेल तर मात्र शिक्षकानें त्यांना योग्य मार्ग दाखविणें जरूर आहे. दुकानांत झालेल्या फायद्यावर आपली मालकी नाहीं, शिक्षक आपल्या मर्जीप्रमाणें त्याचा उपयोग करतात, असें मुलांना वाटावयास लागलें म्हणजे दुकानावर त्यांचें प्रेम जडत नाहीं; व अशारीतीनें एकदां लक्ष उडालें म्हणजे तें पुन्हा बसणें कठीण जातें. कांहीं कांहीं शाळांतून हीं दुकानें उत्तम तऱ्हेनें चाललेलीं आहेत. कोणत्याही तऱ्हेचा मोबदला न घेतां केवळ एक हितकारक चळवळ या दृष्टीनें हें कार्य करावें लागत असल्यामुळें, निस्वार्थीपणानें काम करणारीं माणसें पाहिजे असतात. अशीं माणसें जेथें मिळतील तेथें यश ठेवलेलें आहे.

## बालवीर चळवळ

सहकारी चळवळ ज्याप्रमाणें मुलांना उपकारक आहे, त्याचप्रमाणें बालवीर चळवळही आहे. मुलांचें शील बनविण्यास या चळवळीचा जास्त उपयोग होतो. बालवीर शिक्षक तयार करण्यासाठीं सुटीच्या दिवसांत वर्ग भरविण्यांत येतो व त्या दिवसांत योग्य अधिकाऱ्यांकडून बालवीरांना शिक्षण कसें द्यावयाचें हें शिकविलें जातें. अशा रीतीनें शिक्षण घेऊन तयार झालेली कांहीं शिक्षक मंडळी प्रत्येक जिल्ह्यांत आहेत. या कामीं शिक्षणखात्यानें पैसा खर्च करून बालवीर-शिक्षक जास्त तयार करावयास पाहिजेत. शिक्षकांचें अभावीं हें कार्य चांगलें असूनही मागें पडलें आहे. सहकारी चळवळीमध्यें ज्याप्रमाणें आपण स्वार्थाच्या पलीकडे पाहावयास शिकतों, त्याचप्रमाणें याही चळवळीमध्यें मुलगा शिकतो. माझें माझ्या शेजाऱ्याशीं काय कर्तव्य आहे, माझें माझ्या देशाशीं काय कर्तव्य आहे, हें प्रत्येक बालवीरास समजावून दिलेलें असतें व म्हणूनच तो वीर समजला जातो. दुसऱ्याकरितां मी

एक तरी चांगली गोष्ट रोज करीन, असा तो स्वतःशीं निश्चय करतो. संकटाचें वेळीं न डगमगतां तो आनंदानें संकट निवारण्यास पुढें होतो. जो दुसऱ्यास मदत करावयास तयारी दाखवितो त्यानें प्रथम स्वतःची लायकी वाढविली पाहिजे. पाण्यांत बुडणाऱ्या माणसाला जर वांचवावयाचें असेल तर अगोदर आपल्याला पोहावयास आलें पाहिजे. बालवीराची लायकी अजमावण्याकरितां निरनिराळ्या परीक्षा त्यास उत्तीर्ण व्हाव्या लागतात व या परीक्षा जशा उत्तीर्ण होत जातील तसा तो बालवीर या नांवास शोभून दिसतो.

बालवीर चळवळीचा शारीरिक शिक्षणाशीं संबंध जोडतां येईल; परंतु केवळ खेळ, कवाईत म्हणजे बालवीर शिक्षण नव्हे. खेळ हा एक भाग होऊं शकेल व तो एक महत्त्वाचा भाग आहे. आळस जाऊन हुरूप वाढविण्यास खेळांचा उपयोग होतो. खेळीमेळीनें काम करण्याचें बाळकडू खेळांतच मिळत असते. पुष्कळ वेळां बालवीर लायक बनण्यापूर्वींच त्यांचे अंगावर बालवीराचा पोशाख चढला जातो. परंतु केवळ पोशाखानें बालवीर होत नाहीं. अगोदर बालवीराला अवश्य लागणारे गुण निर्माण झाले पाहिजेत; तसे न होईल तर जगाची केवळ फसवणूक केल्याचा आरोप आपणांवर येईल. बालवीर चळवळीची सुरवात मुलांना सहलीवर नेऊन करतां येईल. गांवापासून कांहीं अंतरावर चांगल्या पाण्याजवळ कांहीं तास किंवा तशी सोय असल्यास दोन तीन दिवस वस्ती करावी. घरांतून बाहेर पडल्याशिवाय आपण दुसऱ्यावर किती अवलंबून असतों हें मुलांना कळत नाहीं. एकमेकांशीं कसें वागावयाचें, हें मुलें शिकतात. स्वतः आंघोळ करणें, कपडे धुणें, स्वतः स्वैंपाक करणें, विस्तव तयार करणें, विस्तवासाठीं लाकूडफाटा जमा करणें, जेथें वस्ती करावयाची तेथें जवळपास जागा झाडून साफ करणें, आपला बिछाना घालणें, किडामुंगीपासून व चोरांचिलटांपासून

सर्वांचें रक्षण करणें वगैरे किती तरी कामें मुलांना करावीं लागतात व यामुळें स्वावलंबनाचा धडा तीं शिकतात. स्वावलंबनानें बालवीर तयार झाला म्हणजे दुसऱ्याला मदत करण्याची प्रवृत्ति त्यामध्यें सहजच उत्पन्न होते.

बालवीर चळवळीवर बरेंच वाङ्मय प्रसिद्ध झालेलें आहे. प्रत्येक मोठया शाळेंत या चळवळीची माहिती देणारीं एकदोन पुस्तकें शिक्षकांच्या पुस्तकालयांत असणें जरूर आहे. या पुस्तकांतून माहिती मिळवून व बालवीर शिक्षकाकरितां उघडण्यांत आलेल्या वर्गांत शिक्षण घेऊन शिक्षकानें स्वतः बालवीर होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. स्वतःचे, स्वतःच्या कुटुंबाचें, धर्माचें व देशाचें रक्षण वीराशिवाय कोणीही करूं शकणार नाहीं. इटाली, जर्मनी, जपान या देशांतून लहान वयापासून वीर होण्याचें शिक्षण दिलें जातें व म्हणून तीं राष्ट्रें आज जगाला आपल्यापुढें माना वांकवावयास लावीत आहेत. हिंदुस्थानचें संरक्षण व्हावयाचें असेल तर हिंदुस्थानांत बालवीर मोठ्या प्रमाणांत निर्माण व्हावयास नकोत काय ? आज आपलें शरीर कमताकद झालें आहे. विचार स्वार्थी, पंगू बनले आहेत. शरीर व मन खंबीर होण्यास बालवीरचळवळीसारखी हितकारी चळवळ सर्व शाळांतून सुरू व्हावयास पाहिजे. ही चळवळ चांगली आहे, ती सर्व शाळांतून चालू व्हावी, अशी सरकारची इच्छा आहे; मात्र सरकारचें तीस सहाय्य जसें मिळावें तसें अजून मिळत नाहीं. मुंबई सरकारचें लक्ष शारीरीक शिक्षणाकडे लागलेलें आहे व या चळवळीप्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चास सरकारी मान्यता मिळेल असें सरकारकडून आश्वासनही मिळत आहे. बालवीरचळवळ राष्ट्रीय पायावर नवीन उभारण्यांत आली आहे. यावरून बालवीरचळवळीस नवीन जोम प्राप्त होईल, अशी अटकळ करावयास कांहीं हरकत नाहीं.

## वाङ्मय-मंडळ

मुलांचा लहान वयांतच वाङ्मयाशीं संबंध येतो, परंतु त्याच्या विवि- धतेची कल्पना त्यांना असत नाहीं. लघुकथा, कादंबऱ्या, वर्णनें, नाटकें, भाषणें, काव्य व त्याचे निरनिराळे प्रकार यांनीं किती क्षेत्र व्यापिलें आहे, याची जाणीव मुलांना विद्यार्थिदशेंतच व्हावयास पाहिजे. क्रमिक पुस्तकांत जें आहे तेवढेंच वाङ्मय अशी मुलांची समजूत होते; ती शिक्षकानें घालवावयास पाहिजे. वाङ्मयांत जें मुलाचें दृष्टीनें चांगलें असेल त्यांविषयीं त्याचे ठिकाणीं आवड उत्पन्न करण्याचा प्रयत्न व्हाव- यास पाहिजे. ज्या कविता वाचिल्या जातात त्या सर्व पाठ न करतां, ज्या चांगल्या आहेत त्याच पाठ करवून घ्याव्यात. गद्याचा एकादा भाग गोड शब्दांत मांडला असेल तर तोही भाग पाठ करावयास हरकत नाहीं. गोखले, टिळक, गांधी वगैरे थोर पुरूषांचे थोर विचार किंवा त्यांनीं समाजापुढें केलेलीं भाषणें मुलांकडून पाठ करवून घेण्यास हरकत नाहीं. क्रमिक पुस्तकांतून चांगलें संवाद निवडून किंवा नाटकांतून कांहीं भाग निवडून तो संवाद वर्गांतील मुलां- कडून बसवून घ्यावा. क्रमिक पुस्तकांतून धड्यांची निवड ज्या पुस्त- कांतून केलेली असते त्या पुस्तकांचीं नांवें पुस्तकांत दिलेलीं असतात. अशीं कांहीं पुस्तकें शाळेच्या पुस्तकालयांत मुद्दाम ठेवण्यांत यावींत. वर्गांतील ग्रंथालयांतून ठेवण्यांत आल्यास उत्तमच. हीं पुस्तकें मुलांच्या पुढें वेळोवेळीं आणावींत. त्यांतील मनोरंजक भाग त्यांना वाचून दाख- वावा; हेतु हा कीं, निदान कांहीं मुलांनीं तें पुस्तक वाचावें. ज्या लेखकांनीं तीं पुस्तकें लिहिलीं आहेत ते हयात असतील व शाळेच्या गांवीं पुढेंमागें अनायासें येण्याचा संभव असेल, तर त्यांना मुद्दाम शाळेंत बोलावून त्यांच्या वाङ्मयासंबंधीं त्यांच्याकडून मुलांना सांगण्यांत यावें. यायोगें मुलांचा वाङ्मयाशीं व साहित्य-सेवकांशीं निकटचा संबंध

येतो. व्यक्तीबद्दल प्रेम उत्पन्न झालें म्हणजे त्याचीं पुस्तकें आपण वाचावींत अशी इच्छा मुलांचे ठिकाणीं सहजच उत्पन्न होते.

दुसऱ्याचे विचार काय आहेत ते पहावयाचे, त्यांवर स्वतः विचार करावयाचा, ज्या ठिकाणीं मतभेद असेल तो बोलून दाखवावयाचा, चर्चा करावयाची; असें केल्यानें विचारास खंबीरपणा येतो. )शरीर जसें कमवावें लागतें त्याप्रमाणें स्वतंत्र विचार करण्याची पात्रता निर्माण करावी लागते.! केवळ पुस्तकें वाचून भागत नाहीं. पुस्तकांत जें छापून येतें तें सर्व खरें, अशी मुलांची समजूत आहे.\मुलांना स्वतंत्र विचाराची संवय लागावी यासाठीं वाङ्मयमंडळाचा एक भाग म्हणून वादविवाद किंवा चर्चामंडळ स्थापन करण्यांत यावें व शिक्षकाच्या सहाय्यानें मनोरंजक वादविवाद घडवून आणावा.

एकाद्या विषयासंबंधीं जास्त माहिती मिळविण्यासाठीं शाळांतील शिक्षकांपैकीं एकाचें त्या विषयावर व्याख्यान ठेवावें किंवा शिक्षकाव्यतिरिक्त कोणी अधिकारी पुरुष मिळाल्यास त्याच्या तोंडून विषय समजावून घ्यावा. मुलें वर्तमानपत्रें वाचतात. युद्धाच्या गोष्टी ते ऐकतात. लढाई सुरू आहे परंतु ती कां ? भांडणारांचे हितसंबंध काय आहेत, हें त्यांना कळत नाहींत. या विषयाचा अभ्यास जे शिक्षक करतात त्यांनीं-इतिहास भूगोलाचे शिक्षकांनीं-हें ज्ञान मुलांना देणें उचित आहे. वाङ्मयमंडळाकडून अशीं व्याख्यानें घडवून आणिलीं पाहिजेत.

मुलांना आपलें पाठांतर म्हणून दाखविण्यास संमेलन किंवा शाळेचा वर्षदिन ही चांगली संधि आहे. गाणीं, संवाद, भाषणें यांची योग्य निवड करून योग्य मुलांकडे तीं सोंपविल्यास समारंभ गोड होतो, इतकेंच नव्हे तर, मुलांनाही एक प्रकारचें शिक्षण मिळतें. क्रमिक पुस्तकांतील धडे जसे आपण काळजीनें निवडतो, त्याप्रमाणें वाङ्मयक्षेत्रांतून

शिक्षकानें निवड करून, समारंभाचें काम महत्त्वाचें समजून पुढें येणाऱ्या संमेलनाचे किंवा वर्षदिनाचे कार्यास वर्षारंभापासूनच लागावें. आयत्या वेळीं धांवपळ करून भागत नाहीं. जितकी तयारी जास्त तितकें यश निश्चित ठेवलेलें.

मुलांना दुसऱ्यांचे विचार बोलून दाखवितां आले पाहिजेत, आपले विचार मंडळींपुढें मांडतां आले पाहिजेत, त्याचप्रमाणें ते कागदावरही लिहितां आले पाहिजेत. पुष्कळ माणसें बोलूं शकतात, परंतु लिहूं शकत नाहींत. लिहिण्याची एक कला आहे व ती थोड्याबहुत प्रमाणानें प्रत्येकानें साध्य केली पाहिजे. आपले विचार एकापुढें एक मांडण्याचा पाठ बालवर्गापासून दिला जातो. परंतु त्याची मर्यादा शाळेंतील लहान निबंधापर्यंतच राहूं नये. मासिकामध्यें जशीं वर्णनें येतात, लघुकथा येतात, त्याप्रमाणें आपणही वर्णनें लिहूं, लघुकथा लिहूं, असा आत्मविश्वास मुलांमध्यें उत्पन्न व्हावयास पाहिजे व यासाठीं प्रत्येक वर्गाचें एक हस्तलिखित मासिक, त्रैमासिक, षण्मासिक असावें. कार्याची सुरवात ही नेहमीं लहानच असते. प्रथम चार लेख, एखादी कविता, एखादें चित्र जरी असलें तरी भागेल. प्रत्येकानें एका नमुन्याचे कागदावर स्वच्छ व शुद्ध लिहावें. प्रथम पाहिजे तर शिक्षकांकडून मूळ लेख शुद्ध करून घ्यावा. अंक तयार झाल्यावर तो वर्गांतून शिक्षकानें गौरवून उल्लेखावा. लेख लिहिणाऱ्या मुलांचें कौतुक करावें म्हणजे इतरांना लिहिण्याची स्फूर्ति होईल.

शाळेचा बाहेरच्या जगाशीं संबंध आला पाहिजे व वाङ्मय हें असें एक साधन आहे कीं, त्यायोगें तो संबंध येतो. जगांत काय चाललें आहे या विषयीं निदान आठवड्यानें माहिती देत जावी. मुलांना वाङ्मय-मंडळ हें आपलें कार्य चोख करील तर हा संबंध जास्त दृढ व हितकारक होईल.

## प्रकरण अकरावें

# शाळेचें दप्तर

शिक्षकाचें मुख्य काम शिकवावयाचें असलें तरी त्याला कांहीं रजिष्टरें ठेवावीं लागतात. तीं योग्य तऱ्हेनें भरण्याची जबाबदारी हेडमास्तरावर आहे./ यासंबंधींच्या सर्व सूचना **नियम-संग्रहा**मध्यें दिलेल्या आहेत. त्या शिक्षकानें काळजीपूवक वाचाव्यात.

मे. ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर यांचेकडून जी माहिती विचारली जाते ती ताबडतोब पुरवीत जावे. मे. इन्स्पेक्टरसाहेब, मे. डायरेक्टरसाहेब, कायदेमंडळांतील सभासद किंवा प्रत्यक्ष शिक्षण—मंत्रि यांचेकडून विचारणा झाल्यामुळें माहिती मागविली जात असते व एका शिक्षकानें ही माहिती पाठविण्यास विलंब केल्यास ऑफिसमध्यें सर्व जमविलेली माहिती खोळंबून राहते, ही गोष्ट शिक्षकानें विसरूं नये. हातांतील काम टाकून ही माहिती गोळा केली पाहिजे. ही माहिती मिळविण्यास वेळ मिळावा म्हणून शिक्षकास शाळा बंद ठेवतां येणार नाहीं, परंतु शाळेच्या कामांतून सवड मिळतांच हें काम तातडीनें करावयाचें आहे.

नियमसंग्रह भाग ६ मध्यें कोणतीं रजिष्टरें ठेवावयाचीं हें दाखविलें आहे. नमुना नंबर एकचें रजिस्टर अत्यंत महत्त्वाचें आहे. या रजिष्टरांत मुलाचें नांव व मुलाचा जन्मदिवस या विशेष महत्त्वाच्या बाबी होत. एकदां घातलेलें नांव वरिष्ठांच्या हुकुमाशिवाय बदलतां येत नाहीं. मुलगा दत्तक गेला असेल, मुलीचें लग्न झालें असेल, तरच योग्य पुराव्यानें नांव बदलतां येतें. कित्येक वेळाला नांवच चुकीचें लागलेलें असतें. तें नांव चुकीचें आहे हें सिद्ध करण्याची जबाबदारी पुढें पालकावर येऊन पडते. नांव प्रथमच चुकीचें घातलें जाऊं नये याकडे हेडमास्तरांनीं

दक्षता बाळगावी. पालक प्रथम मुलाचें नांव घालावयास येतात, त्याच वेळीं नांवामध्यें थोडा फरक हेडमास्तरानें सुचवावा व तो पालकानें मान्य केल्यास त्याप्रमाणें नांव घालावें. उदाहरणार्थ 'घोंड्या' ऐवजीं 'धोंडीबा,' 'दगडी' ऐवजीं 'दगडाबाई' असा फरक करावयास हरकत नाहीं. मुलाचें पाळण्यांतील एक नांव असतें व दुसऱ्याच नांवानें मुलास हांक मारण्याचा प्रघात पडतो. पालकाला या नांवांपैकीं जें नांव पसंत असेल तें तो घालील, मात्र पुढें वाटेल त्यावेळीं नांव बदलतां येत नाहीं या नियमाची जाणीव पालकांना द्यावी.

जन्मदिवस मांडतांनाही हेडमास्तरांनीं दक्षता बाळगावी. पुष्कळ आईबापांना आपल्या मुलांचा जन्मदिवस माहीत नसतो. वय किती असें विचारिलें असतां ७।८ असें ते मोघम सांगतात. कित्येक जन्मदिवसाची खूण देतात, परंतु वर्ष सांगतां येत नाहीं. महाशिवरात्रीला जन्म झाला, किंवा होळी दोन दिवसानंतर होती. रोज गुरुवार होता. एवढें ते सांगतात. अशा वेळीं जुन्या डायऱ्या किंवा पंचांग पाहून जन्मदिवस शोधून काढावा. हा त्रास वाटेल, परंतु पुढें त्रास करून घेण्यापेक्षां प्रथम झालेला बरा. जन्मतारीख बदलावयाची झाल्यास नं १ च्या रजिष्टरांत दाखल केलेली जन्मतारीख खरी नाहीं दुसरी खरी आहे, हें सिद्ध करण्याचा बोजा पालकावर पडतो. पुष्कळ मुलांच्या जन्मतारखा चुकलेल्या असतात, कारण जन्म तारीख मांडून ठेवण्याची संवय पुष्कळ कुटुंबांत नसते.

या रजिष्टरामध्यें कोणत्याही प्रकारची खाडाखोड होतां कामा नये. कोर्टदरबारी हें रजिष्टर पुराव्यासाठीं दाखल करावें लागतें. मुलगा किंवा मुलगी वयांत आल्यावर तिचा इस्टेटीवर वारसा येतो. ती किंवा तो वयांत आला हें दाखविण्यासाठीं खोटेंनाटें करण्याची कांहीं लोकांची प्रवृत्ति असते. हे उपद्व्यापी लोक शिक्षकांच्या मदतीनें नं. १ च्या

राजिस्टरामध्यें खाडाखोड करतात, व पुढें त्याचा परिणाम शिक्षकांस भोगावा लागतो. राजिष्टरामध्यें खाडाखोड करणें हा गुन्हा आहे हें शिक्षकानें पूर्ण लक्षांत ठेवावें.

शिक्षकानें शाळेंत हजर राहिल्याबरोबर हजेरीपत्रकावर सही करावी. शाळेंत वक्तशीर हजर राहूनही चार चार पांच पांच दिवस रजिष्टरावर सही होत नाहीं. हेडमास्तरानें या बाबतींत लक्ष ठेवून शिक्षकांना वक्तशीर सही करण्याची संवय लागेल असें धोरण स्वीकारावें.

ऑफीसकडून जें सामान शाळेला मिळेल त्याची नोंद सामानाच्या वहीमध्यें न चुकतां करावी. मोडकें सामान वरिष्ठांचे परवानगीनें राजिष्टरांतून कमी करावें. पैशाच्या देवघेवीचा व्यवहारही चोख ठेवावा. तालुकामास्तरकडे फी पगार यांविषयीं पाठवावयाचे कागद काळजीपूर्वक लिहून पाठवावेत. पैशाचे बाबतींत कोणत्याही प्रकारें संशयाला जागा न राहील, असें धोरण शिक्षकाचें असावें

नियमसंग्रहांत शिक्षकानें कसें वागावें यासंबंधीं कांहीं नियम दिले आहेत, त्याचा विचार शिक्षकानें करावा. शिक्षकानें आपल्या कामाशिवाय इतर कोणत्याही धंद्यांत पडूं नये. शिक्षकास दुसरा धंदा करतां येत नाहीं. दुकान चालवतां येत नाहीं, मुखत्यारी करतां येत नाहीं. स्कूलबोर्डाच्या परवानगीनें को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या सेक्रेटरीचें किंवा पोस्ट-मास्तराचें काम करतां येईल किंवा दोन तासापेक्षां जास्त नाहीं इतका वेळ खाजगी शिकवणीकरितां मे. अॅड. ऑफिसर याचें परवानगीनें खर्च करतां येईल. शिक्षकानें इतर कामांत आपलें लक्ष गुंतविलें तर शाळेचें मुख्य काम त्याचे हातून चांगलें होणार नाहीं, या दृष्टीनें हा नियम केलेला आहे. दिवसानुदिवस शिक्षकांचा पगार घटत आहे, कार्याची जबाबदारी वाढत आहे; अशा वेळीं शिक्षकास आर्थिक दृष्ट्या मदत व्हावी यासाठीं दुय्यम धंद्याची जोड असणें जरूर आहे,

असें आम्हांस वाटतें. इकडे दुय्यम धंदे स्वीकारण्याची मनाई, पगार जेमतेम, यामुळें चांगलीं माणसें शिक्षकाचे धंद्यांत सहसा पडत नाहींत हें क्रमप्राप्तच आहे.

' शिक्षकानें गांवच्या तंट्यांत पडूं नये, कायदे-कौन्सिलच्या किंवा- स्थानिक संस्थांच्या निवडणुकीसाठीं उभे असलेल्या उमेदवारास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीतीनें मदत करूं नये, इतकेंच नव्हे तर, दस्तऐवज लिहिणें किंवा साक्ष घालणें याही गोष्टी निषिद्ध मानल्या आहेत. ' शिक्षक हा नेहमीं पक्षातीत असावा, हा सरकारचा हेतु दिसतो. पक्ष गांवचा असो शहराचा असो किंवा प्रांताचा असो, त्यांत एकदां मनुष्य पडला म्हणजे तेथील गांवगुंडी किंवा राजकारण त्याला स्वीकारावें लागतें व यामुळें शिक्षकाचे धंद्याचा पवित्रपणा त्याला राखतां येत नाहीं. शिक्षकाला सर्व जातींशीं किंवा पक्षांशीं संबंध ठेवावा लागतो व हा संबंध तो पक्षातीत असेल तरच ठेवतां येईल. तो विशिष्ट पक्षाचा असूनही इतर पक्षांशीं संबंध ठेवण्याचा प्रयत्न करील, परंतु इतर पक्षाचा त्याच्याशीं सलोख्याचे संबंध रहाणार नाहीं. हा मनुष्यस्वभाव आहे. आज गांवकरी कॉंग्रेस- पक्षाचे होतील, शाळेवर तीन रंगी झेंडा उभारतील. उद्यां दुसरा पक्ष जोरावेल. तो भगवा झेंडा लावील किंवा कोणताच झेंडा लावणार नाहीं. या सर्व परिस्थितींत शिक्षकाला राष्ट्रहिताचें काम करावें लागेल. पक्षातीत राहूनही देशहिताचें काम करतां येतें. पक्षातीत माणसेंच आपल्या सदसद्विवेकबुद्धीस स्मरून कार्य करूं शकतील. केवळ पक्षाच्या मतास मान देऊन आपली बुद्धि गहाण ठेवण्याचें पाप त्यांचे हातून घडणार नाहीं, शिक्षक हा पापभीरू व परमेश्वरावर किंवा सत्य तत्त्वावर विश्वास ठेवणारा आहे. जगांत माणुसकी आणण्याचा तो प्रयत्न करतो व हें कार्य, तो सर्वभूतीं सारखें प्रेम करणारा असेल तर, त्याचे हातून होईल. कोणत्याही वावटळींत सामील न होतां आपलें कार्य उत्तम

रीतीनें करावें, हा सरकारचा हेतु साधारण–सूचना नियम ३ मध्यें दिसत आहे व तो केव्हांही स्तुत्य आहे.

‘ शाळा झाडणे, शाळेंतलि सामान साफ करणें वगैरे हलकीं कामें शाळेंतलि कोणत्याही विद्यार्थ्यांकडून त्याच्या इच्छेविरुद्ध शिक्षकानें करून घेऊं नयेत ’ असा दहावा नियम आहे. लहान शाळेंतील आणि मोठ्या शाळेंतीलही बरीचशीं कामें शिक्षक व विद्यार्थी यांना करावीं लागतात. प्रत्येक कामाला मजुरी देऊन कामकरी लावतां येणें शक्य नाहीं. कांहीं शाळांमधून जमिनी तयार केलेल्या नसतात. ज्या जागेवर मुलांनीं बसावयाचें त्या जागेवर वीत वीत खड्डे पडलेले असतात. जमीन दुरुस्त करण्याकरितां पैसे मिळत नाहींत व विद्यार्थ्यांकडून तर हें काम करवून घेतां येत नाहीं. अशा वेळीं काय करावयाचें हा प्रश्न शिक्षकांपुढें उभा रहातो. नियमामध्यें विद्यार्थ्यांकडून काम करवून केव्हांही घेऊं नये, असें म्हटलें नसून, **त्यांच्या इच्छेविरुद्ध** काम करवून घेऊं नये, असें म्हटलें आहे. ही आपली जागा, यावर आपणांसच बसावयाचें आहे, दुसऱ्याच्या घरची जागा आपण साफ करीत नाहीं, आपली जागा आपण लिंपतों, आपण सारवतों, त्यांत कमीपणा कसला आहे हा विचारच येथें उत्पन्न होत नाहीं. आपली जागा, आपला वर्ग साफ करूं या, अशी इच्छा मुलांचे ठिकाणीं उत्पन्न झाली किंवा शिक्षकांनीं ती केली, तर मुलांच्या इच्छेविरुद्ध त्यांचेकडून हलकें काम करवून घेतल्याचा दोष शिक्षकावर कदापि येणार नाहीं. शिक्षकानें स्वतः बाह्या सारून व सर्व मुलांना एकत्र करून बालवीर ज्याप्रमाणें आनंदानें स्वतःचें कार्य करण्यास प्रवृत्त होतो, त्याप्रमाणें काम करण्यास सुरवात केली तर कोणताही पालक, शिक्षकानें केलें तें वाईट केलें असें म्हणणार नाहीं. शिक्षकानें स्वतः कांहीं न करतां वर्गांतील मुलांमध्यें हा श्रीमंताचा व हा गरिबाचा असा भेद पाडून कांहीं मुलांकडून शाळेचें

काम करवून घेतलें, तर ज्या मुलांना कामावर लाविलें त्यांचेंकडून तक्रार आल्याशिवाय राहणार नाहीं. शिक्षकानें जेथें भेदभाव निर्माण केला तेथें पालक का करणार नाहींत ?

' अर्थाचीं पुस्तकें व प्रश्न सोडविलेलीं पुस्तकें व यासारखी इतर पुस्तकें शाळेंत वापरण्याची सक्त मनाई आहे. क्रमिक पुस्तकांचा अभ्यास उत्तम तऱ्हेनें झाल्यानंतर त्यावर प्रश्न सोडविण्यांत यावेत. प्रथमपासून ' प्रश्न सोडविलेलीं पुस्तकें ' मुलांच्या हातीं पडलीं म्हणजे क्रमिक पुस्तकांचा अभ्यास त्यांचेकडून होत नाहीं. प्रश्न व त्यावरील उत्तर घोकून पाठ करण्याची प्रवृत्ति मुलांमध्यें वाढविते व यासाठीं हा नियम करणें जरुर पडलें असावें. अर्थाची पुस्तकें शिक्षकांनीं पहावयास किंवा वापरावयास हरकत नाहीं. कारण हीं पुस्तकें लिहिणारी माणसें अनुभविक शिक्षक असतात, व अनुभविक शिक्षकानें पुस्तकरूपानें दिलेली मदत कोणासही झिटकारितां यावयाची नाहीं. निबंध कसा लिहावा किंवा निबंधाची तयारी कशी करावी हें ज्यांनीं याविषयीं बरींच वर्षे विचार केला आहे, तेच सांगूं व लिहूं शकतील. बालवर्गापासून निबंधाला कशी सुरवात करावी व हळू हळू प्रत्येक वर्गांत मुलांची तयारी कितपत करवून घ्यावी हें सर्वांना समजेल असें नाहीं. पुष्कळ वेळां या टिपणीपुस्तकांचा परीक्षा पास होण्यास उपयोग होतो. या पुस्तकांपासून जी मदत मुलांना मिळते ती जर वर्गशिक्षकांकडून मिळूं लागेल तर अशीं पुस्तकें फारशीं वापरलीं जाणार नाहींत. व्ह. फायनल परीक्षेकरीतां मुलांना तयार करण्याचे वेगवेगळ्या शिक्षकांचें वेगवेगळे मार्ग असतात. शक्य तितक्या जास्त मार्गांनीं जाऊन परीक्षेंतील यश आपण निश्चित करावें अशा विद्यार्थ्यांची आतुरता असते व यामुळें व्ह. फा. परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं अनेक ' मित्र ', ' सोबती ' निर्माण होतात.

नियमसंग्रहांतील कांहीं ठोकळ मुद्यांसंबंधीं आम्हीं थोडक्यांत चर्चा केली आहे सर्व नियम काळजीपूर्वक शिक्षकानें वाचावेत. एकदांच वाचून न बसतां ते नेहमीं नेहमीं वाचावेत, म्हणजे नियमाची जागृति राहून हातून चूक होण्याचा संभव कमी होतो.

---

## उपसंहार

एथपर्यंत शाळा कशी चालवावी याविषयीं शिक्षकांस मार्गदर्शक होतील अशा सूचना आम्हीं केल्या आहेत. सरकारनें नेमून दिलेले विषय शाळेंत तयार करून घेतले म्हणजे शाळेचें कर्तव्य संपत नाहीं. विषयाचे बाहेरचें व्यवहारोपयोगी ज्ञान विद्यार्थ्यांना देणें आजकाल जरूर झालें आहे. क्रमिक पुस्तकें घोकणारा आज खरा विद्यार्थी समजला जात नाहीं; तर त्या पलीकडे जाऊन खरा नागरिक बनण्याचा जो प्रयत्न करतो तोच खरा विद्यार्थी होय. असे विद्यार्थी तयार करण्याची जबाबदारी शिक्षकांवर येऊन पडत आहे. स्वतंत्र बुद्धीनें विचार करावयास मुलें शिकलीं पाहिजेत.

या पुस्तकांत केलेल्या सूचना सर्व शाळांना स्वीकारतां येतील असें नाहीं. जेथें कांहींच होत नाहीं तेथें अभ्यासक्रमाव्यतिरिक्त कांहीं हितकारक चळवळी हातीं घेण्यांत याव्यात. या पुस्तकांत ज्यांचा नामनिर्देश नाहीं अशाही कांहीं गोष्टी शिक्षकांना हातीं घेऊन मुलांना वाढीस लावण्याचें काम करून दाखवितां येईल.

आज शाळेमध्यें जेवढ्या गोष्टी शिकविल्या जातात असें आपण म्हणतों त्या पूर्वी शिकविल्या जात नव्हत्या. जशी वेळ बदलेल त्याप्रमाणें

शाळा चालविण्याचें तंत्रही बदलेल. आणखी कांहीं वर्षांनीं, सध्यां चाललेल्या प्रयोगापासून कांहीं ज्ञान शिकतां आल्यास, याच पुस्तकांत पुष्कळ बदल करावा लागेल. म्हणून शिक्षकांनीं पुस्तकांतील विचारास चिकटून न राहतां काल—परिस्थितीस अनुसरून आपल्या पद्धतींत योग्य तो बदल करावा, एवढेंच शेवटीं सुचवावयाचें आहे.

सध्यां शाळा ज्या स्थितींत आहेत ती स्थिती सुधारण्यास या पुस्तकाचा थोडा तरी उपयोग होवो, एवढीच इच्छा !



IRBK-0111953

सरकारनें मंजूर केलेलीं

# बा. ग. जगताप यांचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | माझी शाळा (आवृत्ति तिसरी) | १। रुपया |
| २ | शाळा कशी चालवावी (आवृत्ति तिसरी) | १। रुपया |
| ३ | अध्यापनाचा परिचय (आवृत्ति तिसरी) | छापत आहे |
| ४ | शिशुसंगोपन (आवृत्ति तिसरी) | छापत आहे |
| ५ | टॉलस्टॉयच्या गोष्टी (आवृत्ति तिसरी) | १॥ रुपया |

★

जगताप पब्लिशिंग हाऊस, पुणें २.